सोलापूर
# तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. १३ नोव्हेंबर २०२५ वर्ष - तिसरे अंक २१७ पाने : ८ किंमत रु. ६/- www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com


## थोडक्यात...

### बॉम्बची धमकी : मुंबई-वाराणसी एअर इंडियाच्या विमानाचे इमर्जन्सी लँडिंग



वाराणसी, १२ नोव्हेंबर : दिल्ली कार बॉम्बस्फोटाची घटना ताजी असतानाच आज, बुधवारी मुंबईहून वाराणसीला जाणाऱ्या एअर इंडिया एक्सप्रेसच्या विमानाला उड्डाणादरम्यान बॉम्बची धमकी मिळाली. त्यानंतर वाराणसीच्या लाल बहादूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमानतळावर हाय अलर्ट जाहीर करण्यात आला. विमानाचे तात्काळ आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. सर्व प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले, तर बॉम्ब शोध पथक विमानाची कसून तपासणी करत आहे. अधिकाऱ्यांनी धमकीच्या स्रोताचा शोध सुरू केला आहे. मुंबईहून वाराणसीला जाणाऱ्या एअर इंडिया एक्सप्रेसच्या विमानात बॉम्बच्या धमकीच्या धोक्याची सूचना आल्याने घबराट पसरली. प्रवाशांना सुरक्षितपणे बाहेर काढल्यानंतर, शोध मोहीम सुरू करण्यात आली. सीआयएसएफ आणि स्थानिक पोलिसही शोध मोहिमेत सहभागी झाले होते. वाराणसीला जाणाऱ्या एका विमानाला सुरक्षा धमकी मिळाली. प्रोटोकॉलनुसार, सरकारने नियुक्त केलेल्या बॉम्ब धमकी मूल्यांकन समितीला तात्काळ माहिती देण्यात आली आणि सर्व आवश्यक सुरक्षा उपाययोजना त्वरित सुरू करण्यात आल्या. विमान सुरक्षितपणे उतरले आणि सर्व प्रवाशांना खाली उतरवण्यात आले. सर्व अनिवार्य सुरक्षा तपासणी पूर्ण झाल्यानंतर विमानाला ऑपरेशनसाठी परवानगी दिली जाईल, असे एअर इंडियाने स्पष्ट केले आहे.

### भुसावळ - महानगरी एक्सप्रेसमध्ये पाकिस्तान जिंदाबाद, आयएसआयचे संदेश



मुंबई, १२ नोव्हेंबर : मुंबई छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस - वाराणसी महानगरी एक्सप्रेसमध्ये (ट्रेन क्रमांक २२१७८) बॉम्ब असल्याच्या संशयास्पद संदेशामुळे मोठी खळबळ उडाली. माहिती मिळताच, संपूर्ण डब्याची तपासणी करण्यात आली, परंतु कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही, ज्यामुळे सुरक्षा यंत्रणा आणि मध्य रेल्वेने सुटकेचा नि:श्वास सोडला. त्यानंतर ट्रेन मार्गस्थ करण्यात आली. या घटनेनंतर, महाराष्ट्रातील सर्व स्थानकांवर हाय अलर्ट जारी करण्यात आला आहे. या घटनेची चौकशी करणाऱ्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, महानगरी एक्सप्रेसच्या जनरल डब्याच्या शौचालयात पाकिस्तान जिंदाबाद आणि आयएसआय असे संदेश आणि बॉम्बची धमकी हाताने लिहिलेली होती. भुसावळ स्थानकावर ट्रेन येण्यापूर्वी एका प्रवाशाने हे संदेश पाहिले आणि त्याने ताबडतोब गार्डला कळवले. अलर्टनंतर, रेल्वे सुरक्षा दल, रेल्वे पोलिस आणि श्वान पथक तात्काळ भुसावळ स्थानकावर पोहोचले. सकाळी ८:३० वाजता भुसावळ स्थानकावर पोहोचल्यानंतर, संपूर्ण ट्रेन, डबे, सामानाचे डबे आणि प्रवाशांच्या बॅगांची कसून तपासणी करण्यात आली. श्वान पथके आणि बॉम्ब निकामी पथकांनी कसून तपासणी केली.

### प्रवक्तेपदावरुन उचलबांगडी होताच रुपाली पाटील-ठोंबरे यांच्यावर गुन्हा

पुणे, १२ नोव्हेंबर : उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस मधील दोन महिला पदाधिकाऱ्यांमधील वाद गेल्या काही दिवसांपासून चर्चेचा विषय बनला आहे. या वादाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादीच्या पदाधिकारी असलेल्या रुपाली पाटील ठोंबरे यांचे प्रवक्ते पद काढून घेतला असल्याचे देखील बोलले जात आहे. त्यातच आता रूपाली ठोंबरे यांच्या अडचणीत आणखी वाढ झाली असल्याचे पाहायला मिळत आहे. एका प्रकरणामध्ये रूपाली ठोंबरे यांच्यावर गुन्हा दाखल झाले असल्याचे समोर आले आहे. काही दिवसांपासून उपमुख्यमंत्री अजित पवारांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या महिला प्रदेशाध्यक्ष रुपाली चाकणकर आणि नेत्या रूपाली पाटील ठोंबरे यांच्यातील वाद संपूर्ण महाराष्ट्रात चर्चेचा विषय ठरला आहे. फलटण येथील महिला डॉक्टरच्या आत्महत्या प्रकरणात चाकणकर यांनी पीडितेचे चरित्रहनन केल्याचा आरोप ठोंबरे यांनी केला

### पश्चिम बंगाल: बीरभूम जिल्ह्यातून २० हजार जिलेटीन छड्या जप्त

कोलकाता, १२ नोव्हेंबर : राजधानी दिल्लीतील कारस्फोटानंतर देशभरात अलर्ट लागू असून त्याच दरम्यान पश्चिम बंगाल पोलिसांनी बीरभूम जिल्ह्यातून २० हजार जिलेटीन छड्या जप्त केल्या आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात स्फोटक पदार्थ सापरल्याने दिल्ली आणि पश्चिम बंगाल यांचा संबंध शोधण्यात सुरू आहे. तसेच या दोन घटनांमध्ये काही संबंध आहे का आणि दिल्लीप्रमाणेच बंगळाला हादरवण्यासाठी काही आतंकवादी षडयंत्र रचले जात होते का ?याचा

# शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष-चिन्हाबाबत २१ जानेवारीला एकत्रित सुनावणी

नवी दिल्ली, १२ नोव्हेंबर - राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि शिवसेना (उबाठा) यांनी पक्ष व चिन्हाबाबत दाखल केलेल्या दोन्ही याचिकांमधील मुद्दे समान आहेत. त्यामुळे सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणांची एकत्रित सुनावणी घेण्यास अखेर सहमती दर्शविली. या विषयांवरील पुढील सुनावणी २१ जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. गेल्या काही वर्षांपासून खरी शिवसेना कोणती आणि खरी राष्ट्रवादी कोणती?, या महाराष्ट्रासह देशासमोर निर्माण झालेल्या पेचाचे उत्तर मिळणार का, याकडे साऱ्यांचे लक्ष लागले आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या पक्ष-चिन्ह प्रकरणाची पुढील सुनावणी २१ जानेवारी २०२६ रोजी होणार असून, दोन्ही पक्षांना युक्तिवादासाठी दोन-दोन तासांचा वेळ देण्यात आला आहे. सुनावणी सकाळी ११.३० वाजता पार पडणार आहे.




**'कोर्ट इज ऑन ट्रायल' - वकील असीम सरोदे**

दरम्यान ठाकरे गटाचे वकील असीम सरोदे यांनी न्यायालयाच्या विश्वासार्हतेवरच प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. 'कोर्ट इज ऑन ट्रायल' असं म्हणायला पाहिजे. कोर्टाचीच आता ट्रायल आहे की ते किती लवकर या संदर्भातील निर्णय देतात, असे मत सरोदे यांनी व्यक्त केले आहे. यासोबतच, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या प्रकरणावरही सुनावणी होणार असल्याने या दिवसाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

निवडणूक आयोगाने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या गटाला मूळ पक्ष आणि चिन्ह दिल्याच्या निर्णयाला शिवसेना (उबाठा) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले आहे. तर दुसरीसडे अजित पवार गटाला मूळ पक्ष आणि चिन्ह दिले होते. त्या निर्णयाला राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाकडून आव्हान देण्यात आले होते. या दोन्ही सुनावणीकडे संपूर्ण महाराष्ट्राचे लक्ष लागले आहे.

यावर सर्वोच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती सूर्यकांत आणि जयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने बुधवारी (१२ नोव्हेंबर) पुढील सुनावणीपर्यंत हे प्रकरण पुढे ढकलले. आवश्यक असल्यास २२ जानेवारी रोजी सुनावणी सुरू ठेवण्याची परवानगी देऊन, दुसऱ्या दिवशी इतर कोणत्याही तातडीच्या बाबींची यादी करू नये, असे निर्देशही दिले. शिवसेना (उबाठा) कडून ज्येष्ठ वकील अभिषेक मनु सिंघवी आणि देवदत्त कामत, तर दुसऱ्या बाजूने ज्येष्ठ वकील मुकुल रोहतगी आणि एन.के. कौल उपस्थित राहिले.

# दिल्ली बॉम्बस्फोट: पंतप्रधान मोदींनी एलएनजेपी रुग्णालयात दिली भेट

नवी दिल्ली , १२ नोव्हेंबर : पंतप्रधान नरेंद्र मोदी आज भुटानच्या त्यांच्या दोन दिवसीय दौर्यावरून परतले आहेत. भुटानहून परतल्यानंतर पंतप्रधान मोदी थेट एलएनजेपी रुग्णालयात पोहोचले आणि दिल्लीतील स्फोटात जखमी झालेल्या लोकांची भेट घेतली. दरम्यान, पंतप्रधान मोदी रुग्णालयात येणार असल्याची माहिती मिळताच दिल्ली पोलिस सतर्क मोडवर गेले आहेत.

माहितीनुसार, दिल्लीतील लाल किल्ल्याजवळ झालेल्या स्फोटात जखमी झालेल्यांची भेट घेण्यासाठी पंतप्रधान मोदी लोकनायक रुग्णालयात पोहचले. यावेळी त्यांनी जखमींशी संवाद साधला आणि त्यांना लवकर बरे होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. रुग्णालयातील अधिकारी आणि डॉक्टरांनी पंतप्रधानांना संपूर्ण परिस्थितीची माहिती दिली. यावेळी पंतप्रधान म्हणाले, या कटाच्या मागे जे लोक आहेत, त्यांना न्यायाच्या कठघऱ्यात उभे केले जाईल. दोषी कितीही असले तरी त्यांना क्षमा केली जाणार नाही.

दरम्यान, पंतप्रधान मोदी रुग्णालयात येणार असल्याची माहिती मिळताच दिल्ली पोलिसांनी आयटीओवरील बहादुरशाह झफर मार्गावर उभ्या असलेल्या सर्व वाहनांना हटविण्याचे आदेश दिले आहेत. तसेच त्या परिसरातील सर्व दुकाने बंद ठेवण्याचे निर्देश जारी करण्यात आले आहेत. दिल्ली पोलिसांनी इशारा दिला आहे की, २० मिनिटांत परिसर रिकामा न केल्यास क्रेनद्वारे वाहन हटवले जातील. पीसीआर व्हॅनमधून सतत सूचना दिल्या जात आहेत.

# बिहारमध्ये ६६.९१ टक्के विक्रमी मतदानाची नोंद

## एग्झिट पोलच्या अंदाजानुसार एनडीएला बहुमत

पटना, १२ नोव्हेंबर : बिहार विधानसभा निवडणूक २०२५ मध्ये विक्रमी ६६.९१ टक्के मतदान झाले आहे. महिलांनी पुरुषांपेक्षा अधिक प्रमाणात मतदान केले. राजकीय विश्लेषकांच्या मते, एनडीए सरकारच्या विविध योजनांमुळे या वेळी प्रचंड मतदान झाले. एग्झिट पोलच्या अंदाजानुसार, एनडीएला स्पष्ट बहुमत मिळण्याचा अंदाज आहे. आंतरराष्ट्रीय निरीक्षकांनी निवडणूक प्रक्रिया सुबद्ध आणि पारदर्शक असल्याचे मत व्यक्त केले आहे.

देशाच्या स्वातंत्र्यानंतर बिहार विधानसभा निवडणुकांच्या इतिहासात २०२५ मध्ये मतदारांनी नवा विक्रम प्रस्थापित केला आहे. पहिल्यांदाच ६६.९१ टक्के मतदान झाले. पहिल्या टप्प्यात ६ नोव्हेंबर रोजी ६५.०८ टक्के मतदान झाले होते, तर दुसऱ्या टप्प्यात मंगळवारी ६८.७६ टक्के मतदान झाले. सर्व २४३ मतदारसंघांमध्ये किरकोळ घटनांखेरीज मतदान शांततेत पार पडले. पुरुष मतदारांची टक्केवारी ६२.८ टक्के तर महिला मतदारांची ७१.६ टक्के इतकी होती. राजकीय विश्लेषकांच्या म्हणण्यानुसार, या मोठ्या मतदानामागे एनडीए सरकारच्या योजनांचा मोठा वाटा आहे. मुख्यमंत्री रोजगार योजनेअंतर्गत जीविका समूहाशी संलग्न प्रत्येक कुटुंबातील महिलेला १० हजार रुपये आणि सुमारे दोन कोटी कुटुंबांना दरमहा १२५ युनिट वीज मोफत देण्यात येत आहे. याशिवाय इतरही काही कारणे आहेत.

**मतदान वाढण्याची कारणे**

१. दिवाळी आणि छठ सणांच्या काळात इतर राज्यांतून बिहारला परतलेल्या मतदारांसाठी १३ हजारांहून अधिक विशेष गाड्या चालवण्यात आल्या २. मतदार यादीचे विशेष पुनरावलोकन (एसआयआर) व विविध पक्षांच्या घोषणा आणि लाभ योजनांचा परिणाम झाला.

## सामान्य माणसांच्या प्रश्नांना न्याय देणारे वृत्तपत्र - महंत वाकोजी बुवा

# धाराशिव जिल्हा आवृत्ती नुतन कार्यालय थाटात उद्घाटन






धाराशिव - तरुण भारत हे आपल्या राष्ट्रीयतावादी दृष्टिकोन विषयांवरील ठोस भूमिका, आणि सांस्कृतिक राष्ट्रवादासह भारतीय सांस्कृतिक मूल्यांवर आधारित विषयांवर परखडपणे लिखाण करत सामान्य माणसांच्या प्रश्नांना न्याय देणारे दैनिक आहे मत श्री तुळजाभवानी मातेचे महंत वाकोजी बुवा यांनी जिल्हा आवृत्ती कार्यालय उदघाटन प्रसंगी व्यक्त केले.

दैनिक सोलापूर तरुण भारत धाराशिव जिल्हा आवृत्ती नुतन कार्यालय आरंभ बुधवार १२ नोव्हेंबर रोजी तरुण भारत कुटुंब प्रमुख दिलीप पेठे, श्री तुळजाभवानी मातेचे महंत वाकोजी बुवा, प्रकाशक दिलीप दुलंगे,जिल्हा संघचालक ॲड. रवींद्र कदम,जिल्हा माहिती अधिकारी विवेक खडसे, मराठवाडा आवृत्ती विभाग प्रमुख राजाराम मस्के, डॉ. सुश्रुत डंबळ,डॉ.सतीश महामुनी, पुजारी नगर फाऊंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी, बापू जगदे, अब्दुल सय्यद, बाळासाहेब शामराज, उमेश गवते, वितरण व्यवस्थापक नागसेन शिवशरण, जिल्हा प्रतिनिधी अनिल आगलावे, उपसंपादक विपीन वीर,तालुका प्रतिनिधी यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

प्रखर राष्ट्रीय विचाराचे वृतपत्र म्हणून दै. सोलापूर तरुण भारत धाराशिव जिल्ह्यात गेल्या अनेक दशकापासून वाचकांच्या पसंतीस उतरले आहे. धाराशिव नुतन कार्यालय शुभारंभ प्रसंगी जिल्ह्यातील विविध क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहत शुभेच्छा दिल्या.

# शेख हसीना बांगलादेशला परतण्यास तयार; परतीसाठीच्या सांगितल्या अटी

नवी दिल्ली , १२ नोव्हेंबर : बांगलादेशच्या माजी पंतप्रधान शेख हसीना यांनी त्यांच्या देशात परतण्याची इच्छा व्यक्त केली आहे. पण, त्यांनी यासाठी काही अटी घातल्या आहेत. शेख हसीना यांनी सांगितले आहे की, त्यांची घरी परतण्याची अट म्हणजे सहभागी लोकशाहीची पुनर्स्थापना, अवामी लीगवरील बंदी उठविणे आणि स्वच्छ, निष्पक्ष व सर्वसमावेशक निवडणुका आयोजित करणे आहे. या पार्श्वभूमीवर आता शेख हसीना यांनी देशात परतण्याची चर्चा केली आहे.



सध्या भारतात एका गुप्त ठिकाणी वास्तव्यास असलेल्या शेख हसीना यांनी एका वृत्तसंस्थेला मुलाखत दिली आहे. यामध्ये त्यांनी सध्याचे अंतरिम सरकार आणि त्यांचे प्रमुख मुहम्मद युनूस यांच्यावर भारताशी असलेले संबंध खराब करण्याचा आणि अतिरेकी घटकांना प्रोत्साहन देण्याचा आरोप केला. त्यांच्या परराष्ट्र धोरणाची तुलना अंतरिम सरकारशी करताना, त्या म्हणाल्या की, ढाका आणि नवी दिल्ली यांच्यातील विस्तृत आणि खोल संबंधांमुळे युनूस यांच्या मूर्ख कृत्यांचा ठामपणे प्रतिकार केला पाहिजे. शेख हसीना यांनी आश्रय दिल्याबद्दल भारत सरकारचे आभार मानले.


बांगलादेशात परतण्यासाठी त्यांची प्राथमिक अट बांगलादेशी लोकांची इच्छा आहे हे स्पष्ट केले. सहभागी लोकशाहीची पुनर्स्थापना. अंतरिम प्रशासनाने अवामी लीगवरील बंदी उठवावी आणि मुक्त, निष्पक्ष आणि समावेशक निवडणुका घ्याव्यात, असे त्यांनी म्हटले आहे.

बांगलादेशच्या सर्वात जास्त काळ पंतप्रधान राहिलेल्या हसीना, या काही आठवड्यांच्या हिंसक सरकारविरोधी निदर्शनांनंतर ५ ऑगस्ट २०२४ रोजी देश सोडून गेल्या. मोठ्या आंदोलनाच्या दबावाखाली, त्यांना राजीनामा द्यावा लागला. यामुळे युनूस यांच्या नेतृत्वाखाली अंतरिम सरकार स्थापन होण्यास मदत झाली. या भयानक घटनांमधून बरेच धडे शिकले आहेत यावर त्यांनी भर दिला. पुढील वर्षी फेब्रुवारीमध्ये होणाऱ्या निवडणुकांवर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केल्याचा दावा करणारे वृत्त हसीना यांनी स्पष्टपणे फेटाळून लावले. अवामी लीगशिवाय कोणतीही निवडणूक कायदेशीर ठरणार नाही असे त्या म्हणाल्या.

# दिल्ली स्फोट : गृह मंत्रालयाकडे गोपनीय अहवाल

## अनेक संशयितांना अटक, देशातील १२ राज्यांत अलर्ट

नवी दिल्ली, १२ नोव्हेंबर : दिल्लीतील स्फोटानंतर गृह मंत्रालयाकडे एक गोपनीय अहवाल पोहोचला आहे. अनेक संशयितांना अटक करण्यात आली असून १२ राज्यांमध्ये अलर्ट जारी करण्यात आला आहे. सुरक्षा यंत्रणा जलदगतीने चौकशी करत आहेत आणि संशयितांकडून चौकशी सुरू आहे, जेणेकरून घटनेचा संपूर्ण तपशील मिळू शकेल. गृह मंत्रालयाच्या अहवालात महत्त्वाची माहिती असण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.



दिल्लीमध्ये सोमवारी झालेल्या स्फोटाने संपूर्ण देश हादरला. राजधानीतील गर्दीच्या भागात उभी असलेल्या आय-२० कारमध्ये झालेल्या स्फोटात १० जणांचा मृत्यू झाला तर २६ जण जखमी झाले. स्फोट इतका तीव्र होता की आसपासच्या दुकानांचे काचे फुटले आणि जवळ उभ्या असलेल्या अनेक गाड्यांना आग लागली. घटनेची माहिती मिळताच दिल्ली पोलिस घटनास्थळी पोहोचले. फायर ब्रिगेडच्या मदतीने आग विझवण्यात आली. स्थानिक लोकांच्या मदतीने जखमी आणि मृतांना रुग्णालयात पोहोचवण्यात आले होते. या प्रकरणाच्या चौकशीत असे समोर आले की स्फोट एचआर २६ सीई- ७६७४ या क्रमांकाच्या कारमध्ये झाला होता, जी डॉ. उमर मोहम्मद चालवत होते. दिल्ली पोलिसांनी प्राथमिक चौकशी अहवाल गृह मंत्रालयाकडे सादर केला आहे. पोलिसांनी स्फोटात वापरलेल्या ळ२० कारच्या खरेदी-विक्रीचा आणि तिच्या संपूर्ण मार्गाचा मागोवा घेतला आहे.

# दिल्ली स्फोट : फरीदाबादमध्ये सापडली लाल इकोस्पोर्ट कार

नवी दिल्ली, १२ नोव्हेंबर : दिल्लीतील बॉम्बस्फोट प्रकरणात पोलिसांना मोठे यश मिळाले आहे. संशयितांनी वापरलेली दुसरी लाल रंगाची इकोस्पोर्ट कार फरीदाबादच्या खंदावली गावातून जप्त करण्यात आली आहे.

फरीदाबाद पोलिसांना या संदर्भात माहिती मिळताच तातडीने कारवाई करून गाडी आपल्या ताब्यात घेतली आहे. या कारची जप्ती तपासासाठी अत्यंत महत्त्वाची ठरू शकते, कारण या घटनेचे धागेदोरे फरीदाबादशी जोडले जात असल्याचे संकेत मिळत आहेत.



पोलिस या गाडीशी संबंधित इतर पुराव्यांचा शोध घेत असून पोलिस प्रवक्त्याने सांगितले की, फरीदाबाद पोलिसांनी लाल रंगाची इकोस्पोर्ट (डीएल १० सीके ०४५८) जप्त केली असून, तिचा संबंध दिल्ली स्फोट प्रकरणातील मुख्य संशयित डॉ. उमर उन नबी याच्याशी असल्याचा संशय आहे. ही कार खंदावली गावाजवळ उभी आढळली.

दिल्ली पोलिसांच्या वरिष्ठ सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, दहशतवादी संघटना जैश-ए-मोहम्मदच्या फरीदाबाद मॉड्यूलशी संबंधित संशयित फरीदाबादमध्ये पोलिसांच्या वाढत्या कारवाईनंतर दोन कारमधून दिल्लीला पोहोचले होते. त्यापैकी एका कारमधून (हरियाणा क्रमांकाची) लाल किल्ल्याजवळ स्फोट घडवून आणला गेला, तर दुसरी लाल रंगाची इकोस्पोर्ट कार (डीएल-१० सीके-०४५८) बेलगामपणे फिरत असल्याचे दिसून आले.

पोलिस अधिकाऱ्यांच्या मते, दोन्ही कार एकत्रच दिल्लीला पोहोचल्या आणि चांदणी चौक पार्किंगमध्येही एकत्र उभ्या होत्या. या इकोस्पोर्ट कारमध्ये एक संशयित व्यक्ती बसलेली होती आणि तो आय-२० कारमधील संशयितांशी संवाद साधत होता. स्पेशल सेलच्या अधिकाऱ्याने सांगितले की, या दोन्ही कार बदरपूर सीमारेषेतून एकत्रच दिल्लीमध्ये आल्या होत्या आणि नंतर चांदणी चौक व लाल किल्ला परिसरात फिरत होत्या.

दिल्ली पोलिस अधिकाऱ्यांनी सांगितले की, मंगळवार उशिरापर्यंत या कारबाबत किंवा त्यात बसलेल्या संशयिताबाबत कोणतीही ठोस माहिती मिळालेली नव्हती. पोलिस आता या गाडीशी संबंधित प्रत्येक छोट्या-मोठ्या तपशीलाचा शोध घेत आहेत, ज्यामुळे त्यात बसलेल्या संशयितापर्यंत पोहोचून संपूर्ण प्रकरणातील धागेदोरे जोडता येतील.

# रामनाथ कोविंद यांनी कोल्हापूरच्या श्री अंबाबाईचे घेतले दर्शन



कोल्हापूर, १२ नोव्हेंबर : माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद हे कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर आले होते. कोल्हापूर विमानतळावर जिल्हा प्रशासनाच्यावतीने स्वागत करण्यात आले. नंतर त्यांनी करवीर निवासीनी अंबाबाईचे दर्शन घेऊन विधिवत कुंकुमार्चन पूजा केली. हातकणंगले तालुक्यातील एका शैक्षणिक संकुलाच्या कार्यक्रमास उपस्थिती लावली.

माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचे कोल्हापूर विमानतळावर जिल्हाधिकारी अमोल येडगे, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस. आणि जिल्हा पोलीस अधीक्षक योगेश कुमार यांनी स्वागत केले.

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## प्रा.अनुजा कांबळे-धायगुडे यांना पीएच.डी. प्रदान



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** येथील दयानंद शिक्षण संस्थाद्वारा संचालित दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका अनुजा अरुण कांबळे (धायगुडे) यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.

प्रा. अनुजा कांबळे यांनी 'आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव वाणिज्य आणि व्यवस्थापन शिक्षणावर कोविडपूर्व व कोविडनंतर ' या अत्यंत महत्वाच्या आणि समकालीन विषयावर संशोधन केले आहे. या संशोधनासाठी त्यांना प्राचार्या डॉ. सुजाता चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे को. डीन डॉ. एच.एस. पटणे, बाह्य मार्गदर्शक अरुण गायकवाड यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या या उल्लेखनिय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उप प्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनिषा अष्टेकर आदींनी अभिनंदन केले आहे.



# लोहपुरुष पटेल यांच्या जयंतीनिमित्त पदयात्रेला लातुरात उत्स्फूर्त प्रतिसाद






**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** देशाच्या एकात्मतेचे प्रतिक आणि लोहपुरुष म्हणून ओळखले जाणारे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त लातूर शहरात पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेला शहरातील विविध महाविद्यालये, शाळा, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पदयात्रेची सुरुवात यशवंत विद्यालय आणि दयानंद कला महाविद्यालयाच्या संगीत विभागातर्फे सादर करण्यात आलेल्या देशभक्तीपर गीताने करण्यात आली. उपजिल्हाधिकारीसायली ठाकूर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून जिल्हा क्रीडा संकुल येथून पदयात्रेला प्रारंभ झाला.

केंद्र शासनाचे युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, लातूर जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर मेरा युवा भारत केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निर्देशनालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा क्रीडा संकुल मैदानापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे भार-तरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपर्यंत पदयात्रा काढण्यात आली. हातात तिरंगा आणि सरदार पटेल यांचे छायाचित्र घेऊन विद्यार्थ्यांनी दिलेल्या देशभक्तीपर घोषणांमुळे संपूर्ण वातावरण देशभक्तीमय झाले. कार्यक्रमाच्या शेवटी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला आणि राष्ट्रगीताने पदयात्रेची सांगता झाली.

लातूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, जयक्रांती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, जिल्हा युवा अधिकारी सशांक रावुला, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक डॉ. केशव आलगुले, मेरा युवा भारत केंद्राचे संजय ममदापुरे, डॉ. बाल-ाजी होकरणे, माध्यमिक शिक्षण विभागाचे ढमाले, डॉ. गौरव जवळीकर यावेळी उपस्थित होते.

या पदयात्रेत यशवंत विद्यालय, श्री शिवाजी माध्यमिक विद्यालय, केशवराज विद्यालय, मारवाडी राजस्थान विद्यालय, श्री देशिकेंद्र विद्यालय, जयक्रांती महाविद्यालय, दयानंद वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बसवेश्वर फार्मसी कॉलेज, राजर्षी शाहू महाविद्यालय, तसेच एनसीसी आणि एनएसएस विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महावीर काळे, प्रशांत साबणे प्रियंका मोरे, अश्विन स्वामी, रमेश शिंदे, संदीप भोसले आणि वेंकटेश हालींगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'सोमाणी'च्या श्रेयशची राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा इयत्ता दहावी मधील विद्यार्थी श्रेयश श्रीकांत शेळके याची राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

पुण्याच्या बालेवाडीत नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय ज्युदो स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या वयोगटातून, ७३ किलो वजनी गेटमधून श्रेयशने प्रथम क्रमांक पटकावला होता. या यशामुळे श्रेयशची मणिपूरचे राजधानी इंफाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

श्रेयश शेळके याने मिळवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. श्रेयशला क्रीडा शिक्षक रुपाली कांबळे, गोरख राठोड, माणिक हाके यांचे मार्गदर्शन लाभले.



# गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रपिता गांधींच्या मूर्तींची स्थापना

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** : रयतेचे राजे आणि हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज, विश्वाच्या कल्याणासाठीचे पंचशील तत्व-ज्ञान देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध आणि मानव केंद्रबिंदू ठेवून खेड्यांच्या विकासातूनच राष्ट्र विकास होईल हा मूलमंत्र देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा आदर्श नव्या पिढीला प्रेरणादायी व्हावा तसेच यांचा आदर्श हाच मानवातील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी उपयोगी पडेल हे जाणून विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी त्यांच्या मूर्तीची स्थापना रामेश्वर (रूई) येथे उभारण्यात आलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनात' केली.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर (रूई) यांच्या संयुक्त विद्यमाने जगा-तील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन' या वास्तूमध्ये सत्य, शांती, अहिंसा, प्रेम आणि मानव-तेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या, मानवी इतिहासातील काही उत्तुंग व पथदर्शी व्यक्तिमत्वांच्या चैतन्यदायी प्रतिकांची या ठिकाणी प्रतिष्ठापना आणि पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विश्वधर्मी मान-वतातीर्थ भवन या वास्तूचे संकल्पक, संरचना, नियोजक व निर्मितीकार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, प्रगतिशील शेतकरी हभप काशीराम दा. कराड, ऋषिकेश कराड, माईर्स एमआयटीचे कुलसचिव डॉ. रत्नदीप जो-शी, वरिष्ठ सल्लागार डॉ. संजय उपाध्ये, गिरीश दाते, संचालक डॉ. महेश थोरवे, दिलीप पाटील, विष्णू भिसे, सचिन मुंडे व योगेश पारखी उपस्थित होते.

यावेळी विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, गौतम बुद्धांचे विश्वशांतीचा संदेश देणारे तसेच पंचशीलाचे तत्वज्ञान जगाला मार्गदर्शक ठरणारे आहे. दया, क्षमा, शांती, त्याग, सेवा, समर्पणाच्या विचारांमध्येच अखिल मानव जातीचे कल्याण सामावलं आहे. तसेच स्वत्व आणि स्वाभिमान यांची शिकवणूक देत पर्यावरण स्नेही राज्याची निर्मिती करणारे रयतेचे राजे व हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रेरणादायी आदर्श हाच मानवातील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी उपयोगी आहे. भारतीय संस्कृतीचे वसुधैव कुटुंबकम व एकं सत विप्रा बहुदा वदंती हा संदेशच जगाला विनाशापासन वाचवू शकतो. हाच संदेश रामेश्वर रूई येथे साकारलेल्या एकमेवाद्वितीय अशा 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना' च्या माध्यमातून संपूर्ण जगाला देण्याचा छोटासा प्रयत्न आहे.

डॉ. रत्नदीप जोशी म्हणा-ले, जगामध्ये विद्वेषाची भावना वाढीस लागत असताना व्यक्ती व्यक्तींमधील सहसंवाद आणि स्नेहभाव वृद्धिंगत व्हावा यासाठी रामेश्वर रूई येथे विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनाची संकल्पना डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी केली. त्याची निर्मिती हेच एक मोठे आद्भुत आश्चर्य आहे. ९० फूट रूंदीचा मधला सभागृहाचा भाग हा भारतातील एकमेव द्वितीय असून या सभागृहामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक स्नेहभावाचे तसेच ग्रामीण जनतेची काळ्या मातीशी असलेली नाळ दिसून येते.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा साडेतीन फूटाचा अर्ध पुतळा विधिवत पूजन करुण बसविण्यात आला. तीन फूट सात इंचाचा अर्ध पुतळा हा पंचधातुंनी निर्मित केलेला असून त्याचे वजन १४४ किलो आहे. या मूर्तीला सुवर्ण जडीत करण्यात आले आहे. तसेच भगवान गौतम बुद्ध आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची अप्रतिम व रेखीव मूर्तीची निर्मिती करण्यात आली आहे.

# देवणीच्या विकास कामाच्या चौकशीसाठी आमरण उपोषण



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** देवणी नगर पंचायतीला विविध विकास कामासाठी आलेल्या निधीचा योग्य वापर करण्यात आ-लेला नाही, केलेल्या कामाची चौकशी करावी व झालेल्या कामाचे फलकाद्वारे माहिती प्रसिध्द करावी आदी मागण्यांसाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येत आहे.

वर्ष २०२२ पासून देवणी नगर पंचायतीला विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाला. बांधकाम, रस्ते, गटारी, दलित वस्ती, सुलभ शौचालय, पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, विद्युत पुरवठा, अग्निशमन, स्वच्छता कामगार यासाठी आलेल्या निधीची माहिती व झा-लेला खर्च, तसेच नगर पंचायतीने घेतलेल्या ठरावाची प्रोसिडींग बुक, ऑडीट रिप-ोर्ट, झालेल्या खर्चाची माहिती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली होती. त्याचप्रमाणे झालेल्या कामाचे माहितीचे फलक लावणे आवश्यक असतानाही त्याची कार्यवाही करण्यात आली नाही. बोगस व निकृष्ट दर्जाची कामे करून भ्रष्टाचार करण्यात आला. त्याची चौकशी व्हावी यासाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दीपक उमाकांत स्वामी व माधव रामराव तेलंगे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. १० नोव्हेंबरपासून उपोषण सुरू केले आहे.

# एकल महिलांसाठी राबविणार विशेष मोहीम

## रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न : जिल्हाधिकारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** जिल्ह्यातील एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ देवून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विशेष मोहीम राबविली जाणार आहे. या अंतर्गत रोजग-ार, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पुढील तीन महिन्यात या उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी, कृती कार्यक्रम निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या सूचनेनुसार सर्व शासकीय विभाग प्रमुखांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये या अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी

### विविध शासकीय विभागांची लवकरच कार्यशाळा; पुढील तीन महिन्यातील कृती कार्यक्रम निश्चित होणार

सोमनाथ रेड्डी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ, जावेद शेख, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संदीप यादव यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

एकल महिलांना शासनाच्या विविध




योजनांचा लाभ देवून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. यासोबतच त्यांच्यासाठी रोजगार, स्वयंरोजगार विषयक प्रशिक्षण आयोजित करावीत. १ डिसेंबर २०२५ पासून या अनुषंगाने पुढील तीन महिन्यांसाठी विशेष मोहीम हाती घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

# परवाने रद्द केलेली रास्तभाव दुकाने नव्याने सुरु करा : ॲड. ढवळे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** कायमस्वरुपी परवाने रद्द केलेली महाराष्ट्रातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील रास्तभाव दुकाने नव्याने जाहीरनामे काढून सुरू करण्याची सूचना राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. महेश ढवळे यांनी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला केली आहे. यामुळे राज्यात हजारो रेशन दुकाने पुन्हा सुरू होण्याची आशा निर्माण झाली असून यातून रेशन कार्डधारकांची मोठी सोय होणार आहे.

राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. महेश ढवळे यांनी याबाबत अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र लिहिले आहे. राज्य अन्न आयोग अध्यक्षांना दिलेल्या जबाबदारींच्या अनुषंगाने राज्यातील जिल्ह्यांना भेटी देऊन तेथील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा आढावा घेतल्याचे या पत्रात म्हटले आहे. यावेळी असे लक्षात आले की, राज्यात बऱ्याच जिल्ह्यांमध्ये विविध कारणांनी कायमस्वरुपी रद्द केलेली शेकडो तसेच राज्यभर हजार-ो रास्तभाव दुकाने आहेत. यापैकी न्यायप्रविष्ट प्रकरणांची संख्या तुलनेने कमी आहे, असे या पत्रात निदर्शनास आणून दिले आहे.



कायमस्वरुपी रद्द केलेल्या दुकानांचे रेशन कार्डधारक शासनामार्फत इतर रास्तभाव दुकानांना जोडणी केलेली आहेत. त्यामुळे अशा जोडणी केलेल्या प्रत्येक रास्तभाव दुकानांकडे ४ ते ५ हजार कार्डधारक लाभार्थी संख्या झा-लेली आहे. मोठ्या प्रमाणात कार्डधारक असल्याने वितरणावर ताण येत आहे. तसेच लाभार्थींना दूर अंतरांवरुन धान्य घेण्यास जावे लागत आहे. तसेच कांही नागरिकांना नैसर्गिक आपत्तीच्या घटनांमुळे लाभापासून वंचित रहावे लागत आहे. या परिस्थितींचा विचार करता अशा कायमस्वरुपी बंद दुकानांचे परव-ाने नव्याने वाटप करावेत, अशा सूचना शासनाकडून देणे आवश्यक आहे, असे ॲड. महेश ढवळे यांनी यांनी सूचित केले आहे. रास्तभाव दुकान परव-ाने वाटताना बचतगटांच्या अनुषंगाने काही निकष दिलेले आहेत. त्यामध्ये समाजातील वंचित घटकांकरिता काम करणाऱ्या संस्था, युवकांकरिता, विधवा, परित्यक्ता, अल्पभूधारक, अत्यल्प भूधारक, अपंग, तृतीयपंथी यांचे बचतगट यांचा देखील समावेश करावा, जेणेकरुन बेरोजगार घटकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. त्यासाठी तसा सुधारित शासन आदेश निर्गमित करावा, असेही अध्यक्ष ॲड. ढवळे यांनी या पत्राद्वारे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना सूचित केले आहे.

# माहिती कार्यालयातील रद्दी खरेदीसाठी दरपत्रके सादर करा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** जिल्हा माहिती कार्यालय, येथील वृत्तपत्रांची व मासिकांची रद्दी विक्री करण्यात येणार आहे. यासाठी नोंदणकृत रद्दी खरेदीदारांनी आपली दरपत्रके २१ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्हा माहिती कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छूक रद्दी खरेदीदारांनी आपले दरपत्रके बंद लिफाफ्यात जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्येवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, उत्तर बाजू, लातूर या पत्यावर २१ नोव्हेंबर २०२५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत. रद्दी खरेदीदाराकडे इलेक्टॉनिग वजन काटा असणे बंधनकारक आहे. या संदर्भातील अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात पाहता येतील. दरपत्रकात वृत्तपत्र रद्दी, मासिके रद्दी व पेपर गोळा याचे स्वतंत्र दर नमूद करावेत, रद्दी विक्रीचे दरपत्र मंजूर करणे अथवा रद्द करणे, तसेच संपुर्ण रद्दी विक्री प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी, लातूर यांना राहतील.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com



**आ. प्रशांतजी बंब यांनी आज वेरूळ येथील समंतभद्र विद्यामंदिर येथे शाळेला भेट घेऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले यावेळी भाजपचे छत्रपती संभाजी नगर जिल्हा उपाध्यक्ष प्रकाश वाकळे घृष्णेश्वर देवस्थान अध्यक्ष कुणाल दांडगे जिल्हा सरचिटणीस गणेश हजारी ज्ञानेश्वर नलावडे राजेंद्र बडे प्रेमचंद पाटणी मुख्याध्यापक गुलाबचंद बोराळकर क्रीडा शिक्षक आशिष कानडे सचिन अन्नदाते मान्यवरांची उपस्थिती होती.**

## भव्य इंडिया टूर २०२५ साठी सहयोग

बेंगळुरू,: टोयोटा किर्लोस्कर मोटरने जपानमधील जागतिक स्तरावर प्रशंसित परफॉर्मन्स ग्रुप ड्रम टाओसोबत सहयोगाने आज ड्रम टाओ इंडिया टूर २०२५ साठी अधिकृत वेळापत्रकाची घोषणा केली. या सहयोगामधून कलात्मक उत्कृष्टता आणि आंतर सांस्कृतिक संबंधाचे संयोजन दिसून येते, जेथे दोन देश एकत्र आले आहेत, जे परंपरा, नाविन्यता आणि सर्जनशीलतेप्रती आदर व्यक्त करतात. टोयोटाचा ड्रम टाओसोबत सहयोग ब्रँडचे तत्त्व 'मोबिलिटी फॉर ऑल' सादर करतो, जेथे संबंध गतीशीलतेपलीकडे जात संकल्पना, सर्जनशीलता आणि मानवी उत्साहाला चालना देतात. या सहयोगाच्या माध्यमातून टीकेएम जपान व भारतामधील संबंधाला साजरे करते, सांस्कृतिक व्यवहार आणि भारतातील तरूणांसोबत अर्थपूर्ण सहभागाला चालना देते.

## सिम्बॉयसिस एमबीए अभ्यासक्रमासाठी अर्ज करण्याची अखेरची संधी

मुंबई : सिम्बॉयसिस इंटरनॅशनल (अभिमत विद्यापीठ)तर्फे त्यांच्या सिम्बॉयसिस नॅशनल ॲप्टिट्यूड (स्नॅप) टेस्ट २०२५ च्या नोंदणीसाठी २० नोव्हेंबर ही अंतिम तारीख जाहीर करण्यात आली आहे. एमबीए इच्छुकांसाठी ही राष्ट्रीय पातळीवरील प्रवेश परीक्षा आहे. उत्कृष्ट शैक्षणिक कारकिर्दीच्या पाच दशकांहून अधिक अनुभवासह सिम्बॉयसिस हा मॅनेजमेंट शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी कायमच प्राधान्यक्रम राहिला आहे. कारण, हा अभ्यासक्रम जागतिक पातळीशी सुसंगत, उद्योगक्षेत्राशी संबंधित आणि सखोल अभ्यास असलेला आहे. यानंतर अर्ज करण्यासाठी अधिक मुदत दिली जाणार नाही.इच्छुकांनी अंतिम तारखेच्या आधी त्यांच्या अर्जाची प्रक्रिया पूर्ण करावी असे आवाहन करण्यात आले आहे. ही कम्प्युटर-बेस्ड टेस्ट (सीबीटी) तीन तारखांना घेतली जाईल आणि उमेदवारांना तीन वेळा परीक्षा देता येईल. प्रवेश प्रक्रियेसाठी यातील सर्वोत्तम गुण ग्राह्य धरले जातील.

## डिजिटल इन्शुरर ऑफ द इयर पुरस्कार जिंकला

मुंबई : भारतातील अग्रगण्य नवयुगीन डिजिटल फुल-स्टॅक विमा कंपनी गो डीजिट जनरल इन्शुरन्स लिमिटेड (डिजिट इन्शुरन्स) ने जाहीर केले की तिला सिंगापूर येथे झालेल्या आशिया इन्शुरन्स इंडस्ट्री अवॉर्ड्स (एआयआयए) २०२५ मध्ये दोन पुरस्कार मिळाले आहेत. कंपनीला डिजिटल इन्शुरर ऑफ द इयर पुरस्काराने सन्मानित करण्यात आले, तर व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी जसलीन कोहली यांना वूमन लीडर ऑफ द इयर पुरस्कार मिळाला, ज्यामुळे त्या हा सन्मान मिळवणाऱ्या पहिल्या भारतीय महिला ठरल्या.

## मोटर क्सिडेंट इन्श्युरन्स घोटाळ्याचा पर्दाफाश

नाशिक : भारतातील आघाडीची खासगी जनरल इन्श्युरन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडने (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी) बनावट थर्ड-पार्टी नुकसानभरपाईच्या दाव्याच्या आधारे २५ कोटींच्या मोटर क्सिडेंट इन्श्युरन्स फसवणुकीचा यशस्वीपणे पर्दाफाश केला आहे. भूज येथील मोटर अपघात दावा लवाद (च-उढ) मध्ये सादर केलेली बनावट एफआयआर आणि दिशाभूल करणाऱ्या कागदपत्रांच्या माध्यमातून ही फसवणूक उजेडात आली.

## बलिदानाविषयीच्या पारंपरिक कल्पनेला शह

स्वतःचे बलिदान देणाऱ्या महिलेचे चित्रण करण्याची टेलिव्हिजनची परंपरा मोडीत काढत सोनी सबवरील 'इत्ती सी खुशी' मालिकेने अन्विता (सुंबुल तौकीर खान) ही व्यक्तिरेखा सादर केली आहे, जी परंपरेचा विरोध करण्याचे धाडस दाखवते. एरवी टीव्ही मालिकांमधील महिला या त्यागमूर्ती आणि अत्यंत सोशिक असतात. पण, या मालिकेत अन्विताने आपल्या वडिलांना लिव्हर दान करण्यासाठी आपण पात्र असल्याचे कळल्यानंतरही ते दान न करण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. तिचे वडील अत्यंत गंभीर स्थितीत आहेत आणि तातडीने लिव्हर ट्रान्सप्लांट केल्यानेच ते जगू शकणार आहेत. पण अन्विता भावनेच्या भरात निर्णय घेत नाही. उलट, ती परिणामांचा शांतपणे विचार करते - खास करून तिच्यावर अवलंबून असलेल्या आपल्या पाच धाकट्या भावंडांचा विचार करते. तिच्यासाठी तिचे स्वतःचे आरोग्य जपणे हा स्वार्थी विचार नसून आपल्या कुटुंबाचे भविष्य सुरक्षित करण्याचा मार्ग आहे.

## २५ कोटींच्या मोटर क्सिडेंट इन्श्युरन्स फसवणुकीचा यशस्वीपणे पर्दाफाश

पुणे : भारतातील आघाडीची खासगी जनरल इन्श्युरन्स कंपन्यांपैकी एक असलेल्या बजाज जनरल इन्श्युरन्स लिमिटेडने (पूर्वीची बजाज आलियान्झ जनरल इन्श्युरन्स कंपनी) बनावट थर्ड-पार्टी नुकसानभरपाईच्या दाव्याच्या आधारे २५ कोटींच्या मोटर क्सिडेंट इन्श्युरन्स फसवणुकीचा यशस्वीपणे पर्दाफाश केला आहे. भूज येथील मोटर अपघात दावा लवाद मध्ये सादर केलेली बनावट एफआयआर आणि दिशाभूल करणाऱ्या कागदपत्रांच्या माध्यमातून ही फसवणूक उजेडात आली. भारतीय दंडविधान संहिता आणि मोटर वाहन कायदा अंतर्गत साणंद पोलीस स्थानकात एफआयआर दाखल करण्यात आली होती. तक्रार दाखल केलेल्या कथित वाहनचालकाने असे दावा केला होता की, आपण (वाहनचालक) महिंद्रा झायलो हे वाहन चालवित असताना रस्त्यावर समोरुन अचानक कुत्रा आल्याने गाडी पलटली. तसेच त्याने तक्रारीत असे म्हटले होते की, गाडीतील सह-प्रवासाला अपघातात जीवघेणी दुखापत झाली आणि त्याला साणंद सरकारी रुग्णालयात दाखल केले असता मृत घोषित करण्यात आले.

## आईक्यू ने २० नोव्हेंबरपासून आईक्यू १५ साठी प्री-बुकिंगची घोषणा केली आहे

नवी दिल्ली, १२ नोव्हेंबर, २०२५: उच्च-कार्यक्षमता असलेला स्मार्टफोन ब्रँड,आईक्यू २६ नोव्हेंबर रोजी आईक्यू१५ लॉंच करण्यासाठी सज्ज आहे. स्मार्टफोन इनोव्हेशनमध्ये नवीन मानके स्थापित करत,आईक्यू १५ प्रीमियम कामगिरीसह प्रगत कॅमेरा, सॉफ्टवेअर क्षमता आणि एआय क्षमता, एक आकर्षक डिझाइन, विस्तारित बॅटरी लाइफ आणि इमर्सिव्ह डिस्प्ले तंत्रज्ञानाचा मेळ घालते जे एक अतुलनीय स्मार्टफोन अनुभव प्रदान करते. आईक्यू १५ ची प्री-बुकिंग २० नोव्हेंबर २०२५ पासून सुरू होईल. ग्राहक त्यांचा फोन प्री-बुक करण्यासाठी १००० रुपये परत करण्यायोग्य रक्कम देऊन प्रायोरिटी पास मिळवू शकतात. प्रायोरिटी पाससह, तुम्हाला विशेष प्री-बुकिंग फायदे देखील मिळतील, ज्यामध्ये आईक्यू टीडब्ल्यूएस १ई इयरबड्सची एक मोफत जोडी आणि १२ महिन्यांची वाढीव वॉरंटी समाविष्ट आहे. प्रायोरिटी पास मर्यादित आहेत आणि प्रथम येणाऱ्यास प्रथम प्राधान्य या तत्त्वावर दिले जातील.



## सौ. मनीषा श्याम जोशी यांचे निधन

तभा वृत्तसेवा,

बिडकीन - दि. १२ नोव्हेंबर-बिडकीन येथील सौ. मनीषा श्याम जोशी (वय ४५ वर्ष) यांचे आज दि. १२ नोव्हेंबर रोजी दुपारी चार वाजता दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर आज रात्री आठ वाजता शेकटा रोडवरील अमरधाम स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, दिर व सासू असा परिवार आहे. त्या श्याम जोशी (देवा) यांच्या पत्नी होत.

# ग्राहकाभिमुख सेवा देण्यासाठी युनियन बँक ऑफ इंडिया कटिबद्ध : सुनिल कुमार यादव

## १०७ व्या स्थापना दिनानिमित्त ग्राहक मेळावा संपन्न



अहिल्यानगर : सार्वजनिक क्षेत्रातील बँकांमध्ये देशात ०५ व्या स्थानावर असलेली युनियन बँक ऑफ इंडिया चौफेर प्रगती करत असून अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून ग्राहकाभिमुख सेवा देण्यात कटिबद्ध असल्याचे प्रतिपादन युनियन बँक ऑफ इंडियाच्या अहिल्यानगर क्षेत्रीय कार्यालयाचे प्रमुख सुनिलकुमार यादव यांनी केले. बँकेच्या १०७ व्या स्थापना दिनानिमित्त आयोजित ग्राहक मेळाव्यात श्री यादव बोलत होते.

बँकेच्या स्थापनेविषयी सांगताना ते म्हणाले की, बँकेची स्थापना ११ नोव्हेंबर १९१९ रोजी झाली. शेठ सिताराम पोतदार हे प्रवर्तक होते. मुख्यालयाच्या इमारतीचे उद्घाटन राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या हस्ते १९२१ मध्ये झाले.

आज बँकेच्या ८६०० हून अधिक शाखा आहेत. ९००० हून अधिक एटीएम, २५ हजाराहुन अधिक बीसी पॉईंट्स, ७५ हजारहून अधिक कर्मचारी आहेत.

बँकेच्या प्रगती विषयी श्री यादव यांनी सांगितले की,

सप्टेंबर २०२५ अखेर बँकेचा एकूण व्यवसाय २२.०९ लाख कोटी आहे. यामध्ये १२.३४ लाख कोटींच्या ठेवी व ९.७५ लाख कोटींचे कर्ज वितरण आहे. बँकेचा शाखा विस्तार परदेशात देखील असून हाँगकाँग येथे ३, दुबई इंटरनॅशनल फायनान्शिअल सेंटर व सिडनी ऑस्ट्रेलिया येथे प्रत्येकी १, अबुधाबी येथे प्रतिनिधी कार्यालय, लंडन, मलेशिया आदी ठिकाणी शाखा विस्तार आहे.

अशा या गौरवशाली १०७ वर्षांची परंपरा असलेल्या युनियन बँक ऑफ इंडियाच्या प्रगतीमध्ये सर्व खातेदार ग्राहक, कर्जदार, अधिकारी व कर्मचारी यांचे योगदान मोलाचे असल्याचे

यावेळी श्री यादव म्हणाले.

१०७ व्या स्थापना दिनानिमित्त मुंबई येथे आयोजित ग्राहक मेळाव्यामध्ये

भारत सरकारच्या अर्थ मंत्रालयाच्या आर्थिक सेवा विभागाचे सचिव एम. नागाराजू हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. त्यांच्या शुभहस्ते व्यावसायिकांसाठी अत्यंत उपयुक्त असलेल्या युनियन बीझ या मोबाईल पचे तर रिटेल ग्राहकांसाठी युनियन इझ या मोबाईल पचे लॉन्चिंग करण्यात आले. याच बरोबर देशातील ५१ नवीन शाखांचे ऑनलाइन उद्घाटन एम. नागाराजू यांचे हस्ते करण्यात आले. यामध्ये अहिल्यानगर एमआयडीसी नागापूर येथील शाखेचा समावेश आहे. विकसित भारत २०४७ या भारत सरकारच्या महत्त्वाकांक्षी उपक्रमामध्ये युनियन बँक ऑफ इंडिया महत्त्वपूर्ण भूमिका बजावेल, असा विश्वास देखील एम. नागाराजू यांनी यावेळी व्यक्त केला.

मुंबई येथे झालेल्या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण अहिल्यानगर येथील ग्राहक मेळाव्याच्या वेळी करण्यात आले. यावेळी उप क्षेत्रप्रमुख अमित कुमार सिन्हा, सुभाष गजभिये यांसह विविध शाखा प्रमुख, विभाग प्रमुख अधिकारी - कर्मचारी, ग्राहक, शुभचिंतक, कर्जदार, खातेदार आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कन्नड पंचायत समिती शिक्षण विभागात दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ॲलिम्को मोजमाप व साहित्य वाटप शिबिर संपन्न

तभा वृत्तसेवा

कन्नड : दि.१२ नोव्हेंबर - पंचायत समिती शिक्षण विभागाच्या वतीने दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी ॲलिम्को मोजमाप व साहित्य साधन वाटप शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिरात तालुक्यातील विविध शाळांमधील दिव्यांग विद्यार्थ्यांना त्यांच्या गरजेनुसार सहाय्यक साहित्याचे वितरण करण्यात आले.

या उपक्रमात एकूण ६१ दिव्यांग विद्यार्थ्यांना साहित्य साधनांचे वाटप करण्यात आले, तर ८१ विद्यार्थ्यांचे मोजमाप घेण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान शिक्षण विस्तार अधिकारी दिवेकर यांनी भूषविले, तर प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा समन्वयक (समावेशित शिक्षण) गणेश बेडके उपस्थित होते.



कार्यक्रमात मान्यवरांनी विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देत सांगितले की, दिव्यांग विद्यार्थी हे समाजाचे अविभाज्य घटक आहेत. योग्य प्रोत्साहन, शिक्षणसुविधा आणि प्रेम मिळाल्यास ते उज्ज्वल भविष्य घडवू शकतात. समाजाने त्यांच्या विकासासाठी संवेदनशीलतेने योगदान द्यावे.

साहित्य मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद झळकला. पालकांनी शिक्षण विभाग व प्रशासनाचे मनःपूर्वक आभार मानले.

शिबिर यशस्वी रित्या पार पडण्यासाठी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी, शिक्षणाधिकारी, उपशिक्षणाधिकारी आणि गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली समावेशित शिक्षण विभागातील नितीन वाघ, कडुबा भुसारी, उत्तम आघाडे, प्रशांत अहिरराव, प्रविण वाकेकर, अयुब सय्यद, युनूस सय्यद, असिफ शेख, निलम परदेशी, अलका गंगुले, दीपा पवार, खुशाल राठोड तसेच सर्व केंद्रप्रमुख व केंद्रीय मुख्याध्यापक यांनी योगदान दिले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उत्तम आघाडे यांनी केले, तर आभार प्रदर्शन प्रविण वाकेकर यांनी मानले.

# १३ डिसेंबर रोजी जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन

अहिल्यानगर, दि. १२ :* राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांच्या निर्देशानुसार, अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व न्यायालयांमध्ये शनिवार, दि. १३ डिसेंबर २०२५ रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन करण्यात येणार आहे.

या लोकअदालतीत मोटार वाहन अपघात प्रकरणे, कौटुंबिक प्रकरणे, वीज वितरण कंपनीशी संबंधित प्रकरणे, दिवाणी तसेच तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, तसेच बँका आणि वीज वितरण कंपन्यांची दाखलपूर्वीची प्रकरणे यांचा समावेश करण्यात येणार आहे. याशिवाय कौटुंबिक न्यायालय, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय, सहकार न्यायालय आणि ग्राहक तक्रार निवारण मंचातील प्रकरणे देखील या लोकअदालतीत तडजोडीसाठी ठेवण्यात येणार आहेत.

लोकअदालतीमध्ये प्रकरण तडजोडीने मिटविल्यास संबंधित पक्षकारास भरलेली न्यायालयीन फी परत मिळते. नागरिकांनी आपापसातील वाद सामोपचाराने मिटवून वेळ, पैसा आणि मानसिक ताणतणाव वाचवावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

# 'अमृत दुर्गोत्सव'ची विश्वविक्रमाला गवसणी!!

पुणे (दिनांक १० नोव्हेंबर २०२५) : महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) या महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेने ऐतिहासिक कामगिरी करत विश्वविक्रमी झेप घेतली आहे. 'अमृत' मार्फत या दिवाळीत ''अमृत दुर्गोत्सव २०२५' हा एक आगळावेगळी उपक्रम राबविण्यात आला.

या उपक्रमाचा उद्देश महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराजांचे शौर्य, पराक्रम, संस्कृती रक्षण, स्वभाषा, स्वधर्म यासारख्या अनेक गुणांना उजाळा देऊन अनेकांच्या मनावर सुसंस्कार करणे, या दृष्टीने समाजमन घडविणे आणि शिवाजी महाराजांना विश्वविक्रमी मानवंदना देणे हा होता. यासाठी महाराजांच्या पराक्रमाची साक्ष असलेले आणि युनेस्कोने जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित केलेल्या बारा दुर्गांपैकी कोणत्याही एकाची प्रतिकृती अंगणात, सोसायटी, शाळेत, मैदानात तयार करून त्यासोबत फोटो घेऊन तो ''अमृत दुर्गोत्सव २०२५' च्या वेबसाईटवर अपलोड करायचा होता. सहभागी होणाऱ्या प्रत्येकास माननीय मुख्यमंत्री यांच्या स्वाक्षरीचे अभिनंदन पत्र मिळणार होते.

अमृतचे व्यवस्थापकीय संचालक मा. विजय जोशी यांचे उत्तम नियोजन आणि अमृत कर्मचाऱ्यांच्या प्रचंड मेहनतीच्या जोरावर हा केवळ शासकीय उपक्रम न राहता त्याला लोकोत्सवाचे रूप प्राप्त झाले. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून मिळालेला उत्स्फूर्त प्रतिसाद, शेजारील राज्ये, इतकेच काय अमेरिका, इंग्लंड, आखाती देशातून मिळालेला भावनिक प्रतिसाद याद्वारे ''अमृत दुर्गोत्सवात' प्रचंड प्रमाणात दुर्गांसोबत घेतलेले फोटो जमा झाले. ही संख्या इतकी प्रचंड होती की या गोष्टीची नोंद 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' या विश्वविक्रमांची नोंदणी करणाऱ्या जगातील सर्वात प्रतिष्ठित संस्थेने घेतली.

'मानवी हातांनी तयार केलेल्या प्रतिकृतींचा सर्वात मोठा डिजिटल फोटो अल्बम' या श्रेणीमध्ये 'अमृत दुर्गोत्सवात' विश्वविक्रम झाल्याचे प्रमाणपत्र गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड' चे -वर्क्षीवळलर्री प्रतिनिधी श्री. प्रवीण पटेल यांच्या हस्ते अमृतचे व्यवस्थापकीय संचालक मा. विजय जोशी यांना सुपूर्द केले.

यावेळी बोलताना 'गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड ' चे अधिकृत पंच श्री प्रवीण पटेल यांनी सदर विश्वविक्रमाची कठीण तपासणी प्रक्रिया सर्वांपुढे मांडली.

# एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयात 'आशाछाया' कार्यशाळा संपन्न



छत्रपती संभाजीनगर, दि.१२: महात्मा गांधी मिशन वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालयातील ट्युलिप ब्रेस्ट सेंटर आणि जिल्हा आरोग्य अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'आशाछाया' स्तन कर्करोग प्रशिक्षण कार्यशाळा अत्यंत उत्साहात पार पडली. समाजातील महिलांच्या स्तन आरोग्याबद्दल जागरूकता वाढविण्याच्या आणि स्तन कर्करोगाचे निदान लवकर व्हावे, ह्या उद्देशाने आयोजित या कार्यशाळेला जिल्ह्यातील विविध प्राथमिक आरोग्य केंद्रांमधील तालुका आरोग्य अधिकारी, वैद्यकिय अधिकारी आणि आशा संचालक असे सुमारे १८० जण सुमारे उपस्थित होते.

उद्घाटन सोहळा टाटा हॉस्पिटल मुंबईचे माजी संचालक पद्मश्री डॉ.राजेंद्र बडवे, एमजीएमचे उपाध्यक्ष डॉ.पी.एम. जाधव आणि दुरदृशप्रणालीद्वारे टाटा हॉस्पिटलचे माजी शैक्षणिक संचालक डॉ.कैलाश शर्मा यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाला. यावेळी, डॉ.अरविंद गायकवाड, शासकिय कर्करोग रूग्णालय जिल्हा प्रजनन व बाल आरोग्य अधिकारी डॉ.विशाल बेंद्रे, अतिरिक्त जिल्हा अधिकारी डॉ. सावरगावकर, एमजीएम वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र बोहरा, इंडियन कॅन्सर सोसायटीचे डॉ.प्रसाद राणे, एन्ड्रेस ॲन्ड हौसरच्या चीफ फायनान्स ऑफीसर स्मिता भारतीया यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन करण्यात आले.

प्रास्ताविकात ट्युलिप ब्रेस्ट सेंटरच्या संस्थापक आणि प्रोजेक्ट डायरेक्टर डॉ.अरुणा कराड यांनी कार्यशाळेचे उद्दिष्ट आणि महत्त्व सांगितले. त्यांनी सांगितले की, स्तन कर्करोगावर मात करण्यासाठी जागरूकता, तपासणी आणि योग्य वेळी उपचार हेच सर्वात प्रभावी शस्त्र आहेत. आशा कार्यकर्त्या या समाजातील प्रत्येक घरापर्यंत आरोग्यसंदेश पोहोचवणाऱ्या खऱ्या आरोग्यदूत आहेत.

कार्यक्रमादरम्यान डॉ. आशुतोष तोंडारे (स्तन विकार तज्ञः,प्रोजेक्ट डायरेक्टर, ट्युलिप ब्रेस्ट सेंटर) यांनी क्लिनिकल ब्रेस्ट एक्झामिनेशनचे प्रात्यक्षिक सादर केले. उपस्थित प्रतिनिधींनी प्रत्यक्ष प्रशिक्षण घेतले आणि त्यांच्या अनेक शंकांचे निरसनही यावेळी करण्यात आले. स्तनाच्या अचूक परीक्षणाने, कर्करोग लवकर शोधून जीव आणि स्तन दोन्ही वाचवले जावू शकतात, असे डॉ.आशुतोष यांनी सांगितले.

कार्यशाळेदरम्यान ब्रेस्ट कॅन्सरची लक्षणे, तपासणी पद्धती, प्रतिबंधात्मक उपाय आणि उपचार पर्याय या विषयांवर सविस्तर माहिती देण्यात आली. या कार्यशाळेबाबत उपस्थितांनी अत्यंत सकारात्मक अभिप्राय दिला. अनेक सहभागींनी सांगितले की, या कार्यशाळेमुळे त्यांना प्रत्यक्ष काम करताना अधिक आत्मविश्वास आणि ज्ञान मिळाले आहे.

या कार्यक्रमाचे संपूर्ण आयोजन आणि मार्गदर्शन डॉ. अरुणा कराड आणि डॉ.आशुतोष तोंडारे यांनी केले. या यशस्वी उपक्रमामुळे छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात स्तन कर्करोगविषयी जनजागृती आणि प्राथमिक आरोग्यसेवेत कार्यरत आशा कार्यकर्त्यांचे प्रशिक्षण या दोन्ही क्षेत्रांत एक नवा अध्याय सुरू झाला आहे.

# सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने १४ नोव्हेंबरला संगमनेर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन

## विविध कृषी योजनांची माहिती मिळणार

अ.नगर : देशाची पहिली स्वदेशी बँक आणि राष्ट्रीयकृत बँक सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्यावतीने १४ नोव्हेंबरला संगमनेर येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती जिल्हा अग्रणी प्रबंधक आशिष नवले यांनी दिली.


सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने देशभरात क्रेडिट आऊटरीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. याद्वारे शेतकरी बांधवांना कृषी क्षेत्रासंदर्भात जनजागृती व बँकेच्या विविध कृषी योजना यासंदर्भात माहिती दिली जाणार असून या कार्यक्रमासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अहमदनगर क्षेत्रीय प्रमुख राजीव नयन यांचेसह बँकेचे वरिष्ठ अधिकारी, प्रशासनातील विविध मान्यवर उपस्थित राहणार आहेत. संगमनेर तालुक्यातील जोर्वे येथील शिव ओंकार पॅलेस

येथे आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यात शेतकरी बांधवांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन

जिल्हा अग्रणी बँक प्रबंधक आशिष नवले यांनी केले आहे.

मेळाव्यात शेतकऱ्यांना कृषी कर्ज, पीक कर्ज, पशुसंवर्धन, शेतीमाल प्रक्रिया, व नवोन्मेषी कृषी तंत्रज्ञान नवीन कृषी योजना, बँकिंग कृषी कर्ज योजना,सेंट पोल्ट्री योजना सेंट कोल्ड स्टोरेज ,सेंट फूड प्रोसेसिंग, आणि ग्रामीण आजीविका योजना याविषयी माहिती दिली जाणार आहे.

# स्मार्ट सुनबाई २१ नोव्हेंबर पासून आपल्या भेटीला




छत्रपती संभाजीनगर - १५०० रुपयांचा महिला बचत गट कुठल्या कुठे जातो यावर आधारित चित्रपटाचे कथानक , हास्य,थरार आणि गुढतेने भरलेला शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित, कार्तिक दोलताडे पाटील सह निर्मित हास्य, स्मार्ट सुनबाई २१ नोव्हेंबर २०२५ ला संपूर्ण महाराष्ट्रात प्रदर्शित होणार आहे.

संतोष जुवेकर, रोहन पाटील, भाऊ कदम, किशोरी शहाणे, सायली देवधर, मोहन जोशी, दीपक शिर्के, प्राजक्ता हनमघर, प्राजक्ता गायकवाड, उषा नाईक, अंशुमन विचारे, स्नेहल शिदम, विनम बाबल, भक्ती चव्हाण, दीप्ती सोनवणे, अनुष्का बेनके, पूजा राजपूत, सुचिका जोशी, विद्या मेहेत्रे, मोनिका बंगाळ, आर्या सकुंडे, वैशाली चौधरी, सपना पवार, कांचन चौधरी हे लोकप्रिय कलाकार या सिनेमात झळकणार असून, त्यांची केमिस्ट्रीच या चित्रपटाची खरी जमेची बाजू ठरणार आहे.

चित्रपटाची कथा आणि लेखन योगेश शिरसाट यांनी केले असून, विजय नारायण गवंडे, साई-पियुष यांनी या सिनेमाला बहारदार संगीताची साथ दिली आहे.

गीतकार वैभव देशमुख, अदिती उविड असून अजय गोगावले, वैशाली माढे, आनंदी जोशी, सावनी रवींद्र, उर्मिला धनगर यांचे सुरेल स्वर या सिनेमाला लाभले आहेत. प्रेक्षकांच्या मनात उत्सुकतेची लाट निर्माण करणारा हा नवीन सिनेमा लवकरच मोठ्या पडद्यावर उलगडणार आहे. शिवाजी दोलताडे दिग्दर्शित आणि गोवर्धन दोलताडे, गार्गी निर्मित चित्रपट स्मार्ट सुनबाई २९ नोव्हेंबरपासून संपूर्ण महाराष्ट्रात प्रेक्षकांच्या भेटीला येतोय.

# वेरूळ येथे प पू १०८ नियम सागर महाराज संघ यांचा पिंछी परिवर्तन कार्यक्रम १२ नोव्हेंबर रोजी



छत्रपती सभाजीनगर श्री पार्श्वनाथ ब्रम्हचारी आश्रम जैन गुरुकुल मध्ये परमपूज्य १०८ विद्यासागर महाराज यांचे परम शिष्य निर्यापक मुनिश्री नियम सागर महाराज, अभिनंदन सागर, महाराज, ऋषभ सागर महाराज व सुपार्श्वसागर महाराज यांचा गत चार महिन्यांपासून सुरू आहे.

चातुर्मास पर्वाचा अंतिम समापनाच्या निमित्ताने दिनांक १२ नोव्हेंबर रोजी दुपारी एक वाजता पिंछी परिवर्तन कार्यक्रमाचे भव्य स्वरूपात आयोजन करण्यात आले आहे.

यावेळी महाराजांच्या पिंछी प्राप्त करण्याचा मान संयम धारी श्रावकाला प्राप्त होणार आहे. या निमित्ताने प पू १०८ नियम सागर महाराज अभिनंदन सागर महाराज वृषभ सागर महाराज व सुपार्श्वसागर महाराज यांच्या मंगलमय प्रवचनाचा लाभ प्राप्त होणार आहे, तरी या कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष दिनेश गंगवाल संयोजक नवीन पाटणी, महामंत्री डॉ प्रेमचंद पाटणी, सुमित ठोले, मदनलाल पांडे, निर्मल कुमार ठोले, महेंद्र दगडफोडे ,गौतमचंद ठोले गुलाब चद बोराळकर रानुजैन यांनी केले आहे या कार्यक्रमासाठी चे संपूर्ण नियोजन बाल ब्रह्मचारी पंडित मनीष भैया यांच्या मार्गदर्शनात होणार आहे. यावेळी महाप्रसादाचे देखील आयोजन करण्यात आले आहे.अशी माहिती अतुल बादे पियूशकासलीवाल नरेंद्र अजमेरा यानी दिली .

जा.क्र./नपंसो/नामांतर/२०२५/२०२६ कार्यालय नगर पंचायत सोयगांव
दिनांक : ११-११-२०२५

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस याद्वारे कळविण्यात येते की, **अनिल सखाराम जोहरे** यांनी मोहल्ला **योगेश्वर बिल्डर्स ॲन्ड डेव्हलपर्स** सोयगांव स.नं. ----- मधील प्लॉट **१९०४** त्यांचे नांवे मालमत्ता कर रजिस्टरला नोंद घेणेसाठी या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे. अर्जानुसार जागेची चतु:सीमा खालील प्रमाणे आहे.

**पूर्व : रो. हाऊस नंबर १४ बी पश्चिम : लागू गट नंबर**
**दक्षिण : लागू गट नंबर उत्तर : ९ मीटर रोड व वापर**

आकार : पूर्व पश्चिम **५८.९७ चौरस मीटर** दक्षिणोत्तर..........

वरील नामांतराबाबातच्या कोणास आक्षेप असेल त्यांनी १५ दिवसांचे आत सकारण लेखी निवेदन कागदोपत्र पुराव्यानिशी या कार्यालयात दाखल करावे. मुदती नंतर कोणतेही आक्षेप विचारात घेतले जाणार नाही व नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यात येईल.

मुख्याधिकारी
नगरपंचायत सोयगाव

**नोटीस**

संस्थेच्या तमाम ठेवीदार कर्जदार व हितचिंतक यांना या नोटीसद्वारे कळविण्यात येते की, आमची शाखाः बिडकीन या शाखेमध्ये पिग्मी कलेक्शन करत असलेले एजंट नाव श्री. दिनेश विजयराव भवर रा. मारवाडी गल्ली, बिडकीन ता पैठण जि. छत्रपती संभाजीनगर यांनी संस्थेकडे एजंट या पदाचा राजीनामा देण्याबाबत अर्ज दिलेला आहे. तरी सदरील एजंट यांच्या दैनंदिन बचत खाते संदर्भात काही तक्रार अथवा अडचण असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झालेल्या दिवसांपासुन आठ दिवसाच्या आत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह संस्थेच्या मुख्य कार्यालयात अहमदनगर येथे संपर्क साधावा. आठ दिवसाच्या आत संस्थेच्या मुख्य कार्यालयास दैनंदिन बचत खात्या संदर्भात कुठलीही तक्रार प्राप्त न झाल्यास सदर एजंटचा राजीनामा स्वीकारून त्यास एजंट पदाच्या जबाबदारीतून मुक्त करण्याचा अधिकार संस्थे स राहील व उशिरा आले ल्या दैनंदिन बचत खाते संदर्भात तक्रारीचा विचार केला जाणार नाही व यानंतर सदर व्यक्तीबरोबर केलेल्या कोणत्याही व्यवहारास संस्था जबाबदार राहणार नाही. याची नोंद घ्यावी.

कळावे,

श्री रेणुकामाता मल्टीस्टेट को-ऑप
अर्बन क्रेडिट सो. लि., अहमदनगर
तर्फे
व करीता मोरे हरीश्चंद्र अंबादास (मुख्य कार्यकारी अधिकारी)
दि..१३/११/२०२५

## अग्रलेख...

# दिल्ली स्फोट आणि व्हाईट कॉलर्ड दहशतवादी

भारतासारख्या खंडप्राय देशाची राजधानी असलेल्या दिल्लीत सोमवारी (दि. १० नोव्हेंबर) संध्याकाळच्या वर्दळीच्या वेळी एका कारमध्ये स्फोट झाला. त्यात आठ-दहा माणसांचा बळी गेला. बळींची संख्या वाढण्याची शक्यता आहे. ते पारंपरिक बॉम्बचे स्फोट होते काय आणि ते दहशतवाद्यांनीच घडविले आहेत काय, या दोन्ही प्रश्नांची स्पष्ट व निःसंदिग्ध उत्तरे आतापर्यंत मिळालेली नसली तरी या घटनेचा दहशतवादी संघटनांशी संबंध असल्याचा निष्कर्ष काढण्याइतपत प्राथमिक पुरावे समोर आलेले आहेत. या घटनेचा संबंध उच्चशिक्षित अशा माथेफिरू व्यावसायिकांशी अर्थात व्हाईट कॉलर्ड टेररिझमशी असल्याचा अंदाज व्यक्त केला जात असतानाच हा फिदायिन हल्ला असावा, असेही तपास यंत्रणांमधील काही लोकांना वाटते. सकृद्दर्शनी या स्फोटाशी उच्चशिक्षित कट्टरपंथीयांचा संबंध असल्याचे दिसते आहे आणि तोच खरा चिंतेचा विषय आहे. घटनेच्या आधी व नंतर काही डॉक्टरांसह संशयितांना झालेली अटक यासंदर्भातून पाहिली पाहिजे. हा स्फोट एका आय-ट्वेंटी कारमध्ये झाला आणि त्या स्फोटामुळे आजूबाजूच्या काही गाड्या व व्यक्ती यांनाही बाधित केले. आतापर्यंतचा तपास असे सांगतो की, ही कार सकाळी दिल्लीत आली आणि संध्याकाळी त्यामध्ये स्फोट झाला. लाल किल्ल्याच्या परिसरात ही कार तीनेक तास उभी होती. या कारमध्ये बसलेली व्यक्ती डॉक्टर होती, तिने मास्क धारण केलेला होता आणि तिचा संबंध पुलवामाशी होता, अशा बातम्या आल्या आहेत. या कारची खरेदी फरिदाबादमध्ये झालेली असली तरी एकाकडून दुसऱ्याकडे विकली जात असताना तिचा संबंध वेगवेगळ्या राज्यांतील व्यक्तींशी आला होता. एकुणात ही सारी माहिती या घटनेमागील दहशतवाद्यांच्या, मग ते बंदूकवाले-बॉम्बवाले असतील किंवा सभ्य समाजात वावरणारे व्यावसायिक अर्थात व्हाईट कॉलर्ड लोक असतील, सहभागाकडे अंगुलिनिर्देश करणारी आहे. ही घटना दिल्लीत घडल्यामुळे व त्यात व्हाईट कॉलर्ड लोकांचा सहभाग असल्याचे दिसत असल्याने तिचे गांभीर्य अधिक वाढले आहे.

कोणत्याही देशाची राजधानी म्हणजे केवळ एक शहर नसते. ते त्या देशाच्या आत्म्याचे, शक्तीचे आणि सत्तेचे केंद्र असते. राजधानी दिल्लीत घडलेली छोटीशी घटना सुद्धा सुदूर दक्षिण भारतात किंवा ईशान्येत अस्वस्थता निर्माण करणारी असते. ही घटना ज्या परिसरात घडली, तो लाल किल्ल्याचा परिसर ही भारताच्या सार्वभौमत्वाची आणि स्वातंत्र्याची निरंतर ग्वाही देणारा परिसर आहे. कारण तेथून दरवर्षी पंतप्रधान स्वातंत्र्य दिनाच्या पर्वावर देशाला संबोधित करतात. तेथूनच देशाला नवी दिशा देणारी निवेदने करतात. दिल्लीत देशाची संसद आहे. सर्वोच्च न्यायालय आहे. राष्ट्रपती, पंतप्रधानांसह आपल्या राष्ट्रीय लोकतांत्रिक व्यवस्थेचे सर्व कर्णधार या शहरात असतात. त्यामुळे या शहरातील कोणत्याही घटनेला गांभीर्यनिच घ्यावे लागते. या घटनेचा प्राथमिक तपास दहशतवादी संघटना आणि काही उच्चशिक्षित व्यक्तींपर्यंत घेऊन जाणारा असला तरी पारंपरिक दहशतवादी हल्ल्याचे स्वरूप या घटनेला नाही. मात्र, हे स्फोट व्यावसायिक वर्दळीच्या भागात आणि गर्दीच्या वेळी झाले. त्यामुळे या परिसराची निवड जाणीवपूर्वक केली गेली असावी, असे म्हणण्यास वाव आहे. अशा घटनांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर भीती निर्माण करण्याचा जो दहशतवाद्यांचा हेतू असतो, तो तसा येथेही असल्याचे दिसते. जे काही घडले ते आपसूक किंवा अचानक किंवा घडलेले आहे, असे म्हणण्यास वाव दिसत नाही. जे काही घडले आहे, ते कुणाकडून तरी घडविलेच गेलेले आहे, असे म्हणण्यासारखे पुरावे समोर येत आहेत. गुजरातमध्ये रिसिन नावाचा विषाक्त पदार्थ वापरून नरसंहार घडविणाऱ्यांना आपल्या एटीएसने पकडल्याची पृष्ठभूमी या घटनेला आहे. शिवाय, उत्तर प्रदेश, हरयाणा आणि जम्मू-काश्मीर पोलिसांच्या पोलिस यंत्रणांनी शेकडो किलो स्फोटके जप्त केली आणि जैश-ए-मोहम्मद व अन्सार गझवात उल हिंद आणि अन् दहशतवादी संघटनांशी संबंधित असलेल्या आठ जणांना अटक केली आहे. दिल्लीच्या स्फोटानंतर हे अटकसत्र अधिक वेगाने सुरू झाले. त्यातही डॉक्टर्स आहेतच. यातील काहींचा संबंध तर थेट लष्कर-ए-तैयबाशी असल्याचे सांगितले जात आहे. वरकरणी दहशतवादी किंवा माथेफिरू न वाटणाऱ्या लोकांबद्दल संशय वाटत असल्याने या घटनेत व्हाईट कॉलर्ड दहशतवादाचा संबंध दिसतो. या घटनेचा संबंध पुलवामा हल्ल्याशी जोडला जात असतानाच फरिदाबाद दहशतवादी नेटवर्कचा यात संबंध आहे काय, याचाही छडा लावला जात आहे. बऱ्याच गोष्टी यामागील दहशतवादी अँगलची प्राथमिक पुष्टी करणाऱ्या आहेतच. पहिल्याच दिवशीच्या तपासात अटक केलेले व तपास यंत्रणांच्या रडारवर असलेले अनेक डॉक्टर्स हे कट्टरपंथी असल्याचे निदर्शनास आले आहे. सहारनपूर येथून अटक केलेला अनंतनागचा डॉक्टर, फरिदाबादेत स्फोटके गोळा करणारा डॉक्टर आणि कारमध्ये बसलेला डॉक्टर असे हे कट्टरपंथी डॉक्टर्स. फरिदाबादला अटक केलेल्या महिला डॉक्टरकडे जैश या दहशतवादी संघटनेने भारतात महिला विभाग तयार करण्याची व त्यासाठी भरती करण्याची जबाबदारी सोपविली होती म्हणतात. हे सारे लोक टेलिग्राम नावाच्या ॲपचा वापर करीत होते. यातला एक डॉक्टर तर मेडिकल कॉलेजमध्ये प्राध्यापक असल्याचे निदर्शनास आले आहे. या साऱ्या माहितीचा प्राथमिक अर्थ असा की, इस्लामी कट्टरपंथी हे फक्त अशिक्षित, अल्पशिक्षित असतात असे नव्हे, तर ते उच्चशिक्षितही असू शकतात. किंबहुना इस्लामी कट्टरपंथीयांमध्ये उच्चशिक्षितही आहेत, असा या घटनेचा अर्थ काढता येतो. उच्चशिक्षितांच्या डोक्यातही धर्मांधता किती खोलवर शिरू शकते, याचे हे उदाहरण आहे आणि त्यामुळे ते चिंता वाढविणारे आहे. दहशतवादी संघटनांशी यापूर्वी उच्चशिक्षितांचा संबंध नव्हता, असे नाही. परंतु, आता अशांची संख्या वाढत चाललेली दिसते. या घटनेच्या तपासातून बाहेर येत असलेल्या तथ्यांनी दिल्लीलाच नव्हे तर संपूर्ण देशाला मानसिक धक्का दिला आहे. लोकांच्या मनातील सुरक्षिततेची भावना पुन: प्रश्नांकित झालेली आहे. घटना छोटी की मोठी हा मुद्दा नाही. ती कुठे घडली, त्यात कुणाचा सहभाग आहे आणि त्यामागील हेतू काय, हे महत्त्वाचे आहे. एकाचा जीव गेला तरी त्या घटनेचे गांभीर्य कमी होत नाही. दहशतवादाची अनेक बीभत्स रूपे भारताने आतापर्यंत पाहिलेली आहेत. सर्व हल्ल्यांमध्ये एक समान सूत्र दिसते. घटनेचे स्थळ बदलेल, स्फोटके बदलतील, पण त्या घटनेतून निर्माण होणारी जनसामान्यांच्या मनातील दहशत सारखीच असते. आता दहशतवादाला उच्चशिक्षित लोकांच्या संबंधांचा ठळक आयाम मिळालेला आहे. एरवी उच्चशिक्षितांवर कुणीही सहज विश्वास ठेवत असतो. अगदी अडाणी माणूस असेल तरी त्याचा विश्वास सर्वांत आधी बसतो तो शिकल्या-सवरल्या माणसावर. त्या विश्वासालाच तडा देणारी ही घटना आहे. इस्लामी कट्टरपंथीयांचे वैशिष्ट्य असे की, त्यांचे शांतता, स्थैर्य, सौहार्दाशी कायम वाकडे असते. ते आपल्याच बिरादरीतल्या लोकांशी सतत भांडत असतात. आखाती देशांमध्ये, आफ्रिकेतल्या देशांमध्ये त्यांची सतत युद्धे सुरू असतात. भारत हा तर त्यांच्या दृष्टीने नावडत्या लोकांचा देश. आमचाच धर्म सर्वोच्च, आमचीच शिकवण सर्वोच्च, आमच्याच चालीरीती उत्तम अशीच शिकवण ज्यांना घरात किंवा त्यांच्या कथित शाळेत मिळत असेल, त्यांना इतरांचे अस्तित्व सहन न होणे स्वाभाविकच. त्यामुळे अर्बन नक्षल्यांसारखे अशा सुटाबुटातल्या दहशतवाद्यांनाही रगडून काढले पाहिजे. केंद्र सरकारने दहशतवाद प्रतिबंधक कायद्याच्या आधारे या मानवतेच्या अपराध्यांना, त्यांच्या म्होरक्यांना आणि त्यांना स्थानिक स्तरावर पाठिंबा देणाऱ्या सर्वांना हुडकून काढले पाहिजे आणि त्यांना कठोरतम शिक्षा दिली पाहिजे. एनआयएने चौकशीची सूत्रे हाती घेतली आहेतच. उत्तर प्रदेश, हरयाणा इत्यादी राज्यांमध्ये धाडसत्रही सुरू झाले आहे. आपल्या तपास यंत्रणांनी या स्फोटाच्या तपासात अधिक परिश्रम घेणे यासाठी अपेक्षित आहे की, गेल्या दशकभराच्या मोदी सरकारच्या काळात निर्माण झालेल्या सुरक्षिततेच्या भावनेला या स्फोटांनी धक्का दिला आहे. आम भारतीय नागरिकांच्या विश्वासाची पुन:प्रतिष्ठा करण्यासाठी सर्व नराधमांना, त्यांच्या कथित व्यवसायाचा विचार न करता, तातडीने शोधून दंडित करणे व पांढरपेशा कट्टरपंथीयांना निरंतर ठेचून संपविणे अत्यंत आवश्यक आहे. अपरिहार्य आहे. ▮

## विशेष

# अर्थशक्तीचा उदय

**प्रा. सुखदेव बखळे**

जागतिक सागरी शक्ती म्हणून स्वतःला स्थापित करण्याच्या उद्देशाने एक धाडसी पाऊल उचलून भारताने 'मेरीटाईम इंडिया व्हिजन २०३०' (एआयव्ही) लाँच केले. २०२१ मध्ये सुरू झालेल्या या परिवर्तनकारी रोडमॅपमध्ये १५० हून अधिक धोरणात्मक उपक्रमांचा समावेश आहे. बंदरांचे आधुनिकीकरण, शिपिंग क्षमता वाढवणे, क्षमता आणि कौशल्य विकासाच्या केंद्रस्थानी ठेवून अंतर्गत जलमार्गांना बळकट करणे हे या दृष्टिकोनाचे उद्दिष्ट आहे. केवळ मालवाहतुकीचा आराखडा न राहता 'एमआयव्ही २०२०' हे व्यापार, गुंतवणूक आणि रोजगारासाठी एक उत्प्रेरक आहे. यामुळे भारताच्या आर्थिक विकासाचा आणि जागतिक स्पर्धात्मकतेचा मार्ग मोकळा होतो. भारताचे सागरी क्षेत्र वेगाने वाढत आहे. बंदरे, किनारी नौवहन आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये विक्रमी कामगिरी भारताला आर्थिक विकासाच्या नवीन मार्गावर पुढे नेत आहे. या क्षेत्राची प्रगती राष्ट्राला बळकट करण्यात त्याची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करते. भारताच्या बंदर क्षेत्राने प्रचंड परिवर्तनकारी झेप घेतली आहे. बंदरांची एकूण क्षमता १४० कोटी टनांवरून २७६.२ कोटी टन झाली आहे. क्षमतेतील ही वाढ आधुनिकीकरण आणि पायाभूत सुविधांच्या विकासात होणाऱ्या मोठ्या गुंतवणुकीचे प्रतिबिंब आहे. मालवाहतुकीचे प्रमाणदेखील प्रभावीपणे वाढले, ९७.२ दशलक्ष टनांवरून १५९.४ दशलक्ष टन मालवाहतूक झाली. यावरून सागरी व्यापारात आणि बंदरांच्या कार्यक्षमतेत प्रचंड वाढ झाल्याचे दिसून येते.

२०२४-२५ मध्ये प्रमुख बंदरांमधून ८५.५ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली. २०२३-२४ मध्ये या बंदरांमधून ८१.९ कोटी टन मालाची वाहतूक करण्यात आली होती.` जलवाहतुकीचा सरासरी वेळ ९३ तासांवरून फक्त ४८ तासांवर आला आहे. यामुळे एकूण उत्पादकता आणि जागतिक स्पर्धात्मकता आणि या क्षेत्राची आर्थिक ताकददेखील वाढली आहे. या क्षेत्राचा निव्वळ वार्षिक अधिशेष १,०२६ कोटी रुपयांवरून ९,३५२ कोटी रुपयांपर्यंत झपाट्याने वाढला आहे. तो महसूल निर्मिती आणि खर्च व्यवस्थापनात सुधारणा दर्शवतो. ऑपरेटिंग रेशो ७३ टक्क्यांवरून ४३ टक्क्यांपर्यंत सुधारणे हे संवहनी आणि फायदेशीर बंदर ऑपरेशन्सच्या दिशेने एक मोठे पाऊल आहे. भारताचे शिपिंग क्षेत्र सातत्याने विकसित होत आहे. भारतीय ध्वजांकित जलवाहतुकीची संख्या १,२०५ वरून १,५४९ पर्यंत वाढली आहे. ती देशाच्या व्यापक सागरी उपस्थितीचे संकेत देते. भारतीय ताफ्याचे एकूण टनेजदेखील दहा दशलक्ष ग्रॉस टनांनी वाढून १.३५ कोटी ग्रॉस टन झाले आहे. त्यांची शिपिंग क्षमता अधिक मजबूत आणि अधिक सक्षम होण्याची अपेक्षा आहे. किनारी शिपिंगमध्येही लक्षणीय गती दिसून आली आहे. मालवाहतूक ८.७० दशलक्ष टनांवरून १६.५० दशलक्ष टन झाली आहे. यामुळे कार्यक्षम, परवडणाऱ्या आणि पर्यावरणपूरक वाहतुकीच्या पद्धतींकडे कल वाढतो.

भारतीय आंतरदेशीय जलमार्ग प्राधिकरणाने (आयडब्ल्यूएआय) म्हटले आहे, की ते १४.६० दशलक्ष टन मालाची विक्रमी वाहतूक करेल. ही आंतरदेशीय जलवाहतूक क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक घटना आहे. २०१४ च्या १.८० दशलक्ष टनाच्या तुलनेत ही वाढ ७१० टक्के आहे. 'आयडब्ल्यूएआय'ने 'हल्दिया मल्टीमोडल टर्मिनल' (एचएमटी) आयआरसी नॅचरल रिसोर्सेसकडे सोपवले आहे. सरकार आणि खाजगी क्षेत्राच्या भागीदारीमध्ये अंतर्गत जलमार्ग पायाभूत सुविधांचे अपग्रेडिंग आणि बहुमॉडेल वाहतुकीला प्रोत्साहन देण्याच्या दिशेने हे एक महत्त्वाचे पाऊल आहे. जागतिक बँकेच्या मदतीने बांधलेल्या पश्चिम बंगालमधील टर्मिनलची क्षमता ०.३० दशलक्ष टन आहे. प्रवासी जलवाहतूक आणि रोप-पॅक (वाहने आणि वाहने वाहून नेणारी जहाजे) ची लोकप्रियतादेखील बरीच वाढली आहे. २०२४-२५ मध्ये ७.५ कोटींहून अधिक वाहने त्यातून प्रवास करतील. यावरून दिसून येते, की लोक सुरक्षित आणि कार्यक्षम प्रवासासाठी जलद गतीने जलआधारित वाहतुकीचा अवलंब करत आहेत. २०३० मध्ये बंदरे, जहाजबांधणी आणि अंतर्गत जलमार्गांमध्ये एकूण ३-३.५ लाख कोटी रुपयांच्या गुंतवणुकीची योजना आहे.

जहाजबांधणीला चालना देण्यासाठी आणि सागरी परिसंस्थांना पुनरुज्जीवित करण्यासाठी अलिकडेच जाहीर केलेल्या ६९ हजार ७२५ कोटी रुपयांच्या ऐतिहासिक पॅकेजसह इंडिया टू कॉन्टिनेंटल वर्ल्डवाईड त्याच्या विशाल किनाऱ्याचा वापर करून स्थापनेसाठी एक धोरणात्मक मार्ग तयार करत आहे. लक्ष्यित वाटप आणि धोरणात्मक उपक्रम एकूण दृष्टिकोनाशी सहज जोडलेले आहेत. त्यामुळे प्रस्तावित गुंतवणूक यशस्वी होते. प्रोत्साहन देण्यासाठी उपाययोजना केल्या जात आहेत. सागरी विकास निधी (एमडीएफ) भारताच्या नेव्हिगेशनल क्षमता आणि जहाजबांधणी क्षमतेच्या विस्तारासाठी दीर्घकालीन वित्तपुरवठा करेल. याव्यतिरिक्त, २४ हजार ७३६ कोटी रुपयांच्या खर्चासह सुधारित जहाज बांधणी वित्तीय साहाय्य योजना (एसबीएफएएस) देशांतर्गत खर्चाशी संबंधित तोटे दूर करेल. १९,९८९ कोटी रुपयांच्या खर्चासह, जहाज बांधणी विकास योजना (एसबीडीएस) ग्रीनफील्ड क्लस्टर्स, यार्डचा विस्तार आणि जोखीम कव्हरेजला प्रोत्साहन देते. याव्यतिरिक्त, विशाखापट्टणममध्ये ३०५ कोटी रुपये खर्चून बांधलेले 'इंडियन शिप टेक्नॉलॉजी सेंटर' (आयएसटीसी) हे जहाज डिझाईन, संशोधन आणि विकास, अभियांत्रिकी आणि कौशल्य विकासाचे राष्ट्रीय केंद्र आहे.

ईशान्य भारतातील आंतरदेशीय जलमार्ग पायाभूत सुविधांच्या विकासात एक हजार कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक करण्यात आली आहे, जी देशाच्या नदी नेटवर्कद्वारे वाहतूक आणि व्यापाराला महत्त्वपूर्ण चालना देते. या गुंतवणुकीपैकी सुमारे तीनशे कोटी रुपयांचे प्रकल्प आधीच पूर्ण झाले आहेत तर उर्वरित प्रकल्प अद्याप पूर्ण झालेले नाहीत. त्यात कनेक्टिव्हिटी आणि प्रादेशिक व्यापार वाढवणे समाविष्ट आहे. या प्रदेशात मोठ्या प्रमाणात पर्यटन सुरू करण्याची तयारी सुरू आहे. हावडा येथील हुगळी कोचीन शिपयार्डमध्ये २५० कोटी रुपयांच्या एकत्रित गुंतवणुकीसह दोन लक्झरी क्रूझ जहाजे बांधली जात आहेत. हे जहाज ब्रह्मपुत्रा नदीतून प्रवास करेल. सरकारच्या 'क्रूझ इंडिया मिशन'अंतर्गत आसामच्या नदी पर्यटनाच्या लॅण्डस्केपमध्ये ते बदल घडवून आणील, अशी अपेक्षा आहे. भारताला 'सागरमाला प्रकल्प' हा 'समुद्री भारत व्हिजन २०३०' आणि 'समुद्री अमृतकाल व्हिजन'चा एक प्रमुख आधारस्तंभ आहे. हा कार्यक्रम लॉजिस्टिक्स खर्च कमी करणे, व्यापार कार्यक्षमता वाढवणे आणि हरित वाहतूक नेटवर्कद्वारे रोजगार निर्माण करणे यावर केंद्रित आहे. याअंतर्गत, २०३५ पर्यंत ५.८ लाख कोटी रुपयांचे ८४० प्रकल्प राबवले जातील. त्यापैकी १.४१ लाख कोटी रुपयांचे २७२ प्रकल्प पूर्ण झाले आहेत.भारताचे सागरी क्षेत्र एका निर्णायक दशकात प्रवेश करत आहे. तिथे नवीन कायदे, मोठे प्रकल्प आणि जागतिक गुंतवणूक महत्त्वाकांक्षा 'सागरी भारत व्हिजन, २०३०' ला आकार देत आहेत. हरित तंत्रज्ञान आणि डिजिटल नवोपक्रमावर भर देऊन भारत केवळ त्याच्या व्यावसायिक मागण्या पूर्ण करण्यासाठीच नाही, तर सागरी क्षेत्रात एक नेता म्हणून उदयाला येण्यासाठीही सज्ज होत आहे. हे लक्षात घेऊन 'सागरी अमृतकाल व्हिजन, २०४७' तयार केले जात आहे. तो भारताच्या सागरी पुनरुत्थानाचा दीर्घकालीन रोडमॅप आहे. त्यात बंदरे, किनारी नौहरगोहन निर्माण यांचा समावेश आहे. 'हरित नेव्हिगेशन' उपक्रमांसाठी ८० लाख कोटी रुपयांची गुंतवणूक राखून ठेवण्यात आली आहे. ▮

(लेखक अर्थशास्त्राचे अभ्यासक आहेत.)


## वेध

**विजय निचकवडे**

# विक्रमादित्य दामले...

आम्ही म्हणतो नाटकं करू नकोस! पण, ते नाटकं करूनच मोठे झाले. त्यांच्या नाटकांनी मराठी रंगभूमीला वेगळी उंची आणि सन्मान मिळवून दिला. मराठी रंगभूमीची गत चार दशकांपासून सेवा करताना 'मला सांगा सुख म्हणजे नक्की काय असतं?' हे प्रत्येक मराठी माणसाला गुणगुणण्यास भाग पाडणारा व्यासंगी म्हणजे प्रशांत दामले! मराठी रंगभूमीवर सर्वाधिक नाट्य प्रयोगांचा विक्रम साकारणारा हा अष्टपैलू कलावंत १६ नोव्हेंबरच्या प्रयोगानंतर 'विक्रमादित्य' होईल अन् मराठी रंगभूमीचा, नाट्यसृष्टीचा अभिमानच ठरेल.

आमच्या लेखी 'नाटकं' करणे म्हणजे जरा वेगळं आहे. पण काही नाटकं अशी असतात, जी स्वतःसोबत त्या क्षेत्रालाही समृद्ध करतात. मराठी रंगभूमी आणि नाट्यसृष्टीच्या इतिहासात गत चार दशके म्हणजेच जवळपास ४२ वर्षांपासून सेवा देताना अनेक आघाड्यांवर परिस्थितीचा सामना करीत स्वतःला सिद्ध करणारा कलावंत प्रशांत दामले. १६ नोव्हेंबर रोजी पुणे येथे आयोजित नाट्य प्रयोग हा प्रशांत दामले यांच्या आयुष्यातील १३,३३३ वा आहे. हाच प्रयोग त्यांना मराठी रंगभूमीवर सर्वाधिक नाट्यप्रयोग करणारा कलावंत म्हणून 'विक्रमादित्य' करणारा असेल. हा विश्व विक्रमी प्रयोग म्हणजे मराठी रंगभूमीला बहुमान मिळवून देणारा असाच म्हणावा लागेल. एकीकडे मराठी चित्रपटसृष्टी असो की नाट्यक्षेत्र, दोन्ही बाबतीत फारशी सकारात्मकता दिसत नसताना आपल्या कलेच्या, सहजसुंदर अभिनयाच्या आणि विनोदी शैलीच्या जोरावर रंगभूमी समृद्ध करण्याचे काम प्रशांत दामले यांनी केले. मराठी रंगभूमी, चित्रपट, मालिकांमध्ये आपल्या अभिनयाची छाप त्यांनी पाडली. २७ हून अधिक नाटकांमध्ये मुख्य भूमिकेत असलेला हा कलावंत कधी मराठी प्रेक्षकांच्या हृदयावर अधिराज्य गाजवून गेला कळलेच नाही. १९८३ साली नाट्य क्षेत्रात पदार्पण केल्यानंतर एकाहून एक अजरामर नाटकांची मेजवानी देणारा हा कलावंत स्वतःवर विश्वास ठेवून आयुष्याची भक्कम गोळा बेरीज करीत पुढे जात राहिला.



मराठी रंगभूमीला प्रभाकर पणशीकर, काशिनाथ घाणेकर, रमेश देव, सतीश दुभाषी अशा प्रतिभावंतांचा वारसा आहे. तो जपण्याचे काम आपल्या सहज अभिनयातून प्रशांत दामले यांनी केले, असे म्हटल्यास अतिशयोक्ती होणार नाही. एखादा कलावंत स्वतःच्या मर्यादा आखून ठेवतो; मात्र डेली सोपसारख्या उपक्रमातून महाराष्ट्रातील घराघरात वहिनींचे लाडके झालेले भाऊजीही काही कमी नाहीत.

२७ हून अधिक नाटकांमधून प्रमुख भूमिका करताना नाट्यसृष्टी गाजविणाऱ्या या कलावंताने कारकीर्दीतील १२,५०० वा प्रयोग केला तो, 'एका लग्नाची गोष्टी' नाटकाचा. याच नाटकातील 'मला सांगा सुख म्हणजे नक्की काय असतं?' या गाण्याने महाराष्ट्राला, मराठी प्रेक्षकाला वेड लावले. कदाचित तेव्हापासून आमच्या सारखा प्रेक्षक असलेला मराठी माणूस प्रशांत दामले या नावात आपलं सुख शोधू लागला. ६ नोव्हेंबर २०२२ मध्ये रोजी हा १२,५०० प्रयोगांचा टप्पा गाठला. २०२४ पर्यंत विविध नाटकांचे १३,२१० प्रयोग सादर करून नाट्यप्रेमींची भूक भागविणारा हा कलावंत आता विक्रमादित्य होतो आहे. १६ नोव्हेंबर रोजी पुण्यात होणारा त्यांचा प्रयोग १३,३३३ वा आणि नाट्यसृष्टीत विश्वविक्रमाची नोंद करणारा आहे. मराठी रंगभूमीला लाभलेला या व्यासंगी कलावंताने केलेली रंगभूमीची सेवा नक्कीच रंगभूमीसाठी मोलाची ठरावी. निरागस भाव, साधेपणा आणि आपुलकी अशा मिश्रणातून तयार झालेल्या या कलावंताने आपल्या प्रतिभेच्या जोरावर मराठी नाट्यसृष्टीला समृद्ध केले हे तेवढेच खरे! विक्रमादित्य होत असताना प्रेक्षकांशी असलेलं आपुलकीचं नातं मात्र तेवढ्याच आत्मीयतेने हा व्यासंगी जपून आहे. एकीकडे हिंदी चित्रपटसृष्टीतील कलावंतांना आम्ही डोक्यावर घेऊन नाचत असताना मराठी बाणा आणि नाट्य संस्कृती जपणाऱ्या या बहुआयामी कलावंताचा अभिमान बाळगलाच गेला पाहिजे. आजही ग्रामीण भागातील नाट्य संस्कृती अशाच कलावंतांचा आदर्श पुढे ठेवून अखंडपणे जपली जात आहे. कदाचित प्रशांत दामले यांना विक्रमादित्य करणारा त्यांच्या आयुष्यातील टप्पा नाट्य संस्कृतीशी नाळ जुळलेल्या अनेकांसाठी प्रेरणा आणि ऊर्जा देणारा असेल. शेवटी प्रशांत दामले या नावातच तर दर्दी प्रेक्षकांचे 'सुख' दडलयं ना! ▮

९७६३७१३४१७

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता - श्रद्धात्रेयविभाग योग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्भगवद्गीतेच्या १७ व्या अध्यायाला श्रद्धात्रेयविभाग योग म्हणतात. या अध्यायात भगवंतांनी अत्यंत सरळ आणि सोप्या शब्दांत 'श्रद्धामयोयं पुरुषः' म्हणजे श्रद्धेनुसार त्याच्या जीवनाचे मार्गक्रमण होत असते. या अध्यायानुसार श्रद्धेचे सात्त्विक श्रद्धा, राजसिक श्रद्धा आणि तामसिक श्रद्धा असे तीन विभाग पाडल्यामुळे श्रद्धात्रेयविभाग म्हटले आहे. आपल्या अंगी जशी श्रद्धा असेल त्यानुसारच अन्न यज्ञ, तप आणि दान यांचेही सात्त्विक, राजसिक आणि तामसिक असे तीन प्रकार आपल्यात असतात, असेही भगवान स्पष्ट करतात. सर्वांत प्रथम श्रद्धेबाबत पाहू. तिन्ही श्रद्धेत सात्त्विक श्रद्धा सर्वश्रेष्ठ असून या श्रद्धेसाठीच आपला कायम प्रयत्न असावा. मागील अध्यायात 'तस्माच्छास्त्रम् प्रमाणं' म्हणजे शास्त्राला प्रमाण मानून कर्म करावे, हे भगवंताने सांगितले. त्यावर या अध्यायात शंका येऊन अर्जुनाने प्रश्न केला.

अर्जुन उवाच- 'ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजन्ते श्रद्धयान्विताः ।
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः ॥'

हे भगवंता, जे लोक श्रद्धेने तुझी भक्ती करतात, पण अज्ञानामुळे ती भक्ती शास्त्राला धरून नसेल तर त्यांची श्रद्धा सात्त्विक, राजसिक की तामसिक असेल?

'त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ।
सात्त्विकी राजसी चैव तामसी चेति तां श्रृणु ॥'

मनुष्यात स्वभावतः तीन भक्ती असतात; मनुष्याच्या ठायी श्रद्धादेखील त्रिविध असते. ज्याची जशी श्रद्धा तो तसा बनतो. या श्रद्धा कशा ओळखाव्यात?

'यजन्ते सात्त्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ।
प्रेतान्भूतगणांश्चान्ये जयन्ते तामसा जनाः ॥'

जे लोक देवाला भजतात त्यांच्यात सात्त्विक श्रद्धा असते. जे लोक यक्ष किंवा राक्षसांची पूजा करतात ते राजसिक श्रद्धेने भरलेले असतात. ज्यांच्यात तामसिक श्रद्धा आहे ते भूत प्रेताचे पूजन करतात. भगवान म्हणतात- अर्जुना! ज्यांच्यात दंभ आणि अहंकार आहे, कामबळ आणि रागबळ अधिक आहे असे जे मूढमती लोक आहेत. असे मूढमती शास्त्रविधीकडे दुर्लक्ष करून कठोर तप करतात. ते आसुरीगुण संपन्न असतात. जशा श्रद्धा तीन प्रकारच्या त्या श्रद्धांना अनुसरूनच त्यांना भोजन, यज्ञ, तप आणि दान करण्याची इच्छा होते, हे लक्षात ठेवले पाहिजे. आपण सात्त्विक भोजन, सात्त्विक यज्ञ, सात्त्विक तप आणि सात्त्विक दान करावे. आता आपण यातील एकेकाबद्दल माहिती पाहू. सर्वांत प्रथम अन्नाचा विचार करू.



त्यातील सात्त्विक अन्न म्हणजे जे-

'आयुः सत्त्वबलारोग्य सुखप्रीतिविवर्धनाः ।
रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्त्विकप्रियाः ॥'

सात्त्विक अन्न आपले आयुष्य, बुद्धी, बल, आरोग्य, प्रीती आणि सुख वर्धन करते. असे अन्न स्निग्ध, रसाळ, स्थिर पदार्थ होय. अन्नाचा दुसरा प्रकार म्हणजे तामसिक अन्न.

'कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरूक्षविदाहिनः ।
आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥'

राजसिक अन्न म्हणजे कडू, आंबट, खारट, अतिउष्ण, तीक्ष्ण, रुक्ष, दाहकारक ज्यातून दुःख-शोक प्राप्त होतो असे अन्न. तामसिक अन्न कोणते हे भगवंत सांगतात-

'यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् ।
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥'

तामसिक अन्न म्हणजे अर्धवट शिजलेले, रसहीन, दुर्गंधी, शिळे, उष्टे आणि अपवित्र अन्न. यज्ञाबद्दल विचार भगवंत मांडतात. यज्ञाचेही तीन प्रकार आहेत.

'अफलाकाङ्क्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ।
यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्त्विकः ॥'

फळाची अपेक्षा न ठेवता केला जाणारा यज्ञ म्हणजे सात्त्विक यज्ञ.

'अभिसन्धाय तु फलं दम्भार्थमपि चैव यत् ।
इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ॥'

फळाची अपेक्षा ठेवून दांभिक वृत्तीने केलेला यज्ञ म्हणजे राजसिक यज्ञ होय.

'विधिहीनमसृष्टान्नं मन्त्रहीनमदक्षिणम् ।श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥'

शास्त्रविधीरहित, अन्नदानरहित, मंत्ररहित, श्रद्धारहित असलेला यज्ञ म्हणजे तामस यज्ञ होय. कायिक, वाचिक आणि मानसिक हे तप सांगून भगवंत म्हणतात-

'श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः।
अफलाकाङ्क्षिभिर्युक्तैः सात्त्विकं परिचक्षते ॥'

ज्या तपात फळाची इच्छा नसते. जे तप निष्काम योगी पुरुषाकडून अत्यंतिक श्रद्धेने केले जाते त्या तपाला सात्त्विक तप म्हणतात.

'सत्कारमानपूजार्थं तपो दम्भेन चैव यत् ।
क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥'

जे तप आपल्याला मानपान मिळावा, सत्कार व्हावा, पूजा व्हावी अशा दांभिक हेतूने केले जाते त्याला राजसिक तप म्हणतात.

'मूढग्राहेणात्मनो यत्पीडया क्रियते तपः ।
परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥'

जे तप अत्यंत मूर्खपणे, स्वतःला त्रास, पीडा देऊन, दुसऱ्याचे वाईट करण्याच्या हेतूने केले जाते ते तप म्हणजे तामसिक तप होय. आता दानाबद्दल विचार मांडला आहे. दान देणे हा आपला संस्कार आहे.

'दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ।
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्त्विकं स्मृतम्'

यामध्ये जे दान कर्तव्य भाव म्हणून केले जाते, प्रति उपकाराची अपेक्षा न ठेवता, सत्पात्री पुरुषाला दिलेले दान हे सात्त्विक दान आहे.

'यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः।
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ॥'

जे दान प्रत्युपकाराची इच्छा ठेवून, काही परतफेडीची अपेक्षा ठेवून क्लेशपूर्वक दिलेले दान हे राजसिक दान आहे.

'अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते । असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥'

जे दान अयोग्य स्थळ-काळ असताना, अपात्र पुरुषांना, तिरस्कार करून दिले जाते त्या दानाला तामसिक दान म्हणतात. भगवान म्हणतात की-

'ॐ तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः । ब्रह्मस्वरूप ॐ तत् सत् ॥'

या तीन स्वरूपात आहे. अर्जुना! ज्ञानी मनुष्य आपल्या यज्ञ तप दानादी क्रिया ॐ चा उच्चार करून करतात. मुमुक्षु याच क्रिया तत् उच्चाराने तर साधुभाव निर्माण झालेले, परमेश्वर प्राप्तीसाठी सत्ने सुरुवात करतात.

'अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ।
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥'

हे पार्थ! श्रद्धेशिवाय केलेले हवन, दिलेले दान, केलेले तप आणि कर्म हे असत् असतात. या अध्यायात तीन प्रकारच्या श्रद्धेचा सांगोपांग विचार मांडला म्हणून हा श्रद्धात्रेयविभाग योग होय. ▮

९८२२२६२७३५

## आजचे संघगीत-४०

बुधवार, १२ नोव्हेंबर २०२५

### यशाने दुमदुमवू त्रिभुवने

यशाने दुमदुमवू त्रिभुवने ॥धृ.॥

सकल भेद भारती मिटावे अभिमाने हे राष्ट्र उठावे
आकांक्षांनी अशा आमुची संचरलेली मने ॥१॥

कर्तृत्वाच्या विश्वासावर सदैव आम्ही राहू निर्भर
नैराश्याचे ऐकु न येइल यापुढती तुणतुणे ॥२॥

मन का दुबळे उदास व्हाया? लोह असे का मन गंजाया?
का भीषण त्या मुठीत सोने ठरते हिणकस उणे? ॥३॥

वाळूवरती मीन तडफडे तसेच अमुचे जीवन उघडे
ध्येयसागरी विहरू अथवा क्षणी संपवू जिणे ॥४॥

संकल्पाच्या सिद्धीवाचून थांबू आम्ही एकहि न क्षण
नेत्याच्या त्या अधीन केवळ अमुची ही जीवने ॥५॥

धीर वृत्तिचा उंच हिमाचल भीषणतेतही निर्भय निश्चल
नेता ऐसा मिळे अम्हाला काय असे मग उणे ॥६॥

### वाढते ध्वनिप्रदूषण

आपल्या देशात रस्त्यावरील वाहनांच्या कर्णकर्कशतेवर काहीच इलाज नाही. बालके, वृद्ध, ऋग्ण यांच्या त्रासाचा वाहनचालकच काय शासनसुद्धा विचार करत नाही. ऑटोसारखे तीनचाकी वाहनही ट्रकसारखे कर्णकर्कश हॉर्न वाजवतात. रस्त्यावर विनाकारणच खड्डा दिसला तरी हॉर्न मारतात. त्यांचे बोट हॉर्नवर कायमचे तत्पर असते. आजकाल डीजेचे नवीन फॅड लग्नसमारंभात आलेले आहे. आनंदात मिठाचा खडा टाकल्यासारखे ते ज्येष्ठांना वाटते. कर्णपटल व हृदयाला धक्का पोहोचवणारे डीजे समाज व सरकार कसे काय सहन करते, हे कोडेच आहे. महाराष्ट्रात काही शहरात डीजेला बंदी आहे, पण तरी काही आंबटशौकी ते समारंभाला पावित्र्य देते, असे समजतात. तिसरा त्रासदायक व आरोग्याला धोकादायक शौक म्हणजे दिवाळी व लग्नसमारंभात कानठळ्या बसवणारे म्हणजे फटाके. शहनाई व सुमधूर वाद्यवृंदापेक्षा फटाक्यांना एवढे महत्त्व का? हे न सुटणारे कोडे आहे. शासनाने अशा घातक प्रथांवर ताबडतोब बंदी घालून नियम तोडणाऱ्यांना जबरदस्त दंड करायला पाहिजे.

**गणेश ज. हजारे** /८६९८८१५५५९

## वाचक पत्रे

### ज्येष्ठ नागरिकांची सामाजिक क्षेत्रात सक्रियता

भारतात ज्येष्ठ नागरिकांची वाढती लोकसंख्या हा चिंतेचा विषय झाला आहे. अन्य देशांच्या तुलनेत भारतात ज्येष्ठ नागरिकांची संख्या सर्वाधिक आहे. एका सर्वेक्षणानुसार भारतातील १४२ कोटी लोकसंख्येत ज्येष्ठ नागरिकांची संख्या जवळपास १५ कोटी आहे. पुढील २५ वर्षांत ही संख्या ३० कोटीपर्यंत जाण्याची शक्यता वर्तवली जात आहे. एकीकडे ही स्थिती असली तरी गेल्या काही वर्षांत सामाजिक कार्यात ज्येष्ठ नागरिकांची सहभागिता वाढलेली अनुभवास येत आहे.

नोकरीतून अथवा खाजगी व्यवसायातून निवृत्त झाल्यानंतर पुढे काय हा प्रश्न उपस्थित होत असे. घरच्या चार भिंतीच्या आत बसून वेळ घालविताना मानसिक स्वास्थ्य बिघडत असे. परिवारात आपले अस्तित्व टिकवून ठेवण्यासाठी संघर्ष करावा लागत होता. पण गेल्या काही वर्षांत यात आमूलाग्र बदल होताना दिसतो. समाजात अनेक उपक्रम राबविण्यात येत आहे. त्यात ज्येष्ठ नागरिकांची सक्रियता वाढत चालली असल्याचे दिसून येत आहे. बहुसंख्य ज्येष्ठ मंडळी तन, मन, धनाने सामाजिक कार्यात गुंतले आहेत. ज्येष्ठ नागरिकांची ही सक्रियता बघून तरुण वर्ग देखील सामाजिक कार्यात जिद्दीने भाग घेत आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने १०० वर्षे पूर्ण झाल्याच्या पृष्ठभूमीवर पंचसूत्री सोबत घेऊन जनआंदोलन राबविण्याचे आवाहन केले आहे. पर्यावरण, सामाजिक समरसता, स्वदेशी, कुटुंब प्रबोधन आणि नागरी कर्तव्य ही पंचसूत्री देशाचा विकास घडवू शकते असा विश्वास वाटत असल्यामुळे देशात ठिकठिकाणी वरील विषयांवर विस्तृत चर्चा होत असून त्यात ज्येष्ठ नागरिकांची सक्रियता मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. या मंथनातून उद्याचा भारत साकार होणार आहे. ज्या रामराज्याची संकल्पना आम्ही मांडतो ते रामराज्य उदयास येण्यास वेळ लागणार नाही या आत्मविश्वासाने ज्येष्ठ नागरिक आणि त्यांच्या पावलावर पाऊल टाकणारा तरुण वर्ग सामाजिक कार्यात अग्रेसर होताना दिसतो. त्यांचा हा उत्साह द्विगुणित व्हावा ही अपेक्षा आहे. त्यासाठी परिवार आणि समाजाला सकारात्मक भूमिका घ्यावी लागेल जेणेकरून सकारात्मक परिणाम दिसून येतील.

'देश हमें देता है सबकुछ, हम भी कुछ देना सिखें.' समय दान करणे ही काळाची गरज आहे. हे ओळखून ज्येष्ठ नागरिक सामाजिक क्षेत्रात सक्रिय होत आहेत. अशा सर्व ज्येष्ठ नागरिकांना आणि तरुण वर्गाला मानाचा मुजरा. ▮

**वसंत पिंपळापुरे**/नागपूर

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## प्रा.अनुजा कांबळे-धायगुडे यांना पीएच.डी. प्रदान

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** येथील दयानंद शिक्षण संस्थाद्वारा संचालित दयानंद वाणिज्य महाविद्यालयाच्या सहाय्यक प्राध्यापिका अनुजा अरुण कांबळे (धायगुडे) यांना स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने पीएच.डी. पदवी प्रदान केली आहे.

प्रा. अनुजा कांबळे यांनी 'आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभाव वाणिज्य आणि व्यवस्थापन शिक्षणावर कोविडपूर्व व कोविडनंतर ' या अत्यंत महत्वाच्या आणि समकालीन विषयावर संशोधन केले आहे. या संशोधनासाठी त्यांना प्राचार्या डॉ. सुजाता चव्हाण यांचे मार्गदर्शन लाभले. तसेच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे को. डीन डॉ. एच.एस. पटणे, बाह्य मार्गदर्शक अरुण गायकवाड यांचेही मोलाचे मार्गदर्शन मिळाले. त्यांच्या या उल्लेखनिय यशाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमण लाहोटी, सचिव रमेश बियाणी, प्राचार्य डॉ. प्रशांत मान्नीकर, उप प्राचार्य डॉ. गणेश लहाने, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाचे समन्वयक डॉ. बाळासाहेब चव्हाण, वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. मनिषा अष्टेकर आदींनी अभिनंदन केले आहे.





# लोहपुरुष पटेल यांच्या जयंतीनिमित्त पदयात्रेला लातुरात उत्स्फूर्त प्रतिसाद






**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** देशाच्या एकात्मतेचे प्रतिक आणि लोहपुरुष म्हणून ओळखले जाणारे सरदार वल्लभभाई पटेल यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त लातूर शहरात पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या पदयात्रेला शहरातील विविध महाविद्यालये, शाळा, स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

पदयात्रेची सुरुवात यशवंत विद्यालय आणि दयानंद कला महाविद्यालयाच्या संगीत विभागातर्फे सादर करण्यात आलेल्या देशभक्तीपर गीताने करण्यात आली. उपजिल्हाधिकारीसायली ठाकूर यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून जिल्हा क्रीडा संकुल येथून पदयात्रेला प्रारंभ झाला.

केंद्र शासनाचे युवा कार्य व क्रीडा मंत्रालय, लातूर जिल्हाधिकारी कार्यालय, लातूर मेरा युवा भारत केंद्र, राष्ट्रीय सेवा योजना क्षेत्रीय निर्देशनालय आणि जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने या पदयात्रेचे आयोजन करण्यात आले होते.

जिल्हा क्रीडा संकुल मैदानापासून छत्रपती शिवाजी महाराज चौक मार्गे भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्कपर्यंत पदयात्रा काढण्यात आली. हातात तिरंगा आणि सरदार पटेल यांचे छायाचित्र घेऊन विद्यार्थ्यांनी दिलेल्या देशभक्तीपर घोषणांमुळे संपूर्ण वातावरण देशभक्तीमय झाले. कार्यक्रमाच्या शेवटी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जीवनकार्यावर प्रकाश टाकण्यात आला आणि राष्ट्रगीताने पदयात्रेची सांगता झाली.

लातूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी समीरसिंह साळवे, जयक्रांती महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. श्रीधर कोल्हे, जिल्हा क्रीडा अधिकारी महादेव कसगावडे, जिल्हा युवा अधिकारी सशांक रावुला, राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम समन्वयक डॉ. केशव आलगुले, मेरा युवा भारत केंद्राचे संजय ममदापुरे, डॉ. बालाजी होकरणे, माध्यमिक शिक्षण विभागाचे ढमाले, डॉ. गौरव जवळीकर यावेळी उपस्थित होते.

या पदयात्रेत यशवंत विद्यालय, श्री शिवाजी माध्यमिक विद्यालय, केशवराज विद्यालय, मारवाडी राजस्थान विद्यालय, श्री देशिकेंद्र विद्यालय, जयक्रांती महाविद्यालय, दयानंद वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, बसवेश्वर फार्मसी कॉलेज, राजर्षी शाहू महाविद्यालय, तसेच एनसीसी आणि एनएसएस विभागाच्या विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महावीर काळे, प्रशांत साबणे प्रियंका मोरे, अश्विन स्वामी, रमेश शिंदे, संदीप भोसले आणि वेंकटेश हालींगे यांनी विशेष परिश्रम घेतले.

# 'सोमाणी'च्या श्रेयशची राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड



**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** येथील श्रीकिशन सोमाणी विद्यालयाचा इयत्ता दहावी मधील विद्यार्थी श्रेयश श्रीकांत शेळके याची राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

पुण्याच्या बालेवाडीत नुकत्याच पार पडलेल्या राज्यस्तरीय शालेय ज्युदो स्पर्धेत १७ वर्षांखालील मुलांच्या वयोगटातून, ७३ किलो वजनी गेटमधून श्रेयशने प्रथम क्रमांक पटकावला होता. या यशामुळे श्रेयशची मणिपूरचे राजधानी इंफाळ येथे आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रीय ज्युदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

श्रेयश शेळके याने मिळवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. चेतन सारडा, सचिव कमलकिशोर अग्रवाल, कोषाध्यक्ष जयेश बजाज, शालेय समितीचे अध्यक्ष अतुल देऊळगावकर, मुख्याध्यापक रमाकांत स्वामी, पर्यवेक्षक गिरीश कुलकर्णी, सुनीता जाधव, राहुल पांचाळ यांच्यासह सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनी अभिनंदन केले आहे. श्रेयशला क्रीडा शिक्षक रुपाली कांबळे, गोरख राठोड, माणिक हाके यांचे मार्गदर्शन लाभले.



# गौतम बुद्ध, छत्रपती शिवाजी महाराज व राष्ट्रपिता गांधींच्या मूर्तीची स्थापना

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** : रयतेचे राजे आणि हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज, विश्वाच्या कल्याणासाठीचे पंचशील तत्वज्ञान देणारे तथागत भगवान गौतम बुद्ध आणि मानव केंद्रबिंदू ठेवून खेड्यांच्या विकासातूनच राष्ट्र विकास होईल हा मूलमंत्र देणारे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांचा आदर्श नव्या पिढीला प्रेरणादायी व्हावा तसेच यांचा आदर्श हाच मानवातील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी उपयोगी पडेल हे जाणून विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी त्यांच्या मूर्तीची स्थापना रामेश्वर (रूई) येथे उभारण्यात आलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनात' केली.

विश्व शांती केंद्र (आळंदी), माईर्स एमआयटी, पुणे भारत व मानवता तीर्थ रामेश्वर (रूई) यांच्या संयुक्त विद्यमाने जगातील सर्वात मोठ्या आणि विस्तीर्ण दालन असलेल्या 'विश्वधर्मी मानवता तीर्थ भवन' या वास्तूमध्ये सत्य, शांती, अहिंसा, प्रेम आणि मानवतेचे मूर्तिमंत प्रतीक असलेल्या, मानवी इतिहासातील काही उत्तुंग व पथदर्शी व्यक्तिमत्वांच्या चैतन्यदायी प्रतिकांची या ठिकाणी प्रतिष्ठापना आणि पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी विश्वधर्मी मानवतातीर्थ भवन या वास्तूचे संकल्पक, संरचना, नियोजक व निर्मितीकार एमआयटी वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीचे संस्थापक अध्यक्ष विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड, प्रगतिशील शेतकरी हभप काशीराम दा. कराड, ऋषिकेश कराड, माईर्स एमआयटीचे कुलसचिव डॉ. रत्नदीप जोशी, वरिष्ठ सल्लागार डॉ. संजय उपाध्ये, गिरीश दाते, संचालक डॉ. महेश थोरवे, दिलीप पाटील, विष्णू भिसे, सचिन मुंडे व योगेश पारखी उपस्थित होते.

यावेळी विश्वधर्मी प्रा.डॉ. विश्वनाथ दा. कराड म्हणाले, गौतम बुद्धांचे विश्वशांतीचा संदेश देणारे तसेच पंचशीलाचे तत्वज्ञान जगाला मार्गदर्शक ठरणारे आहे. दया, क्षमा, शांती, त्याग, सेवा, समर्पणाच्या विचारांमध्येच अखिल मानव जातीचे कल्याण सामावलं आहे. तसेच स्वत्व आणि स्वाभिमान यांची शिकवणूक देत पर्यावरण स्नेही राज्याची निर्मिती करणारे रयतेचे राजे व हिंदवी स्वराज्याचे निर्माते छत्रपती शिवाजी महाराज यांचा प्रेरणादायी आदर्श हाच मानवातील स्नेहभाव वृद्धिंगत करण्यासाठी उपयोगी आहे. भारतीय संस्कृतीचे वसुधैव कुटुंबकम व एकं सत विप्रा बहुदा वदंती हा संदेशच जगाला विनाशापासन वाचवू शकतो. हाच संदेश रामेश्वर रूई येथे साकारलेल्या एकमेवाद्वितीय अशा 'विश्वधर्मी मानवतातीर्थ भवना' च्या माध्यमातून संपूर्ण जगाला देण्याचा छोटासा प्रयत्न आहे.

डॉ. रत्नदीप जोशी म्हणाले, जगामध्ये विद्वेषाची भावना वाढीस लागत असताना व्यक्ती व्यक्तींमधील सहसंवाद आणि स्नेहभाव वृद्धिंगत व्हावा यासाठी रामेश्वर रूई येथे विश्वधर्मी मानवता तीर्थ भवनाची संकल्पना डॉ. विश्वनाथ दा. कराड यांनी केली. त्याची निर्मिती हेच एक मोठे आद्भुत आश्चर्य आहे. ९० फूट रूंदीचा मधला सभागृहाचा भाग हा भारतातील एकमेव द्वितीय असून या सभागृहामध्ये शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक स्नेहभावाचे तसेच ग्रामीण जनतेची काळ्या मातीशी असलेली नाळ दिसून येते.

हिंदवी स्वराज्याचे संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज यांचा साडेतीन फूटाचा अर्ध पुतळा विधिवत पूजन करुण बसविण्यात आला. तीन फूट सात इंचाचा अर्ध पुतळा हा पंचधातुंनी निर्मित केलेला असून त्याचे वजन १४४ किलो आहे. या मूर्तीला सुवर्ण जडीत करण्यात आले आहे. तसेच भगवान गौतम बुद्ध आणि राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची अप्रतिम व रेखीव मूर्तीची निर्मिती करण्यात आली आहे.

# देवणीच्या विकास कामाच्या चौकशीसाठी आमरण उपोषण

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** देवणी नगर पंचायतीला विविध विकास कामासाठी आलेल्या निधीचा योग्य वापर करण्यात आलेला नाही, केलेल्या कामाची चौकशी करावी व झालेल्या कामाचे फलकाद्वारे माहिती प्रसिध्द करावी आदी मागण्यांसाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आमरण उपोषण करण्यात येत आहे.




वर्ष २०२२ पासून देवणी नगर पंचायतीला विविध विकास कामासाठी मोठ्या प्रमाणात निधी प्राप्त झाला. बांधकाम, रस्ते, गटारी, दलित वस्ती, सुलभ शौचालय, पाणीपुरवठा, स्वच्छता, घनकचरा व्यवस्थापन, विद्युत पुरवठा, अग्निशमन, स्वच्छता कामगार यासाठी आलेल्या निधीची माहिती व झालेला खर्च, तसेच नगर पंचायतीने घेतलेल्या ठरावाची प्रोसिडींग बुक, ऑडीट रिपोर्ट, झालेल्या खर्चाची माहिती उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी करण्यात आली होती. त्याचप्रमाणे झालेल्या कामाचे माहितीचे फलक लावणे आवश्यक असतानाही त्याची कार्यवाही करण्यात आली नाही. बोगस व निकृष्ट दर्जाची कामे करून भ्रष्टाचार करण्यात आला. त्याची चौकशी व्हावी यासाठी शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे दीपक उमाकांत स्वामी व माधव रामराव तेलंगे यांनी जिल्हाधिकारी कार्यालयासमोर दि. १० नोव्हेंबरपासून उपोषण सुरू केले आहे.

# एकल महिलांसाठी राबविणार विशेष मोहीम

## रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न : जिल्हाधिकारी

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** जिल्ह्यातील एकल महिलांना शासकीय योजनांचा लाभ देवून त्यांना स्वावलंबी बनविण्यासाठी जिल्हा प्रशासनामार्फत विशेष मोहीम राबविली जाणार आहे. या अंतर्गत रोजगार, स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. पुढील तीन महिन्यात या उपक्रमांतर्गत राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांची माहिती देण्यासाठी, कृती कार्यक्रम निश्चित करण्यासाठी जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या सूचनेनुसार सर्व शासकीय विभाग प्रमुखांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात येणार आहे. जिल्हाधिकारी कार्यालयामध्ये या अनुषंगाने जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

रोहयोच्या उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, जिल्हा नियोजन अधिकारी

### विविध शासकीय विभागांची लवकरच कार्यशाळा; पुढील तीन महिन्यातील कृती कार्यक्रम निश्चित होणार

सोमनाथ रेड्डी, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ, जावेद शेख, जिल्हा महिला व बालविकास अधिकारी संदीप यादव यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

एकल महिलांना शासनाच्या विविध




योजनांचा लाभ देवून त्यांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनविण्यासाठी प्रयत्न करण्याची आवश्यकता आहे. यासोबतच त्यांच्यासाठी रोजगार, स्वयंरोजगार विषयक प्रशिक्षण आयोजित करावीत. १ डिसेंबर २०२५ पासून या अनुषंगाने पुढील तीन महिन्यांसाठी विशेष मोहीम हाती घ्यावी, अशा सूचना जिल्हाधिकारी श्रीमती ठाकूर-घुगे यांनी दिल्या.

# परवाने रद्द केलेली रास्तभाव दुकाने नव्याने सुरु करा : ॲड. ढवळे

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** कायमस्वरुपी परवाने रद्द केलेली महाराष्ट्रातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील रास्तभाव दुकाने नव्याने जाहीरनामे काढून सुरू करण्याची सूचना राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. महेश ढवळे यांनी अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाला केली आहे. यामुळे राज्यात हजारो रेशन दुकाने पुन्हा सुरू होण्याची आशा निर्माण झाली असून यातून रेशन कार्डधारकांची मोठी सोय होणार आहे.

राज्य अन्न आयोगाचे अध्यक्ष ॲड. महेश ढवळे यांनी याबाबत अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना पत्र लिहिले आहे. राज्य अन्न आयोग अध्यक्षांना दिलेल्या जबाबदारींच्या अनुषंगाने राज्यातील जिल्ह्यांना भेटी देऊन तेथील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचा आढावा घेतल्याचे या पत्रात म्हटले आहे. यावेळी असे लक्षात आले की, राज्यात बऱ्याच जिल्ह्यांमध्ये विविध कारणांनी कायमस्वरुपी रद्द केलेली शेकडो तसेच राज्यभर हजारो रास्तभाव दुकाने आहेत. यापैकी न्यायप्रविष्ट प्रकरणांची संख्या तुलनेने कमी आहे, असे या पत्रात निदर्शनास आणून दिले आहे.

कायमस्वरुपी रद्द केलेल्या दुकानांचे रेशन कार्डधारक शासनामार्फत इतर



रास्तभाव दुकानांना जोडणी केलेली आहेत. त्यामुळे अशा जोडणी केलेल्या प्रत्येक रास्तभाव दुकानांकडे ४ ते ५ हजार कार्डधारक लाभार्थी संख्या झालेली आहे. मोठ्या प्रमाणात कार्डधारक असल्याने वितरणावर ताण येत आहे. तसेच लाभार्थींना दूर अंतरांवरुन धान्य घेण्यास जावे लागत आहे. तसेच कांही नागरिकांना नैसर्गिक आपत्तीच्या घटनांमुळे लाभापासून वंचित रहावे लागत आहे. या परिस्थितींचा विचार करता अशा कायमस्वरुपी बंद दुकानांचे परवाने नव्याने वाटप करावेत, अशा सूचना शासनाकडून देणे आवश्यक आहे, असे ॲड. महेश ढवळे यांनी यांनी सूचित केले आहे. रास्तभाव दुकान परवाने वाटताना बचतगटांच्या अनुषंगाने काही निकष दिलेले आहेत. त्यामध्ये समाजातील वंचित घटकांकरिता काम करणाऱ्या संस्था, युवकांकरिता, विधवा, परित्यक्ता, अल्पभूधारक, अत्यल्प भूधारक, अपंग, तृतीयपंथी यांचे बचतगट यांचा देखील समावेश करावा, जेणेकरुन बेरोजगार घटकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध होतील. त्यासाठी तसा सुधारित शासन आदेश निर्गमित करावा, असेही अध्यक्ष ॲड. ढवळे यांनी या पत्राद्वारे अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाच्या प्रधान सचिवांना सूचित केले आहे.

# माहिती कार्यालयातील रद्दी खरेदीसाठी दरपत्रके सादर करा

**त.भा. वृत्तसेवा,**

**लातूर, १२ नोव्हेंबर :** जिल्हा माहिती कार्यालय, येथील वृत्तपत्रांची व मासिकांची रद्दी विक्री करण्यात येणार आहे. यासाठी नोंदणकृत रद्दी खरेदीदारांनी आपली दरपत्रके २१ नोव्हेंबर २०२५ पर्यंत जिल्हा माहिती कार्यालयात सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

इच्छूक रद्दी खरेदीदारांनी आपले दरपत्रके बंद लिफाफ्यात जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती कार्यालय, मध्येवर्ती प्रशासकीय इमारत, तळमजला, उत्तर बाजू, लातूर या पत्यावर २१ नोव्हेंबर २०२५ सायंकाळी ५ वाजेपर्यंत कार्यालयीन वेळेत सादर करावीत. रद्दी खरेदीदाराकडे इलेक्टॉनिग वजन काटा असणे बंधनकारक आहे. या संदर्भातील अटी व शर्ती कार्यालयीन वेळेत कार्यालयात पाहता येतील. दरपत्रकात वृत्तपत्र रद्दी, मासिके रद्दी व पेपर गोळा याचे स्वतंत्र दर नमूद करावेत, रद्दी विक्रीचे दरपत्र मंजूर करणे अथवा रद्द करणे, तसेच संपुर्ण रद्दी विक्री प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार जिल्हा माहिती अधिकारी, लातूर यांना राहतील.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# देगलुरात निष्ठावंतांच्या नाराजी सूर कोणाला भोवणार ?

**तभा वृतसेवा**
**देगलूर, दि. १२ नोव्हेंबर-**

आगामी स्थानिक स्वराज्य निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर निष्ठावंत कार्यकर्त्यांची नाराजी हा नव्या राजकीय समीकरणाचा केंद्रबिंदू ठरण्याची चिन्हे दिसत आहेत. गेली अनेक वर्षे पक्षनिष्ठेने काम करणाऱ्या कार्यकर्त्यांना उमेदवारीचे बक्षीस मिळेल, अशी अपेक्षा होती. मात्र उमेदवारीच्या वाटपात काही निष्ठावंतांना बाजूला ठेवून नव्या चेहऱ्यांना संधी देण्यात आल्याने नाराजीचा सूर तीव्र झाला आहे. काही निष्ठावंतांनी पक्षांतर केले तर काही अपक्ष उमेदवार म्हणून निवडणूकीच्या रिंगणात उतरणार असल्याचे सांगण्यात येते.

मागील अनेक वर्षापासून हातात पक्षाचा झेंडा आणि डोक्यात पक्षाचा अजेंडा घेऊन प्रामाणिक काम करणाऱ्या निष्ठावंतांना



आगामी निवडणुकीत उमेदवारीपासून डावलण्यात आल्याने तीव्र नाराजीचा सूर निर्माण झाला आहे. आजपर्यंत या निष्ठावंत कार्यकर्त्यांनी छतरंज्या उचलण्यापासून ते सभेत भाषण करण्यापर्यंत सर्व कामे केली आहेत. उमेदवारीचे बाशिंग बांधून निवडणुकीच्या भोवल्यावर बसण्याचा तयारीत असणाऱ्या निष्ठावंतांना काही पक्षाकडून डावलण्यात आले आहे. त्यामुळे काहींनी पक्षांतर करुन इतर पक्षाकडे आपली उमेदवारी निश्चित केली आहे तर काही पक्षांतराच्या मार्गावर आहेत. याचाच परिणाम म्हणून आगामी नगरपरिषद निवडणुकीत नगराध्यक्ष पदाला धक्का बसेल की त्या निष्ठावंताच्या जागी देण्यात आलेल्या नव्या चेहऱ्याला फटका बसेल हे आतातरी सांगणे अवघड आहे, पण निष्ठावंताच्या नाराजीचा सूर कोणालातरी नक्की भोवणार ? हे मात्र निश्चित!

यंदा मोठ्या प्रमाणात पक्षांतराचे सत्र चालूच आहे. या निर्णयामुळे पक्षांतर्गत असंतोष वाढत असून, काही ठिकाणी निष्ठावंत कार्यकर्ते स्वबळावर किंवा अपक्ष उमेदवार म्हणून मैदानात उतरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे मतांची विभागणी होऊन काही पक्षांचे गणित बिघडण्याची भीती व्यक्त केली जात आहे.

सध्या नगराध्यक्ष पदाची निवड थेट जनतेकडून होत असल्याने, प्रत्येक मताचे मोल अधिक वाढले आहे. नाराज निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या नाराजीचा परिणाम थेट नगरसेवक आणि नगराध्यक्ष या दोन्ही निवडणुकांवर होऊ शकतो. त्यामुळे पक्षनिष्ठ कार्यकर्त्यांना समजावून घेण्याचे मोठे आव्हान आता सर्वच पक्षांसमोर उभे टाकले आहे.

दरम्यान, काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट), भाजप आणि इतर पक्षांनी आपल्या रणनीतींमध्ये बदल करण्यास सुरुवात केली असून, निष्ठावंतांच्या नाराजीचा फटका टाळण्यासाठी संपर्क मोहिमा गतीमान केल्या आहेत. मात्र, या नाराजीचा फटका शेवटी कोणत्या पक्षाला बसतो आणि कोणाचे राजकीय गणित कोसळते, हे येत्या काही दिवसांत स्पष्ट होणार आहे.

# हिमायतनगर तालुक्यातील शेतकरी अतिवृष्टीच्या अनुदानापासून वंचित

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १२ नोव्हेंबर-**

शेतकऱ्यांना शासनाकडून अनुदान जाहीर करण्यात आले आहे. हिमायतनगर तालुक्यातील असंख्य शेतकऱ्यांना अनुदान खात्यात जमा झाले असले तरी यातील अनेक शेतकरी अनुदानापासून वंचित राहिले असून शेतकऱ्यांच्या खात्यात अद्यापही अनुदान जमा झाले नसल्यामुळे सोमवारी (दि.१०) तहसीलदार यांना लेखी निवेदनाद्वारे अनुदान जमा करण्याची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

हिमायतनगर तालुक्यात ऑगस्ट, सप्टेंबर महिन्यामध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिके खरडून मोठ्या प्रमाणात नुकसान झाले होते. त्या शेतकऱ्यांना राज्य शासनाकडून अनुदानाची आकडेवारी जाहीर करण्यात आली तसेच रब्बी हंगामाकरिता दहा हजार रुपये देखील शेतकऱ्यांच्या खात्यात आठ दिवसांपूर्वी जमा करण्यात आले आहेत. हे सुध्दा अनुदान शेतकर्याच्या खात्यात जमा झाले नाही. अनुदानाच्या याद्याचे तलाठ्यांकडून मूल्यांकन होऊन सदरील याद्या प्रसिद्ध देखील करण्यात आली आहेत. त्या यादीमध्ये शेतकऱ्यांचे नाव असूनदेखील संबंधित शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये अद्यापही अनुदान जमा झाले नसल्यामुळे शेतकऱ्यांनी सोमवारी तहसीलदार यांची भेट घेऊन त्यांना निवेदन दिले आहे.

या निवेदनावर अब्दुल गफार कार्लेकर, संजय कदम, दिलीप सावळे, यशवंतराव डोलारीकर, अब्दुल जुनेद, सरस्वती साळवे, ओमकार कदम कोकरे, हनुमंता कांबळे, अंकुश वाटोळे, अब्दुल रहक आदींच्या सह्या आहेत.

## अनुरेखा गायकवाड यांच्या उमेदवारीच्या चर्चेने राजकीय वातावरण तापले!

**नरसी**-आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचा बिगुल वाजताच नायगाव तालुक्यातील राजकीय समीकरणांना चांगलाच



वेग आला आहे. नुकत्याच जाहीर झालेल्या आरक्षणानुसार नरसी जिल्हा परिषद गट अनुसूचित जाती प्रवर्गासाठी राखीव ठरला असून, या गटातून नरसी येथील सामाजिक कार्यकर्ते प्रभाकर गायकवाड यांच्या सौभाग्यवती सौ. अनुरेखा प्रभाकर गायकवाड या रिंगणात उतरण्याची जोरदार चर्चा रंगू लागली आहे. महाविकास आघाडीच्या तिकीटावर निवडणूक लढविण्याची त्या तयारी करत असून, त्या नरसी ग्रामपंचायत च्या सदस्या आहेत. त्या सामाजिक कार्यातून जनतेच्या मनात घर केलेल्या गायकवाड दाम्पत्यास संधी द्यावी अशी मागणी स्थानिक मतदारांकडून होत आहे. नरसी गटातील अनेक गावांमध्ये अनुरेखा गायकवाड यांचा दांडगा जनसंपर्क, शांत स्वभाव आणि प्रभावी संवादशैली हे त्यांच्या राजकीय ताकदीचे वैशिष्ट्य मानले जात आहे. यामुळेच महाविकास आघाडीकडून या गटासाठी उमेदवारीच्या चर्चेत गायकवाडांचे नाव अग्रस्थानी असल्याचे स्पष्ट दिसत आहे. राजकीय जाणकारांचे मत आहे की, नरसी गटात गायकवाड दाम्पत्याचा प्रभाव आणि त्यांचा कार्यकर्त्यांशी असलेला सखोल संपर्क पाहता, आघाडीने जर योग्य वेळी निर्णय घेतला तर हा गट जिंकणे अवघड ठरणार नाही. दरम्यान, आघाडीतल्या अंतर्गत चर्चांमुळेही या गटातील राजकीय तापमान दिवसेंदिवस वाढत असून, गायकवाड विरुद्ध बाकी सर्व असे समीकरण रंगण्याची चिन्हे स्पष्ट दिसत आहेत.

# धनेगाव सर्कल मधून बालाजी भायगावकर की उद्धव शिंदे?

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. १२ नोव्हेंबर-**

आगामी चालू असलेल्या जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीचे वारे जोरात वाहत असल्याने धनेगाव सर्कल मधून शिवसेना शिंदे गटाचे जिल्हा परिषदेसाठी निष्ठावंत कार्यकर्ते बालाजी भायगावकर व उद्धव शिंदे हे दोघेही कामाला लागले आहेत. तेव्हा पक्षश्रेष्ठी पुढे आव्हान असणार आहे. दोघांपैकी कोणाची वर्णी लागणार याकडे पूर्ण सर्कलचे लक्ष लागले आहे.



जिल्हा परिषद निवडणुका २०२५ या अनुषंगाने सर्कल मध्ये शिवसेना शिंदे गटाचे उद्धव शिंदे व बालाजी भायगावकर हे दोन्हीही कार्यकर्ते मोठ्या उमेदीने सर्कलमध्ये मतदारांशी भेटीगाठी घेऊन कॉर्नर बैठकावर जोर दिला आहे. हे दोन्ही कार्यकर्ते आजपर्यंत पक्षाची एकनिष्ठ राहून पक्षांच्या जडणघडणासाठी अहोरात्र कार्य करत आले आहेत. पक्षाची एकनिष्ठ राहून अनेक सामाजिक उपक्रम राबवले आहेत. तसेच जनतेची विकासात्मक कार्य केले आहेत. दोन्ही उमेदवार धनेगाव सर्कल मधून जिल्हा परिषद निवडणूक लढवण्यास इच्छुक आहेत तेव्हा आमदार हेमंत पाटील व आमदार आनंदराव पाटील बोंढारकर हे या दोघांपैकी कोणाला न्याय देणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. या दोन्ही इच्छुक उमेदवारा पैकी एक उमेदवार निवडण्यासाठी पक्षश्रेष्ठींना मोठ्या आव्हानास तोंड द्यावे लागेल. यामध्ये बालाजी भायगावकर यांचे सामाजिक उपक्रम राबवणे व सामाजिक कार्यामध्ये अग्रेसर असल्याची चर्चा मतदारातून ऐकावयास मिळते. पण उद्धव शिंदे हे देखील सामाजिक कार्यात मागे नसल्याचे बोलले जाते या दोन इच्छुक उमेदवारा पैकी एकाना न्याय देताना पक्षश्रेष्ठीची प्रतिष्ठा पणला लागणार आहे. याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुदखेड मध्ये भाजपाच्या उमेदवाराची काँग्रेस उमेदवारासोबतच झुंज

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. १२ नोव्हेंबर-**

मुदखेड नगरपरिषदेची निवडणूक जाहीर होण्या पूर्वीपासूनच भाजपाकडे इच्छुक उमेदवाराची गर्दी झाली होती नगराध्यक्ष पदासाठी २२ उमेदवार इच्छूक होते मुलाखतीनंतर सध्या तरी दोन नावे पुढे येत आहेत यात विश्रांती माधव कदम. ज्योती रामसिंग चव्हाण.

हे नावे पुढे येत असले तरी केवळ एकाची उमेदवारी निश्चित आहे भाजपाच्या अशोक चव्हाण यांच्या साठी हे निवडणूक अतिशय प्रतिष्ठाची आहे भाजपा च्या राजनीतीवर लक्ष देऊन काँग्रेस सुद्धा यावेळी आपली रणनीती आखत आहे कॉग्रेस कडून उमेदवारी मीळाला सौ.शीलाताई राजबहादुर कोत्तावार ह्याच भाजपा च्या उमेदवारासी झुंज देऊ शकतात



असे नागरिकात बोलल्या जात आहे यावेळी मुदखेड नगरपरिषद निवडणूक अतिशय चुरशीची होणार असून या निवडणुकीत भाजपा काँग्रेस एम आय एम व अपक्ष बहुजन समाज पक्ष अजित पवारराष्ट्रवादी काँग्रेस व शिंदे शिवसेना हे अप आपल्या परीने मोर्चे बांधणी करत आहेत परंतु काँग्रेस भाजपा यांच्यातच चुरशीची लढाई होईल असे सध्या तरी दिसते अकरा तारखेपर्यंत एकही उमेदवारी अर्ज दाखल झालेला नाही भाजपा काँग्रेस यांचे उमेदवार अजूनही निश्चित झाले नसल्याचे बोलल्या जाते दि. १७ नोव्हेंबर पर्यंत उमेदवारी दाखल करण्याची शेवटची तारीख आहे पक्षाचे बी फार्म लागल्यानंतरच कोण उमेदवार हे निश्चित होतील सध्या तरी उमेदवारी मलाच मिळावी यासाठी अनेकानी भाजपा व काँग्रेसकडे जोर लावल्याचे दिसते तर अनेकांनी दस्त्या बदलून नवीन पक्षाकडून उमेदवारी मिळण्यासाठी प्रयत्न करताना दिसतात असे असले तरी या निवडणुकीत भाजपा व काँग्रेस यांच्यासाठी निवडणूक प्रतिष्ठेची ठरणार आहे एम आय एम मुळे कोणाचे नुकसान होईल आणि कोणाचा फायदा होईल की एमआयएमच बाजी मारेल असंही अनेकांतून बोलल्या जात असले तरी काँग्रेस व वंचित आघाडीच्या युतीमुळे काँग्रेसचाच विजय होईल जाणकाराचे मत आहे.

## कोळी येथे वाढिवसानिमित्त जिल्हा परिषद शाळेत साहित्य वाटप

**निवघा बा.**-तालुक्यातील कोळी येथील सामाजिक कार्यकर्ते असलेले तसे मनाठा जिल्हा परिषद साठी इच्छुक असलेले जयदीप जाधव यांनी वाढदिवसाचा खर्च नाहकपणे करून उधळपट्टी करण्यापेक्षा हाच पैसा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यात उपयोगात आणून त्यांच्या गरजा



पूर्ण केल्या तर विद्यार्थ्यांची शालेय गोडी वाढून त्यांच्या गरजा पूर्ण होवू शकतात. हा उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून कोळी गावचे समजिक कार्यकर्ते तसे मनाठा जिल्हा परिषद साठी शिवसेनेकडून इच्छुक असलेले जयदीप जाधव यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्त कोळी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. मंगळवारी (ता. ११) वाढदिवसानिमित्त जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कोळी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले. त्यामध्ये वही शैक्षणिक साहित्य याचे वाटप केले. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र कोळी येथे जाऊन रुग्णांना फळ तसेच बिस्कीट वाटप केले. या कार्यक्रमासाठी हदगाव हि. नगर विधानसभेचे लोकप्रिय आमदार बाबुराव कदम साहेब यांचे चिरंजीव शिवराज पाटील कदम , तसेच शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष राजाराम पाटील चौतमाल , गावचे सरपंच प्रा. डॉ. संजीव कदम , जिल्हा परिषद शाळेचे मुख्याध्यापक रसुरे सर , साहेबराव शिंदे , गजानन पतंगे , संतोष चौतमाल, संजय पाटील , दिगंबर गाढे , गजानन चौतमाल, धनंजय क्षीरसागर , अमोल पाटील कदम , अमोल चौतमाल, गोविंद चौतमाल, वैभव कदम , संदीप जाधव , बाळू चौतमाल, अमोल जाधव तसेच बरेच राजकीय नेते पदाधिकारी शाळेचे शिक्षक शिक्षिका उपस्थित होत्या.

## विक्रम सुकुनगे यांचे निधन

**तभा वृतसेवा**
**बाऱ्हाळी, दि. १२ नोव्हेंबर-**



बाऱ्हाळी येथील आडत व्यापारी विक्रम सुरेश सुकूनगे ( वय ३२ ) यांचे बुधवार दि. १२ नोव्हेंबर रोजी सकाळी ७ वा. हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर बुधवारी दु. ४:३० वा. मौजे बापशेटवाडी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई, वडील, पत्नी, एक भाऊ, एक बहीण, एक मुलगा असा परिवार आहे. बाऱ्हाळी येथील आडत व्यापारी सूरेश सुकुनगे यांचा मुलगा तथा सहशिक्षक गंगाधर सुकुनगे यांचा तो पुतण्या होत. मनमिळावू तथा हसमुख चेहरा विक्रम सुकुनगे यांच्या अकाली निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

# जि. प. माध्यमिक शाळेच्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनींचा स्नेह मिलन

**तभा वृतसेवा**
**हिमायतनगर, दि. १२ नोव्हेंबर-**

शहरातील सर्वात जुनी नामवंत असलेली जिल्हा परिषद माध्यमिक शाळेतील शैक्षणिक वर्ष सन १९८७च्या दहावीच्या बॅचच्या माजी विद्यार्थी-विद्यार्थिनी भव्य स्नेहमिलन व गुरुजनांचा सन्मान सोहळा कै.विजय अप्पा बंडेवार यांच्या मळ्यात ९ नोव्हेंबरला मोठ्या उत्साहात आयोजित केला होता.धकाधक्कीच्या व धावपळीच्या जीवनात शालेय काळातील मित्र मैत्रिणी आणि आठवणीला जिवंत करण्याचे उत्तम माध्यम स्नेह मिलनाचा कार्यक्रम होय.या कार्यक्रमातून जीवनात एक उर्जा व नवसंजीवनी मिळते.असाच सुंदर कार्यक्रम येथे घडवुन आणला गेला आहे.सन १९८७च्या बॅच मधील विविध क्षेत्रातील महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यातुन नोकरी,व्यवसाय, करणारे मित्र मैत्रिणी तब्बल ३८ वर्षानंतर स्नेह मिलन व गुरुजनांचा सन्मान सोहळ्याला एकत्र आले होते. या स्नेह मिलन सोहळ्याचे सत्कार मुर्ती तथा मार्गदर्शक विज्ञान शिक्षक नागनाथ आक्कलवाड,कला शिक्षक बाबुराव घुंगरे,गणित शिक्षक बालाजी शिंदे,मराठी शिक्षक निवृती खिराडे हे होते. दहावी सन १९८७च्या बॅचने चारही गुरुजनांचा भव्य-दिव्य सत्कार केला.हा कार्यक्रमाचे नियोजन व परिश्रम गोविंद बंडेवार,मु.अ. कल्याण गायकवाड,मोहन नाईक,परमेश्वर तिप्पनवार,प्रा.लक्ष्मण डाके, शंकर वानखेडे यांनी केले.सरस्वती स्तवन परमेश्वर तिप्पनवार यांनी गायन केले. प्रास्ताविक शंकर वानखेडे यांनी केले.. त्यानंतर १९८७च्या दहावी बॅचने आपला परिचय व्यासपीठावर येऊन करुन दिला होता.त्यानंतर लक्ष्मण शीमशेट्टी,संगीता पिंचा,प्रा.आर्चना थोटे, प्रा. रावसाहेब पाटील, वर्षा बंडेवार, डॉ.संजय पिंचा,ज्योती कुलकर्णी, छायाताई पुयड, डॉ.आजम खान,विलास कोटूरवार,प्रा. श्याम इंगळे आदीने जीवनातील जुण्या आठवणी व स्वतः करीत असलेली नोकरी, व्यवसाय, मुले काय करतात.हे सांगुन सरांनी पुस्तकी ज्ञाना बरोबर व्यावहारिक ज्ञान सरांनी दिल्याने आज यशस्वी झाले आहेत,असे ही अनेकांनी सांगितले. आम्हाला योग्य मार्ग दाखविला,त्यामुळे आम्ही यशाचे शिखर गाठले असे,प्रभावी मनोगत व्यक्त केले. या प्रसंगी उपस्थित शिक्षक एम.एम. पांचाळ, जी.एस.पवार, डी.टी. वऱ्हाडे से.नि. मु.अ.अशोक अनगुलवार,सत्कार मुर्ती तत्कालीन शिक्षक बाबुराव घुंगरे,निवृती खिराडे,बालाजी शिंदे यांनी १९८७ची बॅच ही अतिशय अभ्यासु,प्रतिकुल परिस्थितीवर मात करुन मेहनत घेणारी होती.म्हणूनच ही मुले विविध क्षेत्रात निपुण आहेत. सुरेख सुत्रसंचलन मु.अ. कल्याण गायकवाड यांनी केले.

## महिला बचत गटास मशरूम लागवड प्रशिक्षण

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ नोव्हेंबर-**

महिलांनी शेती करत असताना शेतीला जोड व्यवसाय करावा यासाठी कृषी विज्ञान केंद्र नांदेड व माविम सावित्री लोक संचलित साधन केंद्र यांच्या माध्यमातून बचत गटातील महिलांना मशरूम लागवड प्रशिक्षण देण्यात आले.

कमी भांडवल, कमी जागा व पुरेशा संसाधनाचा वापर करून महिलांना मातीविरहित शेतीपूरक व्यवसाय म्हणून मशरूम उत्पादन हा एक उत्पन्नाचा चांगला पर्याय असून आपल्या भागात मशरूम लागवड चांगल्या पद्धतीने करता येते आणि मशरूमची लागवड करताना घ्यायची काळजी, लागवड करण्याची पद्धत, बी निवड, हार्वेस्टिंग पद्धत, खाण्यायोग्य सुरक्षित मशरूमची उत्पादन करणे या बाबत प्रात्यक्षिक प्रा. माणिक कल्याणकर यांनी उपस्थित प्रशिक्षणार्थी यांना दिला.

मशरूम आहारात समावेश केल्याने रोगप्रतिकारशक्ती वाढवते, त्वचा आणि केसांसाठी चांगले, पचन सुधारते, व्हिटॅमिन डीचा वनस्पती-आधारित स्रोत, मधुमेह नियंत्रित करण्यास मदत, मशरूम रक्तातील साखर नियंत्रित ठेवण्यास मदत करू शकते. असे गृह विज्ञान तज्ज्ञ प्रा. अलका पवळे यांनी सांगितले.


### जाहिर प्रगटन

नोंदीचा प्रकारःखरेदी
माहिती मिळलेचा दिनांकः०६/११/२५
फेरफाराचा दि.०७/११/२५

लिहून देणारःबालाजी यादवराव दंडवे रा.भोकर(खाता क्र.४६४)गट क्र./सर्व्हे क्र.४८१लागवडी योग्य क्षेत्र ०.५१९५ हे.आर.चौ.मी.पैकी लागवडी योग्य क्षेत्र०.०१११हे. आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.त्यांनी सदरील गट क्र.४८१ मधील क्षेत्र ०.०१११ दस्त क्र.११४२ दिनांक २०/०८/१९९६ रोजी लक्ष्मण नारायणराव दंडवे यांना विक्रि केला होता पूढे तोच प्लॉट लक्ष्मण नारायणराव दंडवे यांनी दस्त क्र.१३३८ दिनांक १८/१२/२००३ रोजी लक्ष्मण भामला राठोड यांना विक्रि केलाकरिता नोंद घेण्यात आली.संमतीदेणारेखातेदारःलक्ष्मण नारायणराव दंडवे(खाता क्रमांकः०)दस्त क्र.११४२ दिनांक २०/०८/१९९६

लिहून घेणारःलक्ष्मण भामला राठोड(खाता क्र.१११२६)गट/सर्व्हे क्र.४८१लागवडी योग्य क्षेत्र ०.०१११हे.आर.चौ.मी.आणि पोटखराब क्षेत्र ०.००००हे.आर.चौ.मी.यांना दूय्यम निबंधक भोकर जिल्हा नांदेड यांचेकडील खरेदी दस्त क्र.१३३८दि.१८/१२/२००३प्रमाणे रक्कम रुपये ६००००घेवून खरेदी दिली.सबब खरेदी घेणाऱ्यांचे नाव गाव नमूना नं.७/१२वर दाखल केले.ज्या अर्थी तूमचा उक्त फेरफारात हितसंबध आहे असे अधिकार अभिलेखावरुन फेरफार नोंदवहीवरुन मला वाटते ज्या अर्थी उक्त फेरफारात तूमचा हितसंबध आहे असे मानण्यास संयूक्तिक कारण आहे.उक्त फेरफाराच्या नोंदी संबधी तूम्हास सूचना मिळाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत उक्त नोंदीसंबधी तूमची हरकत कोणतीही असल्यास ती तोंडी किंवा लेखी पाठविण्यास फर्मावित आहे.ग्राम महसूल अधिकारी भोकर यांचेकडे पंधरा दिवसाच्या मूदतीत कोणतीही हरकत त्यांचेकडे न मिळाल्यास उक्त नोंदीस तूमची संमती आहे,असे ग्रहित धरले जाईल.

**ग्राम महसूल अधिकारी**
**तलाठी साझा भोकर**


# रब्बी हंगामातील पिकांसाठी पाणीपाळी ; शेतकऱ्यांना अर्ज करण्याची २० नोव्हेंबरपर्यंत मुदत

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. १२ नोव्हेंबर-**

नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) नांदेड या विभागांतर्गत असणाऱ्या निम्न मानार मोठा प्रकल्प, करडखेड मध्यम प्रकल्प, कुंद्राळा मध्यम प्रकल्प, पेठवडज मध्यम प्रकल्प, महालिंगी मध्यम प्रकल्प, कुदळा मध्यम प्रकल्प, १ कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे, २ निम्न पातळी बंधारे व ४९ लघु प्रकल्पांच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांनी या प्रकल्पांवर रब्बी हंगाम सन २०२५-२०२६ राबविण्याचे नियोजित आहे. रब्बी हंगाम, दुहंगामी व इतर बारमाही पिकांसाठी कालव्याचे प्रवाही, मंजूर उपसा, मंजूर जलाशय उपसा व मंजूर नदी-नाले उपसा सिंचनासाठी ज्यांना पाणी घ्यावयाचे आहे त्यांनी आपले पाणी मागणी अर्ज विहीत नमुन्यात (नमुना नंबर ७, ७ अ) गुरूवार २० नोव्हेंबर २०२५ पूर्वी संबंधित शाखा कार्यालयात माहिती भरून सादर करावेत, असे आवाहन नांदेड पाटबंधारे विभाग (दक्षिण) चे उपकार्यकारी अभियंता आर. एस. पवार यांनी केले आहे.

सर्व धरणात ७ ऑक्टोबर २०२५ रोजीच्या स्थितीनुसार १०० टक्के पाणीसाठा उपलब्ध असून उपलब्ध पाणी साठ्याच्या अनुषंगाने प्रकल्पाच्या लाभक्षेत्रात रब्बी हंगाम पूर्ण क्षमतेने राबविण्याचे नियोजित आहे. या नियोजनास आवश्यकतेनुरुप कालवा सल्लागार समितीची मंजूरी मिळाल्यानंतर त्याप्रमाणे पाणीपाळी सोडण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्याअनुषंगाने सर्व संबंधित लाभधारकांना हंगाम सुरू होण्यापूर्वी पुढील अटी व शर्तीची पूर्तता करावी.

पिकांचे मागणी क्षेत्र २० आरच्या पटीत असावे. कालवा संचलन कार्यक्रमानुसारच पाणी घेणे बंधनकारक राहील. पाणीपट्टी न भरणाऱ्या व पाणी अर्ज नामंजूर असलेल्या लाभधारकास सिंचनासाठी पाणी देणे या कार्यालयास बंधनकारक राहणार नाही. काही अपरिहार्य कारणास्तव किंवा तांत्रिक कारणास्तव पाणी पुरवठा करणे शक्य न झाल्यास होणाऱ्या नुकसानीस हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. तसेच महाराष्ट्र पाटबंधारे प्रचलित नियमांचे लाभधारकांकडून उल्लंघन झाल्यास कोणतीही आगाऊ सुचना न देता दिलेली मंजुरी रद्द करण्यात येईल व पाणीपुरवठा रद्द करण्यात येईल.

सिंचन पाणीपाळी दरम्यान कालव्याची काही तुटफूट झाल्यास त्याची दुरुस्ती झाल्यानंतर कालव्यात पाणी सोडण्यात येईल. महाराष्ट्र पाटबंधारे अधिनियम १९७६, कालवे नियम १९३४, म.सिं.प.शे.व्य. कायदा २००५ तसेच महाराष्ट्र जलसंपदा विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या तरतुदीनुसार सर्व शर्ती व अटी बंधनकारक राहतील याची सर्व लाभधारकांनी नोंद घ्यावी.

लाभधारकांनी दिवस व रात्रीच्या वेळेस पाणी घेणे बंधनकारक आहे. रात्रीच्या वेळेस पाणी न घेतल्यामुळे पाणी नदीनाल्यास वाया जाऊन ठराविक मुदतीत पाणी न मिळाल्यास हे कार्यालय जबाबदार राहणार नाही. शासन निर्णयातील प्रचलित दरानुसार पाणीपट्टीचे दर आकारण्यात येतील. थकीत व चालू पाणीपट्टी वेळेत भरुन सहकार्य करावे. शेतचारी स्वच्छ व दुरुस्त ठेवण्याची जबाबदारी संबंधित लाभधारकांची राहील. उडाप्याच्या अंतिम क्षेत्रास पाणी पुरवठा करणे बंधनकारक राहणार नाही. पाणी पाळी सुरू असताना जबरदस्तीने अथवा विनापरवानगी विद्युत मोटारी, ट्रॅक्टर द्वारे पाणी उपसा केल्यास अथवा गेट उघडल्यास नियमानुसार दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल.

जे लाभक्षेत्र पाणी वापर संस्थेस हस्तांतरीत करण्यात आले आहे त्या लाभक्षेत्रावर नियमानुसार पाणी मागणी, वसूली आणि सिंचनाचे नियंत्रण पाणी वापर संस्थेने करावे. अन्यथा पाणी पुरवठा केला जाणार नाही. प्रत्येक कालव्यावर शेजपाळी पत्रकानुसार पाणी देण्याचे नियोजन असून बागायतदारांनी शाखा कार्यालयात पाणी मागणी करणे आवश्यक आहे.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण यांचे आदेश क्रमांक ३/२०१९ नुसार कालव्यावरील खाजगी उपसा योजनांना केवळ खरीप व रब्बी हंगामा पुरता पाणी परवाना लागू असल्याने २८ फेब्रुवारी नंतर उन्हाळी हंगामामध्ये सदर योजनांना पाणी उपसता येणार नाही. जलसंपदा विभागाच्या शासन निर्णय दिनांक २१ नोव्हेंबर २००२ नुसार उपसा योजनांच्या मुख्य जलवाहिनींच्या मुखाशी जल मापक यंत्र बसविणे सूक्ष्म ( ठिबक तुषार ) सिंचनाचा अवलंब करणे इत्यादी बाबत करारनाम्यातील अटींचे पालन करणे अनिवार्य असेल.

यावर्षी रब्बी हंगामामध्ये प्रामुख्याने गहू, हरभरा, ज्वारी इत्यादी रब्बी पिकांना पाणीपुरवठा करण्यात येईल तरी लाभधारकांनी जास्तीत जास्त क्षेत्रावर सदर पिके करावीत व त्याचे पाणी अर्ज देऊन राष्ट्रीय उत्पन्नात भर घालावी. पाणी अर्ज दिला म्हणजे परवानगी मिळाली असे गृहीत धरू नये. आलेली एकूण मागणी व सिंचनासाठी उपलब्ध होणारे पाणी याबाबी विचारात घेऊन केलेली मागणी अंशतः अगर पूर्णपणे मंजूर/नामंजूर करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत. पाणी मागणी अर्ज न देणाऱ्या लाभधारकास पाणी मागण्याचा हक्क राहणार नाही.

ज्या शाखेचे सिंचन चालू असेल त्याचवेळी त्या शाखेअंतर्गत उपसा सिंचन योजना चालू ठेवण्याची परवानगी देण्यात येईल. चालू असलेल्या शाखेचे सिंचन पूर्ण होईपर्यंत वरच्या इतर सर्व शाखांनी उपसा सिंचन योजना बंद ठेवावयाचे आहेत. सदर उपसा सिंचन योजना बंद ठेवणेस विरोध करणाऱ्या लाभधारकांचा परवाना रद्द करणे याबाबतची तसेच विद्युत पुरवठा कायमस्वरूपी खंडित करण्याची कार्यवाही करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाच्या २९ मार्च २०२२ चे निर्देशानुसार पाण्याचा उत्पादनक्षम व काटकसरीने वापर करण्याच्या दृष्टीने उपसा सिंचन योजनेस पाणी मोजमापक यंत्र अनिवार्य आहे. थकित पाणीपट्टी न भरल्यामुळे लाभधारकांना पाणी न सोडल्यास अथवा सोडण्यास विलंब झाल्यास होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी जलसंपदा विभागाची राहणार नाही.

थकीत पाणीपट्टी न भरल्यामुळे थकबाकी रक्कम जमिनीच्या ७/१२ उताऱ्यावर बोजा रूपाने वर्ग करण्यात येईल. परवान्याशिवाय पाणी घेऊ नये. बिगर परवाना बिनअर्जी पिकास पाणी घेतल्यास नियमानुसार पंचनामे करून दंडनीय दराने आकारणी करण्यात येईल. पाण्याचे योग्य नियोजन करण्यासाठी सर्व लाभधारकांनी मुदतीत पाणी अर्ज देऊन सहकार्य करावे. या सर्व अटी व नियमांचे पालन करुन विभागास सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले आहे.


**MACP No. 160/2021**
**IN THE COURT OF HONBLE MOTOR ACCIDENT CLAIM TRIBUNAL, SOLAPUR**

Exh-28
D

MSRTC Solapur --- Petitoner
V/S
Mr. Gurudatta Ankush Dimble etc. --- Respondent

To.
Respondent No.3 Mr.Paramjeet Kour Harjitsing Mathare,
Age- adult Occu. Driver,
R/O Rajkiran Building, Bafan road, Nanded,
Dist. Nanded(Driver of Truck No. KA-39-5350)

Whereas the above named petitioner has filed a M.A.C.P. No.u/Sec 166 of Motor vehicle Act. 1988 against you are bearing M.A.C.P. No.160 of 2021 in the court of Hon'ble District judge, Solapur but inspire multiple summons issue in your name you have failed to appear before the hon'ble court to answer the claim of the petitioner. Hence this paper publication notice. Hence the notice kindly be published in daily Tarun Bharat news paper.

You are hereby directed to appear before the Hon'ble court On 01-01-2026 at 11.00 a.m.personal to answer the claim of the petition, failing at which the case will be heard decided in your absence accordance with law.

Given under my hand and seal of the Hon'ble court on this 07th day of Nov. 2025

junior Clerk
Hon'ble District Court, Solapur.

By Order
Suprintendent.
Hon'ble District Court, Solapur.





बीड जिल्ह्यात गेल्या दोन दिवसापासून थंडीची वाढ झाल्यामुळे बीड शहरातील सुभाष रोडवर स्वेटर खरेदी करण्यासाठी नागरिक गर्दी करू लागले आहेत. (छाया-कृष्णा शिंदे)

## निवृत्ती वेतनधारक व कुटूबंनिवृत्ती धारकांनी ३० नोव्हेंबरपर्यत हयात प्रमाणपत्र सादर करावे

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.१२ नोव्हेंबर**

बीड जिल्हा कोषागार अंतर्गत निवृत्ती वेतन घेणारे निवृत्ती वेतन धारक व कुटुंबनिवृत्तीवेतन धारक यांनी ३० नोव्हेंबरपर्यंत हयात असल्याबाबत दाखला सादर करण्याचे आवाहन जिल्हा कोषागार अधिकारी यांनी केले आहे.

हयात असल्याबाबतचा दाखला नोंदविण्यासाठी बँकेत हयात दाखला यादी पाठविण्यात आलेली आहे. राज्य शासकीय निवृत्ती वेतनधारक व कुटुंब निवृत्ती वेतन धारक यांनी न चुकता बँकेत जाऊन सदर यादीमध्ये आपल्या नावापुढे स्वाक्षरी करुन किंवा अंगठयाचा ठसा उमटवून हयातीचा दाखला सादर करावा.

जीवन प्रमाण या संकेत स्थळावर जावून ऑनलाईन पध्दतीने देखील हयात दाखला सादर करता येईल. हयातीच्या प्रमाणपत्रावर बँक अधिकारी किंवा राजपत्रित अधिका-याच्या समक्ष स्वाक्षरी करुन जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करता येईल. निवृत्ती वेतनधारक काही कामानिमित्त परदेशात असल्यास तेथील भारतीय राजदुतामार्फत हयातीचा दाखला संबंधित जिल्हा कोषागार कार्यालयात सादर करता येईल.

# अंबाजोगाई शहरातील असंख्य युवकांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश

**तभा वृत्तसेवा**

**अंबाजोगाई दि.१२ नोव्हेंबर**





अंबाजोगाई शहरातील विविध प्रभागातील तरुण युवकांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्या उपस्थिती मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केला. अंबाजोगाई शहराचे विकास पुरुष माजी नगराध्यक्ष यांच्या कार्यशैलीवर प्रभावित होऊन तसेच त्यांनी अंबाजोगाई शहराचा मागील पंचवीस वर्षात केलेला विकास पाहून शहरातील युवा कार्यकर्ते अनिकेत पटाईत व युवराज पटाईत, मुनिर शहा व भीमसेन लोमटे यांच्या माध्यमातून अनेक युवकांनी जाहीर पक्षप्रवेश केला. पक्षप्रमुख तथा उपमुख्यमंत्री ना अजितदादा पवार , प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे, प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी, जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण , तसेच युवा जिल्हाध्यक्ष बळीराम गवते यांच्या विचारांवर प्रेरित होऊन तसेच त्यांचेच विचार गावपातळीवर पोचवण्यासाठी अंबाजोगाई शहरातील विविध भागातून शेकडो युवक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश करत आहेत. या पक्षप्रवेश सोहळ्या प्रसंगी युवा नेते तथा श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कार्यकारी संचालक संकेत मोदी, सुनील वाघाळकर,अंकुश हेडे, निसार बेग,महेश कदम, शुभम टेकाळे, प्रशांत टेकाळे महेश वाघमारे, आकाश वाघमारे, दत्ता काळे, सुरज चव्हाण, वैभव टेकाळे, वेदांत काटे, महेश्वर सुरवसे, रोहित गंजेवार यांच्यासह अनेक जण उपस्थित होते.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात जाहीर प्रवेश केलेल्यामध्ये प्रामुख्याने अनिकेत पटाईत व युवराज पटाईत यांच्या माध्यमातून नामदेव पवार, बालाजी सुरवसे, महेश शिंदे, ऋषिकेश पटाईत, गुलाब भवर, पवन भवर, किशोर जेधे, आदित्य सोमवंशी, बिरू शिंपले, कृष्णा जेधे, सुरज काळजाते, पंकज काळदाते, किरण पाथरकर, अनिकेत शिंदे, ओम शिंदे, शाहिद सय्यद, अविनाश हेडे, मानव काळदाते, अजय पटाईत, स्वप्निल पटाईत, शुभम शिर्के, दत्तात्रय जेधे आणि अनिकेत घोडके त्याचबरोबर

शहरातीलच अर्जुन चौरे, राजू थाटकर, प्रमोद थाटकर, अशोक खामकर, नरेश सोमवंशी, भागवत काळे आणि अनिकेत शेवाळे या उत्साही तरुणांचा समावेश आहे. आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात त्यांच्या प्रवेशाने पक्षात नवीन उर्जा आणि उत्साह संचारला असून स्थानिक कार्यकर्त्यांमध्येही नवचैतन्य निर्माण झाले आहे. अंबाजोगाई नगरपरिषद निवडणुकीच्या अनुषंगाने या सर्व युवकांनी पक्षाच्या विचारधारेवर व नेतृत्वावर ठाम विश्वास व्यक्त करत राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. पक्षात जाहीर प्रवेश केलेल्या युवकांची ऊर्जा व त्यांच्या कार्य तत्परतेतून पक्षाचे कार्य अधिक मजबूत व बळकट होईल असा विश्वास याप्रसंगी राजकिशोर मोदी यांनी व्यक्त केला.

आजचा नवयुवक हा देशाचे उद्याचे भविष्य आहे. त्यामुळे युवकांनी शिकून संघटित होऊन आपल्या समाजासाठी पर्यायाने देशासाठी कार्य करावे असे मत संकेत मोदी यांनी व्यक्त केले. पक्षप्रवेश झालेल्या सर्व युवकांचे अभिनंदन करून त्यांना आपापल्या प्रभागात पक्षाचे विचार घरोघरी पोचविण्यासाठी प्रयत्न करण्याचे आवाहन देखील यावेळी राजकिशोर मोदी व संकेत मोदी यांनी केले.

# चाईल्ड प्रायमरी स्कूलची-कृषी प्रदर्शनाची शैक्षणिक सहल

## विद्यार्थ्यांसाठी ज्ञान आणि आनंदाचा संगम

**तभा वृत्तसेवा**

**केज दि.१२ नोव्हेंबर**



चाईल्ड प्रायमरी स्कूल तर्फे विद्यार्थ्यांसाठी एक आगळीवेगळी शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. या सहलीत विद्यार्थ्यांना शहरात भरविण्यात आलेल्या कृषी प्रदर्शनाला नेण्यात आले. या प्रदर्शनात विद्यार्थ्यांनी आधुनिक शेतीतील यांत्रिकीकरण, नवनवीन शेती तंत्रज्ञान, आधुनिक सिंचन पद्धती, सेंद्रिय शेतीचे महत्त्व तसेच कृषी क्षेत्रात होत असलेल्या प्रगत बदलांविषयी प्रत्यक्ष माहिती मिळवली.

प्रदर्शनात ट्रॅक्टर, हार्वेस्टर, ड्रोन तंत्रज्ञान, बियाणे प्रक्रिया यंत्रणा, तसेच शेतकऱ्यांसाठी उपलब्ध असलेली अत्याधुनिक साधने पाहून विद्यार्थ्यांचे डोळे विस्फारले. त्यांनी शेतमालाच्या विविध उत्पादनांविषयी अनेक प्रश्न विचारले व मार्गदर्शकांकडून समाधानकारक उत्तरे मिळवली.

शेती ही आपल्या देशाची खरी ताकद आहे, हे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभवातून जाणवले. या सहलीमुळे त्यांच्या मनात कृषीविषयी आदरभाव निर्माण झाला तसेच विज्ञान आणि तंत्रज्ञान यांचा शेतीशी असलेला जवळचा संबंध त्यांनी समजून घेतला.

विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि उत्साह झळकत होता. नवीन ज्ञानाचा खजिना मिळाल्याची भावना त्यांच्या प्रत्येक नजरेत दिसत होती. शाळेचे मुख्याध्यापक म्हणाले, अशा शैक्षणिक सहली विद्यार्थ्यांच्या ज्ञानवृद्धीसोबतच त्यांचा दृष्टिकोन विस्तृत करतात. शिक्षण केवळ वर्गात नाही, तर प्रत्यक्ष अनुभवातून अधिक प्रभावीपणे घडते.एकूणच, ही कृषी प्रदर्शनाची शैक्षणिक सहल विद्यार्थ्यांसाठी अत्यंत उपयुक्त आणि आनंददायी ठरली. सहलीच्या शेवटी विद्यार्थ्यांना स्वादिष्ट खाऊ देऊन आनंदात दिवसाचा समारोप करण्यात आला. विध्यार्थीना मार्गदर्शन डॉ. हनुमंतजी सौदागर सर यांनी केले,या वेळी सर्व स्टाफ उपस्थित होता.

# विषय छोटा पण कार्यानुभव मोठा

आपल्या हिंदू संस्कृतीतील सणांचा राजा दिवाळीसह इतर सर्वच सणवार, उत्सव, औक्षण, मंगल प्रसंगात, ताटा -पाटा भोवती स्वागतासाठी भव्य आणि प्रसन्न विविध रंगाने रेखाटलेली रांगोळी मांगल्याचे वातावरण करण्यासाठी चे प्रथम चरण आहे.

दगडाच्या पीठातून साकारलेली पांढरे ठिपक्याची, स्वस्तिक हळद कुंकू किंवा मुक्तहस्त चित्रण स्वरूप



असो रांगोळी काढणं विविध आकारात दारात, उंबऱ्यात, तुळशीपाशी, अंगणात, नित्याने महिला वर्गाचे दिवसाच्या सुरुवातीचे पहिले काम असते .आज काढलेली शोभिवंत अशी ही रांगोळी उद्यापर्यंतच राहणारी असते. नवादिवस नवीरांगोळी ती पण वेगवेगळ्या सुबक आकाराची, विविध रंग भरणासह काढणे ही भारतीय संस्कृतीत पुरातन परंपरा आहे. रामायण, महाभारत, वेदापासून च्या ग्रंथात याचा उल्लेख आढळतो.

रामकृष्ण आले ऐकोनी, उतावीळ झाल्या गवळणी , रांगोळ्या नानापरी अंगणी,घालिताती सप्रेमी असे संत एकनाथाच्या गाथेत वर्णन आहे ,तसेच संत जनाबाईच्या अभंगात रांगोळी घातली गुलालाची असाही उल्लेख येतो.दररोजच्या जीवनाशी या रांगोळीचा संबंध जोडला तर दिवसाची सुरुवात मंगलाचरणाने करावी, विविध रंगाने मनाची सजावट ठेवावी, रोज, नित्यनूतन विचाराने मनाचे मोठेपण सजवावे, असं प्रसन्नचित्त, उल्हासित मन आणि मंगल्य बुद्धीने रोजच्या नव्या दिवसाला सामोरे जावे, हा मोलाचा संदेश रांगोळीतून घेता येतो.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विचार संस्कृती रक्षणाच्या क्षेत्रात काम करणाऱ्या संस्कार भारतीने रांगोळीला कला साधना म्हणून विशेष महत्त्व दिले आहे. मातृभूमीची एका प्रकारे सजावट ,भूअलंकरण,सर्व राष्ट्रीय आणि धार्मिक उत्सवात प्राधान्य करण्याचा संदेश दिला जातो. या प्रेरणेने सौ. मनीषा ने दररोज अंगणात काढली जाणारी रांगोळी आता संदेश पोहोचविण्यासाठीचे मंगल माध्यम म्हणून ही कला जोपासली आहे.भारतीय शिक्षणाचा प्रसार करण्याच्या हेतूने ७५ वर्षापासून वसा घेतलेल्या संस्थे च्या स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या नावाने बीड येथे चालणाऱ्या संस्कार केंद्रात (महाविद्यालय) एक सेविका म्हणून मनिषा धारुरकर काम करते .

रा.स्व. संघ शताब्दी वर्ष महोत्सव साजरी करत आहे, तेव्हा पंच व परिवर्तनाच्या कार्यातून लाखो स्वयंसेवक प्रत्यक्ष काम करत असताना, छत्रपती शिवरायांची प्रेरणा प.पू .आद्य सरसंघचालक डॉ .हेडगेवार, श्री गुरुजी यांचे रांगोळीतून साकारलेले चित्र आणि हर राष्ट्रभक्त का स्वप्न अखंड भारत भारतमाता चित्र, स्वयंमरगेंद्रता हे बोधचिन्ह.

सामाजिक समरसता, स्व बोध, पर्यावरण रक्षण, नागरिक कर्तव्य, कुटुंब प्रबोधन या पंचप्रण चे रांगोळीतून दर्शन एका कार्यक्रमाच्या निमित्ताने रेखाटले .थोडे अधिक कष्ट घेऊन ही टिकावी या उद्देशाने केलेले रांगोळी साकारली, याचं मोठं कौतुक अध्यक्ष , कार्यवाह,संस्था पदाधिकारी, महाविद्यालय समिती अध्यक्ष,प्राचार्या सह सर्व सहकारी, संघ परिवारातील स्वयंसेवक बंधू-भगिनीसह, कुटुंबीय ,नातेवाईकांनी केले. या कष्टासाठी साथ सोबत, प्रेरणा अनेकांची मिळत गेल्याने एक समाधान सौ. मनीषा ला झाले आहे.

शुभविवाह किंवा मंगल प्रसंगाच्या निमित्ताने मंगलसजावटीसाठी विविध आकारातील, आकर्षक, विविध रंगाच्या रांगोळ्या काढण्याचा छंद वाढतो आहे, या रांगोळ्या करताना मनात प्रसन्न भावना, समाधान आणि कौतुक होते . संस्कार ,संस्कृती जपणारा ठेवा विषय छोटा पण कार्यानुभव मोठा असाच आहे, हा एक कुटुंब प्रबोधनाचा देखील एक भाग म्हणून याकडे पाहिले जाते आहे.

**लक्षवेधी ..... संस्कार, संस्कृतीरक्षण.**

# आदर्श शिक्षक, वात्रटिकाकार भागवत मसने प्रेरणादायी शिक्षक २०२५ या पुरस्काराने सन्मानित





**तभा वृत्तसेवा**

**अंबाजोगाई दि.१२ नोव्हेंबर**

फाउंडेशन फॉर एज्युकेशन अँड कम्युनिटी वेल्फेअर पुणे, यांच्यातर्फे अंबाजोगाई शहरातील श्री योगेश्वरी माध्यमिक विद्यालयाचे आदर्श शिक्षक तथा वात्रटिकाकार, कविवर्य भागवत मसने याना प्रेरणादायी शिक्षक पुरस्कार २०२५ देऊन नुकताच सन्मान करण्यात आला. हा पुरस्कार सन्मान सोहळा दि ९ रोजी पुणे येथे पदमजी हॉल पुणे येथे संपन्न झाला. हा पुरस्कार प्राचार्य डॉ. नितीन घोरपडे, (अण्णासाहेब मगर महाविद्यालय हाडपसर, पुणे) , प्राचार्य शेख आफताब(पूना कॉलेज पुणे) , इम्तियाज आगा (उपप्राचार्य पुना कॉलेज पुणे) तसेच सामाजिक कार्यकर्ते विलास लोंढे यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

भागवत मसने यांना यापूर्वी अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे. ज्यामध्ये साहित्य, शैक्षणिक व सामाजिक पुरस्काराचा समावेश आहे.कोल्हापूर येथील लोकशाहीर अण्णाभाऊ साठे राष्ट्रीय सन्मान, शिवजागर प्रतिष्ठाण चा महाराष्ट्र रत्न पुरस्कार, मैत्री फाउंडेशन बीडचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार, तसेच आदर्श साहित्यिक पुरस्कार या पुरस्काराने भागवत मसने यांचा यापूर्वी सन्मान करण्यात आला आहे. भागवत रामकृष्ण मसने हे हिंदी विषयात एम ए बी एड असून त्यांना के. के. एम. कॉलेज मानवत येथे वाद विवाद स्पर्धेत मराठवाडा स्तरावरील स्पर्धेचे पहिले बक्षीस मिळाले. महाविद्यालयीन जीवनात वाद विवाद स्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, काव्यवाचन स्पर्धा यामध्ये एकूण ३२ पारितोषिके मिळवली आहेत.

एम ए हिंदी पूर्ण झाल्यानंतर श्री योगेश्वरी महाविद्यालय वरिष्ठ स्तरावर प्राध्यापक म्हणून सात वर्ष काम करताना अनेक विद्यार्थी वक्तृत्व वादविवाद स्पर्धेत घडवले.भागवत मसने यांनी स्वतः पाच एकांकिका व पाच गीते लिहून विद्यालयाच्या विद्यार्थी चमूद्वारे बीड आकाशवाणीवर सादर केले. मागील अनेक वर्षापासून विविध विद्यालय तथा महाविद्यालयात स्वतःचा हास्य व्यंगात्मक कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून सादर केले आहेत. गेल्या वर्षभरात अनेक ठिकाणी वाद-विवाद व वक्तृत्व स्पर्धेचे उत्तम असे परीक्षण करत आहेत. त्याचबरोबर अनेक कवी संमेलनाचे उत्तम व बहारदार असे सुत्रसंचलन केरत आहेत. भागवत मसने यांना मिळालेल्या सन्मानाबद्दल विविध क्षेत्रातील अनेक मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन होऊन शुभेच्छाचा वर्षाव केल्या जात आहे.

# शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांचा सोमवारी शिक्षण आयुक्त कार्यालयावर मोर्चा

## कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे-जिल्हाध्यक्ष डावकर

**तभा वृत्तसेवा**

**बीड दि.१२ नोव्हेंबर**

शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या प्रलंबित प्रश्नाबाबत सोमवार दि. १७ नोव्हेंबर रोजी शनिवारवाडा पुणे ते शिक्षण आयुक्त व संचालक कार्यालय येथे मोर्चा काढण्यात येणार असून या मोर्चात शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन जिल्हा शिक्षकेतर संघटनेच्या वतीने करण्यात आले आहे .

राज्यातील माध्यमिक शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या मागण्या अनेक वर्षांपासून प्रलंबित आहेत. न्यायालयीन आदेशानुसार सुरू करण्यात आलेली शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांची पदभरती देखील शिक्षण संचालकांनी परिपत्रक काढून बंद केलेली आहे. सदर पदभरती तात्काळ सुरू करण्यात यावी. चतुर्थश्रेणी कर्मचार्यांना २४ वर्षानंतर मिळणार्या लाभानुसार त्यांची वेतननिश्चिती करताना एस-४ मध्ये न करता एस-५ मध्येच करण्यात यावी. शाळेतील कर्मचार्यांना माध्यमिक राज्य शासकिय कर्मचार्यांप्रमाणेच नवीन सुधारीत आश्वासित प्रगती योजनेचा १०, २०, ३० वर्षानंतरचा लाभ तात्काळ लागू करण्यात यावा. राज्यातील माध्यमिक शाळांमध्ये चतुर्थश्रेणी कर्मचारी यांची नियुक्ती कंत्राटी पद्धतीने न करता पूर्वी प्रमाणे नियमित वेतनश्रेणीत करण्यात यावी, माध्यमिक शाळातील वरीष्ठ लिपीक, मुख्य लिपीक, प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथपाल अतिरिक्त झाल्यास त्यांना सेवानिवृत्त होईपर्यंत वेतनास व वेतनश्रेणीस संरक्षण मिळावे. प्रयोगशाळा सहाय्यक, ग्रंथपाल, शिपाई यांच्या वेतनातील त्रुटी दूर करण्यात याव्यात आदि मागण्यासाठी शिक्षण आयुक्त कार्यालयावर मोर्चा काढण्यात येणार आहे तरी या मोर्चात जिल्ह्यातील माध्यमिक शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन महाराष्ट्र राज्य माध्यमिक शिक्षकेत्तर संघटनेचे जिल्हाध्यक्ष संजय डावकर, उपाध्यक्ष शेख मोहसिन, बाळासाहेब रगडे, संदिप वनवे, सचिव नामदेव वाघ, दत्तात्रय आगवान, बाळू सोळंके, अविनाश कळमकर आदिंनी केले आहे.

DNS Bank Ltd. Ambajogai
ISO 9001:2008 Certified Bank.
दीनदयाळ नागरी सहकारी बँक म. अंबाजोगाई

(सरफेसी कायदा,२००२ च्या २(१)(zd)नुसार परिभाषित केल्यानुसार सुरक्षित कर्जदार)

जा.क्र. सरफेसी/०६/७०२७-४७५ व ७०२७-४८२/**१७८**/२०२५-२६ दिनांक ११.११.२०२५

**नोंदणीकृत पोस्ट/जाहिरातीद्वारे**

प्रति,

१. पठाण अफसर खान नबी खान (कर्जदार)
**पत्ता:-** गांधी नगर,अंबाजोगाई,ता.अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७
२. पठाण जाफरखान अफसरखान (सह-कर्जदार)
**पत्ता:-** गांधी नगर,अंबाजोगाई,ता.अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७
३. पठाण अमजद खान अफसर खान
**पत्ता:-** गांधी नगर,अंबाजोगाई,ता.अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७
४. पठाण अनवर खान गफार खान
**पत्ता:-** गांधी नगर,अंबाजोगाई,ता.अंबाजोगाई,जि.बीड ४३१ ५१७

(कायद्याच्या 2(1)(f) मध्ये परिभाषित केल्यानुसार कर्जदार)

**सिक्युरिटायझेशनच्या १३(२) अन्वये मागणी सुचना आणि आर्थिक मालमत्तेची पुनर्रचना आणि अंमलबजावणी सुरक्षा व्याज कायदा २००२**

महोदय,

**विषय:-** नॉन-परफॉर्मिंग अकाऊंट अंतर्गत देय रक्कम काढुन टाकण्याची मागणी आमची शाखा:- **परळी-रोड,अंबाजोगाई**
**सुचना:-** U/S १३(२) आर्थिक मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षा व्याज कायदा २००२ अंमलबजावणी.

१. तुमची सुचना क्र.०१ तुमच्या विनंतीनुसार आम्ही खालील क्रेडीट सुविधा मंजुर केल्या आहेत.
२. तुमचे कर्जखाते दिनांक २५.१०.२०२४ पासुन एन.पी.ए. (NPA) झाले आहे.
३. क्रेडीट सुविधा, बँकेच्या नावे आकारलेले सिक्युरिटीज आणि सध्याची थकबाकी यांचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:-

| क्रेडीट सुविधेचे स्वरुप आणि रक्कम | सुरक्षेचे तपशील/ गहाण ठेवलेली मालमत्ता | सध्याची थकबाकी |
|---|---|---|
| **खाते क्र. ७०२७ -४७५ रु.५,००,०००/-** | गहाणदार/कर्जदार अफसरखान नबीखान पठाण यांचे मौजे अंबाजोगाई ता.अंबाजोगाई,जि.बीड येथील नगरपरिषद घर क्र.७-१६९८ प्लॉट क्र.१२ सर्वे क्र.६१६/३ क्षेत्र पुर्व-पश्चिम १६.५०मी. दक्षिण-उत्तर-पुर्व बाजु ८.५० मी. दक्षिण-उत्तर-पश्चिम बाजु १०.२० मी. एकुण क्षेत्र १५४.२८ स्वे.मी. जागा व त्यावरील बांधकाम ज्याच्या चतु:सिमा खालीलप्रमाणे :- **पुर्व:- सर्वे क्र.६१६ चा काही भाग पश्चिम:- ९ मी. रस्ता दक्षिण:- प्लॉट क्र.१३ उत्तर:- सर्वे क्र.६१६ चा काही भाग** (वरील मालमत्ता "जशी आहे तशी व आहे त्या स्थितीत") | कर्जखाते क्र.७०२७-४७५ मुद्दल + व्याज एकुण रु.५,९३,४३९/-दिनांक३१.१०.२०२५रोजी + पुढील व्याज @ १४.५०% दिनांक ०१.११.२०२५ पासुन |
| **खाते क्र. ७०२७ -४८२ रु.१,००,०००/-** | | कर्जखाते क्र.७०२७-४८२ मुद्दल + व्याज एकुण रु.१,१८,५०८/-दिनांक३१.१०.२०२५रोजी + पुढील व्याज @ १३.५०% दिनांक ०१.११.२०२५ पासुन |

- **वरील तपशीलांमध्ये काही फरक आढळल्यास, कृपया मालमत्तेच्या मुळ कागदपत्रांनुसार विचार करा**
- **अज्ञात शुल्क असल्यास माहित नाही**

४. घेतलेल्या क्रेडीट सुविधा विचारात घेऊन, तुम्ही खालील कागदपत्रे अंमलात आणली आहेत.
१. कर्जखाते क्र.७०२७-४७५
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक **२६.०६.२०२४**
ब. गहाणखत नोंदणी दिनांक **२६.०६.२०२४ (गहाणखत नोंदणी क्र.३७७९/२०२४)**
२. कर्जखाते क्र. ७०२७-४८२
अ. प्रॉमिसरी नोट, करार, धारणाधिकार पत्र दिनांक २८.०८.२०२४
ब. गहाणखत नोंदणी दिनांक २६.०८.२०२४ (गहाणखत नोंदणी क्र.४९८९/२०२४)

५. म्हणजे, तुम्ही मंजुर केलेल्या अटी आणि नियमांचे पालन करण्यात अयशस्वी झाला आहात आणि कर्ज डिफॉल्ट केले आहे आणि तुमच्या खात्यानुसार रिझर्व्ह बँक ऑफ इंडीयाने जारी केलेल्या विहित नियमांनुसार बँकेने कर्जखाते NPA म्हणुन वर्गीकृत केले आहे. आम्ही वारंवार मागणी करुनही तुम्ही तुमच्या खात्यातील थकबाकीची रक्कम भरलेली नाही.

६. वर नमुद केलेल्या कायद्यान्वये बँकेला प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करुन, त्यामुळे तुम्हाला संपुर्ण रक्कम व्याजासह परत करण्याचे आवाहन केले आहे. **कर्जखाते क्र.७०२७-४७५ मुद्दल + व्याज एकुण रु.५,९३,४३९/-दिनांक३१.१०.२०२५रोजी + पुढील व्याज @ १४.५०% दिनांक ०१.११.२०२५ पासुन व कर्जखाते क्र.७०२७-४८२ मुद्दल+ व्याज एकुण रु.१,१८,५०८/-दिनांक३१.१०.२०२५रोजी + पुढील व्याज @ १३.५०% दिनांक ०१.११.२०२५ पासुन** आणि वर उल्लेख केल्याप्रमाणे **दिनांक १२.०१.२०२६ पर्यंत** ही नोटीस मिळाल्याच्या तारखेपासुन ६० दिवसांच्या आत, बँकेला उपलब्ध असलेल्या इतर अधिकारांचा पुर्वग्रह न ठेवता, बँक वरील कलम १३ च्या कलम ४ अंतर्गत कोणतेही अणि/किंवा सर्व अधिकार वापरेल. या कायद्यांतर्गत लागु होणा-या सिक्युरिटीज/मालमत्तेच्या संदर्भात कायदा, ज्या बाबतीत त्याच्या इतर आनुषंगिक प्रभारांचा सर्व खर्च, शुल्क आणि खर्च भरण्यास देखील जबाबदार असेल इतर गोष्टी बरोबरच कायद्यांतर्गत उपलब्ध अधिकारांमध्ये हे समाविष्ट आहे:

अ) सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेणे ज्यामध्ये वर नमुद केल्याप्रमाणे सिक्युरिटी व्याज तयार केले आहे तसेच लीज,असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरित करण्याचे अधिकार.
ब) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन ताब्यात घेणे, ज्यात भाडेपट्टी, असाइनमेंट किंवा विक्रीद्वारे हस्तांतरण करण्याचा अधिकार समाविष्ट आहे.
क) सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करण्यासाठी व्यवस्थापक म्हणुन कोणत्याही व्यक्तीची नियुक्ती करण्यासाठी, ज्याचा ताबा आमच्याकडुन घेतला जाईल आणि व्यवस्थापक सुरक्षित मालमत्तेचे व्यवस्थापन करील आणि सुरक्षित मालमत्तेचे कोणतेही हस्तांतरण हस्तांतरित करणा-याकडे किंवा त्यासंबंधीचे सर्व अधिकार असतील. सुरक्षित मालमत्ता जसे की आपण हस्तांतरण केले आहे.
ड) कोणत्याही व्यक्तीला लेखी पत्र लिहिणे किंवा नोटीस जारी करणे, ज्याने कोणत्याही सुरक्षित मालमत्तेचा ताबा घेतला आहे ज्याच्याकडुन सिक्युरिटी व्याज तयार केले गेले आहे ज्यांच्याकडुन आम्हाला पैसे देणे बाकी आहे किंवा तुमच्यामुळे होऊ शकते.

७) कृपया लक्षात घ्या की कायद्याच्या कलम १३(१३) नुसार, ही नोटीस मिळाल्यानंतर, तुम्हाला बँकेच्या पुर्व लेखी संमतीशिवाय या सुरक्षिततेची विल्हेवाट लावण्यापासुन किंवा हाताळण्यापासुन प्रतिबंधित केले आहे.

**ठिकाण:- अंबाजोगाई**

**श्री.अनंत गोपाळराव देशपांडे**
अधिकृत अधिकारी (सेक्युअर क्रेडीटर)
दीनदयाळ नागरी सह.बँक म.अंबाजोगाई
मुख्यालय-अंबाजोगाई मो.७६६६५७७९००

# हिंगोलीत भाजप आणि शिंदेसेनाच आमनेसामने

## महाविकास आघाडीचा नगराध्यक्षपदाचा उमेदवार ठरेना

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ नोव्हेंबर**

महायुतीमधील भारतीय जनता पक्ष आणि शिंदेसेना आगामी नगरपालिका निवडणुकी आमने सामने आले असून दोधांनीही नगराध्यक्षपदाचा उमेदवार जवळपास निश्चित करीत शहरातील विविध भागात गाठीभेटी सुरू केल्या आहेत. महायुतीतील अजित पवार गट अजूनही वेट आणि वॉचच्या भूमिकेत आहे. निवडणुकीला अवघे काही दिवस शिल्लक असतांना महाविकास आघाडीतील नगराध्यक्षपदाचा उमेदवार कोण हे अजूनही अनिश्चित असल्यामुळे खरी लढत महायुतीतील भाजप आणि शिंद-सेनेत होण्याचे संकेत मिळत आहे.

हिंगोली नगर पालिकेवर भाजपचे नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्या काळात आ. तान्हाजीराव मुटकुळे यांच्या माध्यमातून कोट्यावधी रूपयांचा निधी मिळाला. या निधीतून शहरातील रस्ते, भूमीगत गटार तसेच इतर मुलभूत सुविधा देण्यात आल्या. शहरात अनेक विकास कामे करण्यात आली. शहरातील जलेश्वर तलावाचे सौंदर्यीकरण करण्यात आले. हिंगोली नगर पालिकेने स्वच्छता अभियान आणि इतर उपक्रमात राज्यात स्थान मिळवले. भाजप याच मुद्द्यावर निवडणुकीत उतरला आहे. हिंगोली नगराध्यक्षपद हे ओबीसी महिलासाठी राखील असल्यामुळे माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर यांच्या सुविद्य पत्नी सौ नीता बांगर या निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहेत. मागील काळात शहरात केलेल्या विकास कामांचा पाढा भारतीय जनता पक्ष त्यांच्या बैठकांमधून शहरातील नागरिकांना सांगत असतांना दिसत आहे. दरम्यान भाजपमध्ये निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर जोरदार हालचालींना वेग आला असून महायुती झाली तर ठिक अन्यथा भाजपचा बी प्लॅनही तयार आहे. त्यासाठी प्रत्येक प्रभागात भाजपने त्यांचे उमेदवारही जवळपास निश्चित केल्याचे दिसत आहे.

दुसरीकडे महायुतीतील भाजपचा मित्रपक्ष असलेल्या शिंदेसेनेनेही नगराध्यक्षपदासाठी जोरदार आखणी करायला सुरूवात केली असून जिल्हाप्रमुख आ. संतोष बांगर यांचे थोरले बंधू तथा माजी सभापती श्रीराम बांगर यांच्या पत्नींना नगराध्यक्षपदाच्या निवडणुकीत उभे करण्याचे जवळपास निश्चित झाले आहे. शिंदेसेना मतदारांना आकर्षिक करण्यासाठी शहरातील विविध भागात भेटी देत आहेत. अनेकांचे पक्षप्रवेश सोहळे करीत आहे.

दुसरीकडे महाविकास आघाडीमध्ये अजूनही हिंगोली नगराध्यक्षपदाचा उमेदवार जाहीर करण्यात आला नाही. उमेदवारी अर्ज भरण्यास मागील तीन दिवसांपासून सुरूवात झाली असली तरी दोन दिवसांपासून एकही उमेदवारी अर्ज दाखल झाला नाही. महाविकास आघाडीत काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष सुरेशअप्पा सराफ यांची मुलगी नगराध्यक्षपदाच्या रिंगणात उतरणार असल्याची चर्चा आहे तर उबाठा शिवसेनेचे सहसंपर्क प्रमुख विनायक भिसे हे देखील नगराध्यक्षपदासाठी इच्छुक आहेत.

माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, माजी उपनगराध्यक्ष हाजी शेख निहाल यांच्यासारख्या मातब्बरांनी पुन्हा अजित पवार गटात प्रवेश केल्यामुळे हिंगोलीचे राजकारणात पुन्हा एकदा ट्वीस्ट येणार असल्याचे दिसत आहे. मात्र या मातब्बरांनी अद्याप त्यांचे पत्ते उघडले नाहीत. ऐनवेळी अजित पवार गट आणि भाजप एकत्र लढल्यास नगर पालिका निवडणुकीत भाजपचा नगराध्यक्ष पुन्हा एकवेळा निवडून येण्याचे संकेत मिळत आहेत.

# डिग्रस आणि सुकळी येथील साठवण तलावासाठी २१४ कोटींचा निधी

## भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांची माहीती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ नोव्हेंबर**

हिंगोलीविधानसभा मतदारसंघातील डिग्रस आणि सुकळी येथील साठवण तलावासाठी दि ११ नोव्हेंबर रोजी झालेल्या राज्याच्या कॅबिनेट बैठकीत २१४ कोटी रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला असून या तलावामुळे सुमारे १३०० हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार असून अनेक गावांना याचा लाभ मिळणार असल्याची माहीती भाजपचे आ. तान्हाजीराव मुटकुळे यांनी दिली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवारी कॅबिनेटची बैठक पार पडली. यावेळी हिंगोली विधानसभा मतदार संघातील डिग्रस येथील साठवण तलावाला मंजूरी देण्यात आली. या तलावासाठी ९० कोटी ६१ लाख रूपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. या तलावामुळे ग्रामस्थांना स्वच्छ पिण्याचे पाणी तसेच ६०३ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळाच्या अधिकार क्षेत्रात डिग्रस गावाच्याजवळ वाहणाऱ्या नाल्यावर ३.७१ दशलक्ष घमी क्षमतेचा बंधारा बांधण्यात येणार असून याचा लाभ लोहगाव व दाटेगाव येथील ६०३ हेक्टर जमीनीसाठी होणार आहे. या योजनेमुळे कृषी, औद्योगिक तसेच विकास कामांना चालना मिळणार आहे.

**शेतकऱ्यांचा विकास होणार– आ. तान्हाजी मुटकुळे**

डिग्रस आणि सुकळी येथील साठवण तलावासाठी मी मागील अनेक दिवसांपासून राज्य सरकारकडे पाठपुरावा केला. अखेर मुख्यमंत्री फडणवीस यांनी या दोन्ही साठवण तलावाला मंजुरी दिल्याबद्दल त्यांचे आभार मानतो. या साठवण तलावामुळे परिसरातील शेतकऱ्यांच्या पिकांना बारामहिने पाणी उपलब्ध होणार असून जवळपास १३०० हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. तसेच या भागातील लोकांना शुधद आणि स्वच्छ पिण्याचे पाणीही उपलब्ध होणार आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही सुटणार आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा विकास होणार आहे. २१४ कोटी रूपयांचा निधी यासाठी मंजुर करण्यात आला आहे. अशी प्रतिक्रीया आ. मुटकुळे यांनी दिली

सेनगाव तालुक्यातील सुकळी येथेही साठवण तलावाला मंजूरी मिळाली असून या तलावासाठी १२४ कोटी रूपयांचा निधी मंजुर झाला आहे. या तलावामुळे परिसरातील ६७७ हेक्टर जमीन सिंचनाखाली येणार आहे. गोदावरी मराठवाडा सिंचन विकास महामंडळाच्या अधिकार क्षेत्रात सुकळी या गावाजवळील नाल्यावर ४.०७ दशलक्ष घमी चा बंधारा बांधण्यात येणार आहे. या योजनेचा लाभ परिसरातील गावांना होणार असून शुध्द पिण्याचे पाणी तसेच बारा महीने शेतीला पाणी मिळणार आहे. दोन्हीही साठवण तलावासाठी भाजपचे आ. मुटकुळे यांनी सतत पाठपुरावा केला अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून या तलावाच्या कामाच्या निवीदा लवकरच निघणार असून याचा लाभ शेतकऱ्यांना होणार आहे.

# भूकरमापक पदांसाठी १३ व १४ नोव्हेंबरला ऑनलाईन परीक्षा

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ नोव्हेंबर**

भूमी अभिलेख विभागातील गट क पदसमूह ४ (भूकरमापक) संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता १३ आणि १४ नोव्हेंबर २०२५ रोजी ऑनलाईन परीक्षा घेण्यात येणार आहे. या परीक्षेचे विभागनिहाय वेळापत्रक आणि उमेदवारांच्या प्रवेशपत्राची लिंक विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात येणार असल्याचे जमाबंदी आयुक्त आणि भूमी अभिलेख विभागाचे संचालक डॉ. सुहास दिवसे यांनी कळविले आहे.

भूमी अभिलेख विभागातील उपरोक्त रिक्त पदे सरळसेवेने भरण्याकरीता जाहिरात प्रसिद्ध करण्यात आली होती. या परीक्षेसाठी गुरूवार १३ नोव्हेंबर रोजी पहिल्या सत्रात पुणे आणि अमरावती विभागात परीक्षा होणार असून या विभागात परीक्षा केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी परीक्षा केंद्रावर सकाळी ८ वाजता उपस्थित राहावयाचे आहे. तर दुसऱ्या सत्रात नाशिक आणि नागपूर विभागांमध्ये केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी दुपारी १२ वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे. शुक्रवार १४ नोव्हेंबर रोजी पहिल्या सत्रात मुंबई (कोकण) विभागात परीक्षा केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी सकाळी ८ वाजता तर दुसऱ्या सत्रात छत्रपती संभाजीनगर विभागात केंद्र असणाऱ्या उमेदवारांनी दुपारी १२ वाजता परीक्षा केंद्रावर उपस्थित राहावयाचे आहे.

पात्र उमेदवारांने संबंधित संकेतस्थळावर देण्यात आलेल्या सूचनांनुसार प्रवेशपत्र डाऊनलोड करुन घ्यावे आणि प्रवेशपत्रावर नमूद परीक्षा केंद्रावर उमेदवाराने दिलेल्या वेळेत उपस्थित राहून परीक्षा द्यावयाची आहे. परीक्षा केंद्र बदलण्याबाबतच्या कोणत्याही विनंतीचा विचार केला जाणार नाही. सामान्य प्रशासन विभागाकडील४ मे २०२२ रोजीच्या शासन निर्णयानुसार ऑनलाइन पद्धतीने परीक्षेचे आयोजन करण्यात येणार असल्यामुळे उमेदवाराचे परीक्षा केंद्र हे महाराष्ट्र राज्यातील कोणत्याही जिल्हा, तालुका अथवा इतर ठिकाणी असून शकते. तसेच काही अपरिहार्य कारणास्तव परीक्षेच्या दिनांकामध्ये बदल झाल्यास त्याबाबतची माहिती विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. या परीक्षा पद्धतीबाबतची सविस्तर माहितीपुस्तिका विभागाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येणार असल्याचे भूमी अभिलेख कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.



**हिंगोली– मागील चार दिवसांपासून हिंगोलीत कडाक्याची थंडी पडत असल्यामुळे नागरिकांनी स्वेटर, मफलर तसेच कानटोपी इतर गरम कपडे खरेदी करण्यासाठी दुकानात गर्दी केली आहे. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### अमृतच्यावतीने मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण

हिंगोली– महाराष्ट्र शासनाच्या स्वायत्त संस्थेअंतर्गत महाराष्ट्र संशोधन, उन्नती व प्रशिक्षण प्रबोधिनी (अमृत) यांच्यावतीने राज्यातील खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एथड) या श्रेणीतील १८ ते ५५ वयोगटातील युवक-युवतींसाठी डीजीसीए मान्यताप्राप्त मोफत ड्रोन पायलट प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात येत आहे. या प्रशिक्षणाचा उद्देश युवक-युवतींना आधुनिक तंत्रज्ञानाची ओळख करून देणे तसेच स्वयंरोजगार व रोजगारनिर्मितीस प्रोत्साहन देणे हा आहे. प्रशिक्षणामध्ये सहभागी होणाऱ्या लाभार्थ्यांना ड्रोन ऑपरेशन, शेतीतील ड्रोनचा वापर, सर्वेक्षण, फोटोग्राफी-व्हिडिओग्राफी,आपत्ती व्यवस्थापन इत्यादी क्षेत्रांमध्ये व्यावहारिक प्रशिक्षण दिले जाणार आहे. या उपक्रमामुळे युवकांना अत्याधुनिक कौशल्य प्राप्त होऊन रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत. इच्छुक उमेदवारांनी या प्रशिक्षणाबाबतची अधिक माहिती व अर्ज करण्यासाठी संपर्क क्र.+९१ ७३९१० ६५४७१ संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन अमृतच्या जिल्हा व्यवस्थापकांनी केले आहे.

### औंढ्यात सुरक्षा रक्षकांची बैठक



हिंगोली– दिल्लीतील बॉम्बस्फोटाच्या घटनेनंतर औंढा नागनाथ येथील बारा ज्योतिर्लिंगापैकी आठव्या स्थानावर असलेल्या श्री नागनाथ प्रभूच्या मंदिरात मंगळवार(ता.११ ) रोजी दुपारी तीन वाजता सुरक्षारक्षकांची गोपनीय बैठक घेण्यात आली. या बैठकीत औंढा नागनाथ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक जी एस राहिरे यांनी नागनाथ मंदिराच्या सुरक्षा रक्षकांना मार्गदर्शन केले. तसेच विशेष गोपनीय सूचना केल्या. यावेळी देवस्थानचे अधीक्षक वैजनाथ पवार, पोलीस निरीक्षक जी एस राहिरे, जमादार सुभाष जैताडे, माधव सूर्यवंशी, व्यवस्थापक सुरेंद्र डफळ, नागेश माने, रामप्रसाद उदगिरे, गजानन उदगिरे, सुरक्षा रक्षकाचे प्रमुख बबन सोनूने यांच्यासह नागनाथ मंदिरातील सुरक्षा रक्षक या बैठकीस उपस्थित होते.

### १३ वाहन चालकांवर पोलिसांची कारवाई

हिंगोली-जिल्ह्यात अवैध वाहतुक करणाऱ्या तसेच वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या वाहन चालकांविरूध्द विविध पोलिस ठाण्यांतर्गत पोलिसांनी कारवाई करीत वाहन चालकांकडून १८ हजार पाचशे रूपयांचा दंड वसूल केला आहे. तसेच जुगार कायद्यांतर्गत एका जुगार अड्डयावर छापा मारून मुद्देमाल जप्त करीत आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच दारूबंदी कायद्यांतर्गत एका ठिकाणी छापा मारून आरोपीविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# दुग्ध उद्योजकांना जिल्हाधिकाऱ्यांचे हस्ते कर्ज



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ नोव्हेंबर**

येथील पंजाब नॅशनल बॅंकेच्यावतीने दुग्ध उद्योजकांना कर्जाचे वितरण जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांचेहस्ते करण्यात आले.

शेतीला जोडधंदा म्हणून काही शेतकऱ्यांनी दुग्ध व्यवसाय सुरू केला आहे. या शेतकऱ्यांना पंजाब नॅशनल बॅंकेच्यावतीने कर्ज मंजुर करण्यात आले आहे. या कर्जाचे वितरण जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्याहस्ते करण्यात आले. यावेळी बॅंकेचे शाखाधिकारी तसेच कर्मचारी उपस्थित होते.

यावेळी बोलतांना जिल्हाधिकारी गुप्ता यांनी शेतीला जोडधंदा असल्यास शेतकऱ्यांना त्याचा निश्चितच फायदा होतो. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्यांनी शेतीपूरक व्यवसाय करणे ही काळाची गरज असल्याचे मत गुप्ता यांनी व्यक्त केले. यावेळी शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# एकीकडे उमेदवारांचे नामनिर्देशन अर्ज सुरू तर दुसरीकडे बीएलओंचा मतदान यादीचा सर्व्हे

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १२ नोव्हेंबर**



नगरपरिषद सार्वत्रिक निवडणुकीची घोषणा झाल्यानंतर एकीकडे उमेदवार नामनिर्देशन पत्र दाखल करण्यात व्यस्त असताना दुसरीकडे बीएलओ मतदान यादी हातात घेऊन घराघरात सर्वेक्षण करताना दिसत आहेत.

निवडणुकीच्या तोंडावर अजूनही मतदार यादी दुरुस्तीचे काम सुरू असल्याने नागरिकांमध्ये मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये एकाच घरातील सदस्यांची नावे तीन वेगवेगळ्या प्रभागांमध्ये दाखल झाल्याचे धक्कादायक प्रकार समोर आले आहेत. या गंभीर चुकांमुळे मतदारांमध्ये तीव्र नाराजी असून निवडणूक प्रक्रियेवरच प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. नागरिकांचे म्हणणे आहे की, आम्ही सर्व एकाच घरात राहतो, तरी आमची नावे वेगवेगळ्या प्रभागांत दाखवली गेली आहेत. मतदानाच्या दिवशी आम्ही मतदान करणार कुठे? निवडणूक आयोगाच्या नियमानुसार मतदार यादी अंतिम होण्यापूर्वी सर्व तपासणी पूर्ण व्हायला हवी होती. मात्र, प्रत्यक्षात बीएलओ अजूनही घरोघरी तपासणी करत आहेत. यावरून प्रशासनाची निष्काळजीपणा स्पष्ट दिसत आहे. स्थानिक नागरिकांनी निवडणूक अधिकारी व प्रशासनावर ताशेरे ओढले आहेत. जर मतदार यादीच अचूक नसेल, तर निवडणुकीचा निकाल किती पारदर्शक राहणार? असा प्रश्न शहरातील राजकीय वर्तुळात उपस्थित होत आहे.निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर झाल्यानंतर सर्व मतदार यादीची प्रक्रिया पूर्ण व्हायला हवी होती. काही ठिकाणी नागरिकांकडे मतदान पत्र नसल्याची तक्रार येत आहे, तर काहींचे नावे यादीतून दुसऱ्या प्रभागामध्ये गेल्याचे समोर आले आहे. अशा परिस्थितीत उमेदवारांनी नामनिर्देशन प्रक्रिया सुरू केली असली तरी मतदारांची नावेच निश्चित नसल्याने निवडणूक पारदर्शकतेवर शंका उपस्थित केली जात आहे.स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, एकीकडे उमेदवार अर्ज भरत आहेत आणि दुसरीकडे बीएलओ यादी तपासत आहेत, मग हे नियोजन कुठे आहे? या दुर्व्यवस्थेबद्दल निवडणूक अधिकाऱ्यांनी तातडीने स्पष्टीकरण द्यावे, अशी मागणी नागरिक व उमेदवारांकडून जोर धरत आहे.

# अध्यापनासोबतच विद्यार्थ्यांच्या मुल्यसंवर्धनावर भर द्यावा- जगताप

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १२ नोव्हेंबर**



विज्ञान युगातही शिक्षक हाच विद्यार्थ्यांचा भाग्यविधाता असून शिक्षकांनी अध्यापनासोबतच विद्यार्थ्यांच्या नैतीक मूल्यसंवर्धनावर भर द्यावा ही काळाची गरज आहे असे मत माजी शिक्षण संचालक द गो जगताप यांनी व्यक्त केले.

येथील राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त शिक्षक एम एम राऊत यांच्या घरी माजी शिक्षण संचालक द गो जगताप यांनी भेट दिली. यावेळी शिक्षकांच्या बैठकीत त्यांनी मूल्यसंवर्धनाबाबत चर्चा केली. यावेळी राऊत यांनी जगताप यांचा यथोचित सत्कार केला.

यावेळी नवीन शैक्षणिक अभ्यासक्रमावर बैठकीत चर्चा करण्यात आली. चर्चेत उपस्थित अधिकारी, शिक्षक मुख्याध्यापक यांनी आपली मते मांडली. नवीन शैक्षणिक अभ्यासक्रम कौशल्यावर आधारीत असून विद्यार्थ्यासाठी तो उपयुक्त असल्याचे मत जगताप यांनी व्यक्त केले. यावेळी माजी गटशिक्षणाधिकारी सुरेश सोनुने, व्ही पी फुलतांबकर, पी आर हेंबाडे, माजी प्राचार्य गणेश पौळ एम एम राऊत आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन पंडीत अवचार यांनी केले तर आभार एम एम राऊत यांनी मानले.

# शिरड शहापूर येथे हजारो भाविकांनी घेतला महाप्रसाद खिरीचा लाभ

**तभा वृत्तसेवा**
**औंढा नागनाथ, १२ नोव्हेंबर**



तालुक्यातील शिरडशहापूर येथील हजरत जिंदा शाहमदार उरुसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले होते. रविवारी १० नोव्हेंबर रोजी हजारो भाविकांनी खिरीच्या महाप्रसादाचा लाभ घेतला .

सर्वधर्मसमभाव एकात्मतेचे प्रतीक असलेल्या हजरत जिंदाशहामदार यांचा शिरडशहापूर येथे दर्गा आहे. या उरुसासाठी सर्व धर्माचे भाविक येथे येऊन एकात्मतेचे दर्शन घडवितात. या उरुसानिमित्त ८ नोव्हेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता ढोल ताशाच्या गजरात गावातून संदल मिरवणूक काढण्यात आली. बच्चे कंपनीसाठी आकाश पाळणे, मिकी माऊस, जम्पिंग झिपॉक आदीचा समावेश होता. १० नोव्हेंबर रविवारी रोजी दर्गासमोर दुपारी धुमाळचा कार्यक्रम झाला. धुमाळ नंतर दर्गा मैदानावर खिरीच्या महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. महाप्रसादाचा लाभ घेण्यासाठी हजारो भाविक सहभागी झाले होते. यावेळी खिरीच्या महाप्रसादासाठी, शिवार स्वामी महाराज, अहमद पठाण, अनिल सूर्यतळ, शेख जमीर, शेख निशु गुत्तेदार, ग्रामपंचायत सदस्यशेख गुलाम नबि, डिगांबर आकमार, संदीप बीचेवार, शेख साबेर, शिवाजी जोगदंड, अमान पठाण, रुस्तुम कुरुडे, शेख नसीब, सय्यद मोसिन, शेख नबी, दांडेगावकर, ज्ञानेश्वर पल्लये, शेख मुकरम, मुजाहिद पठाण, शेख साजिद, शेख सलीम आदींनी सहकार्य केले.